

# स्वातंत्र्यवीर सावरकर

सुधाकर देशपांडे

महाराष्ट्राचे शिल्पकार

# स्वातंत्र्यवीर सावरकर

सुधाकर देशपांडे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : एप्रिल २००३
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. १४

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : रु. ४०/-

या पुस्तकात व्यक्तप केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींमचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींकची साधारणतः शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती “महाराष्ट्राचे शिल्पकार” या योजनेअंतर्गत पुस्तकरुपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील “स्वातंत्र्यवीर सावरकर” हा चौदावा ग्रंथ आहे.

अलीकडच्या काही वर्षात धर्मांधता, जातीयवाद, पक्षीय अभिनिवेश आदि बाबींचे प्राबल्य वाढत चालले आहे. त्याचा दृश्य परिणाम म्हणून महनीय व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्यांच्या कृती-उक्तींचे निखळ दर्शन घडविणं अवघड होत चाललं आहे. अशा परिस्थितीत या ना त्या माध्यमाद्वारे अशा व्यक्तींच्या व्यक्ति मत्त्वाचे सर्वांगीण दर्शन घडविणं नितांत गरजेचं झालेलं आहे.

महाराष्ट्राचे शिल्पकार या योजनेअंतर्गत प्रसिद्ध होत असलेल्या “स्वातंत्र्यवीर सावरकर” या डॉ. सुधाकर देशपांडे लिखित चरित्रग्रंथाचे या दृष्टीने विशेष महत्त्व आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी प्रखर बुद्धिवादाचा आणि विज्ञाननिष्ठेचा प्रभावी पुरस्कार केलेला आहे. त्याचा आढावा घेताना “पौरुष बुद्धीच्या कसोटीला उतरेल, वैज्ञानिक प्रयोगातून जे प्रत्यक्ष अनुभवास येईल नि जे सर्वाधिक लोकांच्या सर्वाधिक हिताचं, कल्याणाचं, उपयोगाचं तेच ग्राह्य. जे वैज्ञानिक प्रयोगशील नि प्रत्यक्षनिष्ठ कसोटीला उतरत नाही ते त्याज्य. मग ते वेदपुराणे, श्रृती-स्मृती आदि ग्रंथातून प्रतिपादन केलेलं असो वा नसो. वेदप्रामाण्य-ग्रंथप्रामाण्य सावरकर नाकारतात नि विज्ञानप्रामाण्याचा स्वीकार करतात. ह्याच वैज्ञानिक, बुद्धिनिष्ठ दृष्टीकोनातून सावरकर सर्वच धर्मग्रंथ मनुष्यनिर्मित मानतात, ठरवतात, ईश्वर निर्मित नाही. पोथीनिष्ठ धर्मश्रद्धेपेक्षा विज्ञाननिष्ठ, विकसनशील विचार सावरकर स्वीकारून “श्रृतिस्मृति पुराणोक्तन” पेक्षा अद्ययावत,

अत्याधुनिक भूमिकेचा प्रखर पुरस्कार करतात.... "वैज्ञानिक दृष्टीच्या आधारावरच सावरकरांनी 'गोपूजन नव्हे गोपालन-रक्षण' अशी उपयुक्तिवादी भूमिका स्वीकारली. गायीला सावरकर 'दुग्धबिंदु' मानतात. धार्मिक श्रद्धेतून तिला देवपण देणं सावरकर नुसतं अडाणी, अवास्तवच काय ते मानत नाही तर प्रसंगी अनर्थकारक ठरणारं मानतात. गायीचं सशास्त्रीय, व्यवस्थित पालनपोषण करून तिला सुष्ठपुष्ठ करणं सावरकरी दृष्टीत अधिक महत्त्वाचं ठरतं. त्यासाठी मग ते प्राणी पालनपोषण शास्त्राचा (ॲनिमल हजबंडरी) अभ्यास करण्याचा आग्रह धरतात. सावरकरांची ही गायीविषयक विशुद्ध विचारसरणी धर्मश्रद्धेतून गायीला देवता मानणाऱ्या सनातन्यांच्या श्रद्धेला तडाखा देणारी खचितच होती." असे या चरित्रग्रंथात लेखकाने नमूद केले आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर आम्हाला पूर्णत समजून घ्यायचे असलीत तर त्यांच्या या विचारांकडे कोणत्याही परिस्थितीत दुर्लक्ष करणे उचित होणार नाही.

**रा. रं. बोराडे**

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई

दिनांक : २१-४-२००३

# स्वातंत्र्यवीर सावरकर

## महाराष्ट्र :-

महाराष्ट्र, हिंदुस्थानच्या अनेक राज्यापैकी एक राज्य. विदर्भ, मराठवाडा, कान्हदेश (खानदेश) नि कोंकण तसेच पश्चिम महाराष्ट्रासह अस्तित्व आकारास आलेले विशाल, विस्तृत राज्य म्हणजे आजचा महाराष्ट्र. वरील वेगवेगळ्या नांवानी पूर्वी नि आजही ओळखले जाणारे हे विभाग एका सूत्रात गोवले गेले, एकत्र सांधले गेलेत ते एका मायबोली मराठी भाषेनं. विक्रम-वैराग्य एकाजागी नांदविणारी मराठी सह्याद्रीच्या कडेकपारीप्रमाणे जशी कणखर, रांगडी नि राकट तशीच 'अमृताचेही पैजा जिंके' अशी अंगभूत गोडवा असलेली.

## स्वभाव प्रकृती :-

हिंदुस्थानातील अनेक राज्यांपैकी महाराष्ट्रसुद्धा एक घटक राज्यच. तरी पण महाराष्ट्राचा मान वेगळा, स्थान वेगळं. संपूर्ण उत्तर मोंगलाच्या घोडटापांखाली रगडली, चिरडली, भरडली जात होती. पिके होताची होताची सर्रास लुटली जात होती. कुलवती पळविल्या जात होत्या, देशान्तरी विकल्या जात होत्या. भ्रष्टविल्या जात होत्या. मंदिरे मोडली जात होती, मूर्ती फोडल्या जाऊन पायऱ्यात चिनल्या जात होत्या. उत्तरेची ही अशी दशा झालेली होती. रजपूत राजपूत न राहता मोंगल पूत झालेले होते. मोगली दरबारात मानाचे मुजरे मिळविण्यात ते रंगलेले होते. अभिमान, अस्मिता पार विसरली गेली होती. उत्तरेची ही दशा. पण दक्षिण तरी स्वतंत्र, सुरक्षित होती काय? नाही. आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, इमादशाही अशा परकीय दुष्टांच्या कवेत ती गवसली होती. उत्तरेतील रजपूताप्रमाणेच दक्षिणेतील क्षात्रवृत्ती पार लयास गेलेली होती. स्वामित्व गमवल्याची खंत उरी उरली नव्हती.

महाराष्ट्रातील शूरवीर मराठे सेवक बनून खोट्या वैभवात आनंद मानण्यापर्यत स्वाभिमानशून्य होऊन बसले होते. देशमुखीच्या खोट्या मानमरातबासाठी आपआपसात वैर, वैमनस्य करण्यातच त्यांनी आपलं शौर्य, साहस पणास लावलेलं होतं.

**शिवराय-स्वातंत्र्याचा हुंकार :-**

उत्तर-दक्षिण अशी भयानक आत्मविस्मृतीत निःसत्व होऊन निचेष्ट झालेली असतांनाच ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, चोखोबा, रामदास, तुकाराम आदि संतमंडळींनी विठ्ठल-विठ्ठल असा गजर करीत ‘नच जात पाहतो भक्तांअची ईश्वर’, म्हणत एकीचा संदेश प्रत्यक्षात उतरविला. पंढरपूरचा विठोबा हे त्यांचे दैवत. ह्याच काळात शिवरायांचं पुणे-सुपेच्या जहागिरीत पाऊल पडलं. त्यांनी स्वराज्य-स्वातंत्र्याची स्वप्नय रंगविलीत नि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी ‘कांबळ खादी वहाण पायी डोइस मुंडासे’ असलेल्या मराठा-मावळ्यांचे दल उभारण्याच्या कामी हात घातला. हां हां म्हणता शामलवर्णी सानरुपाच्या मराठा-मावळ्याचे ‘ते विळे कोयते शस्त्रे ही हातची’ झालीत. मग काय? शिवरायाच्या प्रज्ञा-प्रतिभेनं प्रेरित शौर्यसाहसांच्या नेतृत्वाखाली सह्याद्रीच्या कपारीत अंगठीतल्या खड्या एवढं चिमुकलं का होईना; पण स्वराज्य अस्तित्व - आकारास आलं. शूरवीर शिवरायाच्या विक्रमाला ‘उदंड जाहले पाणी स्नानसंध्या करावया’ अशी रामदासी वैराग्याची पावती लाभली. कारण गोदा-कृष्णा-भीमेचा प्रवाह आता पारतंत्र्य मुक्त झालेला होता. स्वातंत्र्याची पहाट अवतरल्यामुळे त्याचं जल आता सूर्याची-तेजाची पूजा करावयास पात्र ठरलेलं होतं, पवित्र झालेलं होतं. संतमंडळींच्या ‘विठ्ठल विठ्ठल’ गजराला तुळजाभवानीच्या भक्तांची ‘हरहर महादेव’ची जोड मिळाली. वैराग्याला विक्रमाची साथ मिळताच शिवशाही-पेशवाईच्या काळात भीमेकाठच्या ठेंगण्या तट्टांनी मोंगलांच्या अरबी घोड्यांची

दमछाक करुन यमुनेच्या पाण्यानं आपली तहान शमविण्याचा अभूतपूर्व पराक्रम करून दाखविला.

**पेशवाई-अवकळा-अन्त :-**

पण, पण काय? भीमाकृष्णा मुक्तर करून गंगायमुना मुक्तज करण्याचा ध्यास धरणाऱ्या महाराष्ट्राच्या पराक्रमाला अंतःकलहाचं ग्रहण लागताच वैभवी वाटचाल खंडीत झाली. हाच तो काळ. पेशवाईतील अंतर्गत कलहाचा लाभ घेत व्यापारी वृत्तीच्या इंग्रजांनी पूर्वेकडील प्रदेशात संथपणे; पण निश्चित दिशेनं पावलं टाकायला आरंभ केलेला होता. अंतर्गत कलहांनी पेशवाई अगदी खिळखिळी झालेली होती. मोगल बादशाही नि मराठेशाहीवर मात करीत इंग्रजांनी प्रदेशामागून प्रदेश आपल्या स्वामित्वाखाली आणण्यात सहज यश मिळविलं. संस्थानिकांच्या नाममात्र स्वातंत्र्यासह संपूर्ण हिंदुस्थान बिटिश सत्तांकीत झाला. संपूर्ण हिंदुस्थान मराठ्यांच्या घोडदौडीनं थरारून जात होता. दिल्लीनच्या सिंहासनावर कोणाला बसवायचं नि कोणाला केव्हा खाली खेचायचं असं सामर्थ्य असलेल्या मराठेशाहीचं सत्ता केंद्र असलेल्या पुण्यातील शनिवार वाड्यावरील जरीपटका उतरला. त्याच जागी आता इंग्रजी सत्तेची युनियन जॅकची ध्वज-पताका फडकू लागली होती.

**अठराशे सत्तावन-प्रेरणा स्त्रोत :-**

स्वातंत्र्य गेलं. पारतंत्र्य आलं. स्वाभिमान नि स्वाधिकार गमावून बसलेल्या हिंदुस्थानच्या जनतेला स्वराज्य गमावून बसल्यामुळे स्वधर्म पालन करणेही कठीण होऊन बसल्याची तीव्रतेनं जाणीव होऊ लागली. असंतोष अंतर्मनात खदखदत होताच. गायीची नि डुकराच्या चरबीच्या काडतूसांचं निमित्त काय ते झालं नि अठराशे सत्तावनचा सैनिकी उठाव झाला. मंगल पांडे नावाच्या सैनिकाच्या उदात्त; पण अपरिपक्वठ, अवेळी केलेल्या कृतीच्या परिणामी योजनाबद्ध आणखी उधळली गेली. इंग्रज

सत्ताधीश सावध झालेत. शस्त्रसज्ज  नि धूर्त, चतुर इंग्रजांनी अठराशे सत्तावनचा उठाव दडपूण, दाबून टाकण्यात यश मिळविलं. ह्या सैनिकी उठावाची योजना आखणारे, नेतृत्व करणारे नानासाहेब पेशवे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सेनापतीत्व सांभाळणारे तात्याटोपे आदि प्रमुख मंडळी मराठी होती. स्वातंत्र्याची चव चाखलेलं मराठी मन विलक्षण अस्वस्थच असायचं. गत वैभव गमावण्याची खंत सारखी डाचत असावी. परकीय इंग्रजी सत्ता स्वाभाविकपणे डोळ्यात सलत होती.

कोणत्याही कारणानं का असेना; पण अठराशे सत्तावनचा सैनिकी उठाव दडपून टाकण्यात इंग्रज यशस्वी झाले खरे. तरी प्रत्यक्ष युद्धात पराभव पत्करूनही मराठी मन पराभूत झालेलं नव्हतं. सत्तावनचा पराभवही एक प्रकारची प्रेरक शक्तीच ठरला. तसाच काही प्रमाणात प्रत्यक्ष लाभदायक सुद्धा. कारण उठाव शमताच खाजगी कंपनी सरकारची सत्ता संपली. इंग्लंभडच्या राणी व्हिक्टोरीयानं हिंदुस्थानच्या कारभाराची सूत्रे स्वतःकडे घेतली. स्वतःला हिंदुस्थानची सम्राज्ञी घोषित करून आपल्या प्रजाजनांना संतुष्ट नि शांत करण्यासाठी काही घोषणा केल्या. धर्मव्यवहारात हस्तक्षेप न करणं, संस्थानिकांना सन्मानाची वागणूक, दत्तकादि अधिकार तसेच धर्म, पंथ, वंश, भेदभेदादि निरपेक्ष योग्यता नि कार्यक्षमतेच्या निकषावर राजकीय कारभारात वाटा देण्याचे राणीने प्रकट आश्वासन दिले.

**इंग्रज-दूरगामी धूर्त योजना :-**

असल्या प्रकारच्या तत्कालीन आश्वासनांनी वरवरचा प्रासंगिक असंतोष शमविण्याचा प्रयत्नप करण्यात आला. परंतु ह्या सत्तावनच्या उठावाचा आवाकाच एवढा मोठा, तीव्रताच एवढी भीषण नि उग्र होती की धास्तावलेल्या इंग्रजांचं त्यामुळे समाधान होणं शक्यच नव्हतं. म्हणूनच दीर्घकालीन स्वस्थता, शांतता नि सुरक्षिततेसाठी देश निःशस्त्र केल्याची घोषणा केली गेली. ह्या देशातील क्षात्रवृत्ती, लढावूपणा, संघर्ष-संग्रामाची

आकांक्षा आणि क्षमता पार नष्ट करून टाकण्यासाठीच सारा देश निःशस्त्र करून टाकण्यात आला. उघडपणे शस्त्र बाळगण्याव अशी बंदी बजावून इंग्रजी सत्तेनं मनगटातील बळच हिरावून घेतलं.

शस्त्र पेलणारं मनगट असं दुर्बल करून टाकलेलं असलं तरी स्वधर्म रक्षण नि त्यासाठी स्वातंत्र्य संपादनाच्या आकांक्षेनं भरलेलं मन कसं शांत होणार? नेमक्या ह्याच विचारातून शस्त्राकडे धाव घेणारं हिंदुस्थानी मनच मरगळून, मारून टाकलं जावं म्हणून धूर्त नि दूरदर्शी इंग्रजांनी नामी उपाय शोधून काढला. हिंदुस्थानचं मनच पार इंग्रजाळून टाकावं म्हणून त्यांनी इंग्रजी शिक्षण पद्धतीचा परिणामकारक प्रयोग आरंभिला. इंग्रज राज्यकर्ते आणि हिंदुस्थानी जनता ह्यांच्यातील एक प्रकारचा दुवा, मध्यस्थ वा प्रतिनिधी वर्ग निर्माण करून पुढचा राज्य कारभार करण्याचा ह्या शिक्षण पद्धतीच्या प्रयोगामागचा हेतू होता. शस्त्र हिरावून घेण्याच्या कृतीपेक्षाही हिंदुस्थानी जनजीवनच पार इंग्रजाळून टाकण्याचा हा प्रयोग वरवर निरुपद्रवीच नव्हे तर हितकारक वाटणारा पण देशच निः सत्व करून टाकणारा होता. बहुसंख्य हिंदू रंग नि रक्तानेच काय ते हिंदू राहावेत, रुची, विचार, आचार नि भाषा ह्याद्वारे जीवनदृष्टी नि पद्धतीने पूर्णपणे इंग्रजाळलेला व्हावा हीच इंग्रजी शिक्षण पद्धती ह्या देशात रुजविण्यामागची मूळ नि मुख्य भूमिका होती.

आपलं राज्य अगदी सुव्यवस्थित नि सुरळीत चालावं, दीर्घकाळ सुरक्षितपणे टिकावं म्हणून इंग्रज विचारवंतानी, मुत्सद्यांनी नि सत्ताधीशांनी असे वेगवेगळे उपाय योजलेत खरे. परंतु तरीही हिंदुस्थानच्या मनातील असंतोष खदखदतच राहिला. अठराशे सत्तावनची स्वातंत्र्याकांक्षी प्रेरणा निदानपक्षी महाराष्ट्रात तशीच धूमसत होती.

**सशस्त्र क्रांतीचा अग्रदूत :-**

उघडपणे शस्त्र बाळगत येत नसतांना, प्रकटपणे संघटीत संघर्ष उभा करणं अशक्य असतांना गुप्तपणे शस्त्रास्त्र जमवून नि संघटना उभी करून इंग्रजी सत्तेसमोर आव्हान उभं करणारा वीर वासुदेव बळवंत फडक्यांचा प्रयत्नक ही कशाची साक्ष म्हणता येईल? आजारी आईच्या भेटीसाठी त्यांना सुटी हवी होती. इंग्रज अधिकाऱ्यांनी ती दिली नाही. परिणामी आईची भेट होऊ शकली नाही. त्यांच्या ह्या प्रकारच्या वैयक्तिनक शोकवेदनेचं उदात्तीकरण झालं. त्यामुळेच ते भारतमातेच्या पारतंत्र्य स्थितीचा विचार करू लागले. प्रत्यक्ष संघर्षाविना मातृभूमीचं पारतंत्र्य संपायचं नाही असा विचार मनात मूळ धरताच त्यांनी नोकरी सोडली. स्वातंत्र्याचा ध्यास लागलेल्या वासुदेव बळवंतांनी शिक्षित नि उच्चधभ्रू लोकांशी सम्पर्क साधून आपल्या मनीचा विचार व्यक्तं करून पाहिला. त्यांनी साथ दिली नाही. परंतु फडक्यांच्या मनातली स्वातंत्र्याची आकांक्षा एवढी अनावर, उर्मी एवढी प्रज्वलंत होती की त्यांनी निराश न होता गुप्तपणे रामोशी, पेंढारी ह्यांची संघटना उभी केली. गुप्तपणे शस्त्रांची जमवाजमव केली. त्यासाठी लागणारं आर्थिकबळ विनंत्या, मागण्या करून सहज मिळणं नाही पाहून श्रीमंत शेठ, सावकारांच्या घरावर सर्रास दरोडे घालून सशस्त्र सैन्य उभं केलं नि इंग्रजी सत्तेपुढं उघड आव्हान उभं झालं. अठराशे सत्तावनच्या उठावाची भीती इंग्रजी मनात घर करून होतीच. वासुदेव बळवंत फडक्यांना पकडून देण्यासाठी इंग्रजांनी बक्षीस घोषित केलं. त्यावर इंग्रज गव्हर्नराचं शीर आणून देण्याऱ्यास दुप्पट बक्षीस देण्याचे घोषणापत्रं फडक्यांच्या संघटनेनं झळकवलीत. अर्थात त्यांची ही लढत, त्यांचं हे संघर्षाचं आव्हान एकाकी नि म्हणून अपूर्ण ठरलं. इंग्रजी सत्ता सबळ. वासूदेव बळवंतांना संघटन, शस्त्र ह्या सर्वाचीच चणचण. परिणामी आजारी, हतबल अवस्थेत वासुदेव बळवंत पकडले गेले. खटला भरण्यात आला. शिक्षा ठोठावण्यात आली. दूरस्थ एडनच्या तुरुंगात त्यांची जन्मठेपेवर रवानगी केली गेली. तेथूनही सुटून, पळून स्वतंत्र होण्याचा त्यांनी विलक्षण धाडशी प्रयत्नण करून पाहिला;

पण तोही फसला. त्याच तुरुंगात शेवटी त्यांचा मृत्यु झाला. (फेब्रु. १७, १८८३) इंग्रजी राज्य उलथवून भारतीय प्रजासत्ताची स्थापना करण्याच्या उदात्त प्रेरणेतून आपल्यापरीनं आपण अल्पसा प्रयत्नउ केल्याची नोंद त्यांनी आपल्या दैनंदिनीत करून ठेवलेली आढळली. उग्र, तेजस्वी स्वातंत्र्याकांक्षेचा रणझुंजार अग्रदुत (Harbiger of Militant nationalism) अशा शब्दात कलकत्त्याच्या 'अमृत बझार पत्रिके'नं त्यावेळी त्यांचा मोठा गौरवास्पद उल्ले ख केलेला होता.

## भारतीय राष्ट्रीय सभा-सुरक्षाकळ :-

भारतीय जनमानस, त्यांच्या जीवन दृष्टी-पद्धतीसह (View and way of life) पूर्णपणे इंग्रजाळून टाकण्याच्या हेतूनेच इंग्रजी शिक्षण पद्धतीचा पाया घालण्यात आलेला होता. त्याला अनुसरून विद्यालयं-महाविद्यालय-विद्यापीठं अस्तित्व-आकारास आणली गेलीत. त्यातून तयार झालेली नवपदवीधारकांची पहिली पिढी बाहेर पडली. हाच तो काळ की ज्यावेळी शिक्षण पद्धतीच्या हेतू नि योजनेनुसार भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात ह्युमसाहेबांनी नेमका पुढाकार घेतला. हिंदुस्थानात जिल्हाधिकारीसारख्या पदावरून निवृत्त झालेल्या ह्युमसाहेबाला हिंदुस्थानातील अंतर्गत खदखदणाऱ्या असंतोषाची नुसती कुणकुणच काय ती नव्हती; तर त्याच्या आकस्मिक स्फोटाच्या संभाव्यतेचीही चांगली जाणीव होती. विद्यापीठातील नवविद्या विभुषितांच्या माध्यमातून खदखदणारा हा असंतोष प्रवाहीत करता यावा म्हणून भारतीय राष्ट्रीय सभेचा (Indian National Congress) चा विचार विद्यापीठीय विद्यार्थ्यात रुजविला गेला. डफरिनसारख्या सर्वोच्च सत्ताधीशाचे त्यासाठी आशीर्वादसुद्धा मिळविलेत. परिणामी १८८५ ह्या वर्षी कॉंग्रेस ह्या संघटनेची रीतसर स्थापना केली गेली.

त्यांच्या अपेक्षेप्रमाणं नवशिक्षितांची पिढी ह्या संस्थेत सहभागी व्हायला लागली. चर्चा, व्याख्यानं, ठराव ह्याद्वारे उलळत्या, उकळत्या

असंतोषाला प्रवाहित करण्याचा प्रभावी मार्ग अशा रीतीनं प्रत्यक्षात आणण्यात इंग्रजी सत्ता सहजपणे यशस्वी ठरली. प्रार्थना, (Prayer) याचना (Petition) नि सौम्य निषेध (Protest) असेच ह्या काँग्रेस संघटनेचं आरंभी तरी धोरण होतं. ते स्वाभाविक नि काही प्रमाणात कां होईना पण उचित सुद्धा होतं. कारण तो काळच तसा होता. संपूर्ण देश निःशस्त्र करून टाकलेला. मनगटालं बळ असं हिरावून घेतलेलं. मनं इंग्रजाळलेली, मारुन टाकलेली, निःसत्व करुन टाकलेली. अशावेळी शस्त्रापेक्षा लेखणीच प्रभावी ठरणारी होती. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रच देशाच्या राजकारणातं-राष्ट्रकारणात अग्रेसर होता. सत्तावनच्या सशस्त्र उठावाचं नेतृत्व करणारे नानासाबेह, झाशीची राणी लक्ष्मीबाई नि सेनापती तात्या टोपे आदि नेते महाराष्ट्राचेच तेजस्वी पुत्र होते, इंग्रजी सत्तेपुढे सशस्त्र संघर्षाचं आव्हान उभं करण्याचा प्रयत्नर करणारे झुंजार वीर वासुदेव बळवंत ह्याच महाराष्ट्र भूमीचे, आता शस्त्राच्या पात्यापेक्षा लेखणीच्या लिहीत्या टोकालाच तलवारीचं तेज चढविण्याचा काळ होता. नेमकं हे सत्य ओळखून लो. टिळकांनी लेखणी परजली. त्यांचा ‘केसरी’ पुण्यात गर्जायला लागला. त्याच काळात शिवरामपंत परांजप्यांचा ‘काळ’ इंग्रजी सत्तेला ओरबाडून रक्तगबंबाळ करायला लागला.

**नाशिक-भगुरग्रामी :-**

हाच तो काळ. स्वातंत्र्य-स्वराज्यासाठी जनजागृतीच्या पर्वाला आरंभ झालेला होता. वीर वासुदेव बळवंताचा दूर एडनच्या कारावासांत मृत्यू झाला. नेमकं ह्याच वर्षी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील भगूर नामक चिमुकल्या खेडेवजा गावी सावरकर घराण्यात विनायकाचा जन्म झाला (२८ मे १८८३). पेशवाईच्या वैभवाच्या काळात ह्या घराण्याचं दैव उजळलं. कारण विद्या-विद्वता, शौर्य-साहस ह्या घराण्यात नांदत होतं. त्यासाठीच ‘राहूरी’ची जहागीर लाभली होती, पालखींचा मान मिळालेला होता. अशा सुखवस्तु सधन, विद्वान-वीर घरंदाज कुलातील राधा-

दामोदर ह्या मातामित्यांचं दुसरं अपत्य म्हणजे विनायक. त्याला दोन भाऊ नि एक बहीण अशी ही चार भावंडं. थोरल्यांच नाव गणेश. त्याला आप्तस्वकीय 'बाबा' म्हणत. धाकटा भाऊ नारायण. 'बाळ' त्याचं घरगुती नाव. विनायकाला घरची मंडळी 'तात्या' म्हणून हाक मारीत असत.

**सावरकर-बालपण :-**

पिवळसर, तांबूस गोरा वर्ण, धरधरीत नाक, चमकदार, बारीक बोलके डोळे, लोभस वागणं, लाघवी बोलणं, मनमिळावू, मोकळा स्वभाव आदि अंगच्या गुणांनी विनायक-तात्या सर्वाचा लाडका, तसाच कौतुकाचा. शेतीवरील गडीमाणसं त्याच्या बालीश औदार्यानं मोठी भारावून त्याला 'छोटे जहागीरदार' म्हणून मोठ्या कौतूकाने मान देत असत. शेतीवाडी सम्पन्न तसंच प्रतिष्ठाप्राप्त सावरकरांच्या वाड्यात आंब्यांच्या दिवसात थोरामोठ्यांची गर्दी असायची. परिपाहुण्यांचा सारखा राबता असणं हे तर नेहमीचच. विनायक-तात्याचे वडील नि काका ह्यांचं मुळीच जमत नव्हतं. वेळी दोघात कडाक्याची भांडणंससुद्धा होत. दोघांत नेहमीचा अबोला. पण विनायकाच्या आईवर त्यांच्या काकांची मोठी माया. ह्या लेकरांवर विलक्षण प्रेम. त्यांचा त्यांना मनस्वी लळा होता. त्यातल्या त्यांत विनायक-तात्यावर त्यांचा भारी जीव. त्यांच्या ह्या बाळ्याचं त्यांना फार फार कौतुक.

सधन-सुखवस्तु घरातल्या विनायक-तात्याचं बालपण जन्मगावीच गेलं. तो काळ बालपणीच्या सवंगड्यांशी खेळण्या-बागडण्यात गेला. गावच्या राणू शिंप्याचे परशराम, राजाराम, तसेच कुळकर्ण्याचा गोपाळ आदि मंडळी त्याची बालपणची मित्र मंडळी. विनायक-तात्याचं प्राथमिक शिक्षण ह्याच चिमुकल्या गावात पार पडलं. पुढचा १ ली २ री चा अभ्यासक्रम विनायक-तात्यानं घरीच पूर्ण केला. त्याचे वडील त्या काळातही मॅट्रीकपर्यंत शिक्षण झालेले. गावकरी त्यामुळे त्यांना फार मान देत असत. सधन, नावाजलेलं घराणं म्हणून गावात एक प्रकारचा दबदबा

तर होताच; परंतु त्याहीपेक्षा शिकली सवरलेली व्यक्तील म्हणून त्यांच्याविषयी गावात विलक्षण आदर होता. त्यांना वाचनाचाही भारी नाद. पुणे, नाशिकची वृत्तपत्रे तर त्यांच्या घरी येतच; पण त्यांचा स्वस्तःचा ग्रंथसंग्रहही बऱ्यापैकी होता. वडिलांप्रमाणं विनायक-तात्यालाही वाचनाचा, पाठांतराचा मोठाच छंद. हाताला येईल ते पुस्तक तो वाचून संपवीत असे. महाभारताचं भाषांतर 'चिपळूणकरांची निबंधमाला', ग्रीक कवी होमरच पोपकृत 'इलिअड' महाकाव्याचं इंग्रजी भाषांतर, 'जगाचा इतिहास' विनायक-तात्यानं त्याला येत असलेल्या तोकड्या इंग्रजीच्या बळावरही वाचण्याचा प्रयत्नह केलेला होता. 'हरिविजय', 'पांडवप्रताप', 'मोरोपंताचं काव्या' त्यानं ऐकून, वाचून काढलं होतं. पुण्याचा 'केसरी', 'जगत्द्विहितेच्छु', 'पुणेवैभव' मुंबईचे 'गुराखी' आदि वर्तमानपत्रे, साप्ताहिके त्यांच्या नित्य वाचनात होती. मोरोपंताच्या, तसेच 'नवनीत' ह्या काव्यसंग्रहातील अनेक कविता त्याच्या नुसत्या कंठगत होत्या. स्वतःच्या वाचनाबरोबर विनायक-तात्या आपल्या बालवयीन संवगड्यानाही त्यातील माहिती सांगायचा, त्या वाचून दाखवीत असे. त्यामुळे त्याच्या बालमित्रातही वाचनाची गोडी निर्माण करण्याचा त्याचा प्रयत्नन असे. विविध प्रकारच्या अशा वाचनामुळे अगदी लहान वयातच विनायक-तात्याची बुद्धि विकसित तशीच स्मरणशक्तीत तीव्र, तीक्ष्ण नि वयाच्या मानानं दृष्टी विलक्षण प्रगत, प्रगल्भ झालेली होती. वाचनाच्या विलक्षण आकर्षणामुळे एक दिवस तर विनायक-तात्यानं 'आरण्यके' सुद्धा वाचायची ठेवली नाहीत. वडिलांना तो 'आरण्यक' वाचतांना दिसताच 'वेड्या हे काय करतोस?' म्हणून त्यांनी विचारलं होतं. घरात आरण्यकाचं वाचन, घराचं अरण्य होईल म्हणून ती हिसकावून घेतली गेली. वाचलं त्याची टिपणं करणं हाही छंद अंगवळणी असल्यामुळे 'सर्वसारसंग्रह' नावाची टिपणवहीन केलेली होती. लहानपणापासूनच कविता रचण्याची प्रतिभाही त्याला उपजतच

लाभलेली होती. वहिनीशी कवितेच्या भेंड्या खेळतांना तो अनेकवेळा स्वरचित कविता म्हणून बाजी मारून नेत असे.

बालपण असं सुख नि आनंदात जात असतानांच विनायक-तात्याला आईच्या सुखाला अंतरावं लागलं. वयाच्या नवव्या वर्षीच मृत्यूनं त्याच्या आईला त्याच्यापासून ओढून नेलं. मुलं लहानलहान, सावत्र आईचा जांच त्यांना सहन करावा लागू नये म्हणून वडिलांनी दुसऱ्या लग्नाहचा विचारच केला नाही. आईच्या मायेला पारखी झालेल्या मुलांचा वडिलांनीच मातृपितृ वात्सल्यासह सांभाळ केला. कशाचीही उणीव म्हणून मुलांना भासू दिली नाही.

**नाशिक-माध्यमिक शिक्षणारंभ :-**

पहिली, दुसरीचा अभ्यासक्रम घरीच पूर्ण झालेला होता. आता माध्यमिक तिसरीसाठी विनायक-तात्याला नासिकला पाठविणं भाग होतं. वडील भाऊ ‘बाबा’ त्यावेळी नासिकला शिकतच होते. घरी पूर्ण केलेल्या अभ्यासाची परीक्षा देऊन विनायक-तात्यानं नुकत्याच निघालेल्या शिवाजी माध्यमिक शाळेत तिसरीत प्रवेश मिळविला. ह्या तिसरीच्या वर्गातही वर्ष काढण्याची वेळ आली नाही. चार महिन्यातच त्यानं तिसरीची परीक्षा उत्तीर्ण होऊन सरळ चौथीच्या वर्गात प्रवेश केला.

चौथीपर्यंतच अभ्यासक्रम अशा रीतीनं एका पाठोपाठ एक अशा परीक्षा देऊन विनायक-तात्यानं उच्च माध्यमिक पाचवी पुढचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी शासकीय प्रशाळेत प्रवेश केला. बालवयातच बुद्धीची अशी चमक दाखविणाऱ्या बाल विनायकाचं मन मात्र नासिकला फारसं रमत नसे. त्याला सारखी घरची आठवण येई, बालसवंगड्यांची ओढ ओढत असायची. भगूरची आठवण त्याला सारखी अस्वस्थ करायची. संधी मिळताच मग तो भगूरकडे धाव घ्यायचा. अशाच वेळी पुण्याप्रमाणं नासिकलाही प्लेगसारख्या रोगाची लागण (साथ) लागली. विनायक-

तात्याला अशी संधी दैवी कृपेसारखी वाटणं अगदी स्वाभाविक होतं. विनायक-तात्या ह्या काळात भगूरलाच होता.

ह्याच काळात नासिकप्रमाणं पुण्यातही प्लेतगसारख्या साथीच्या रोगानं नुसता कहर उडवून दिलेला होता. प्रतिबंधक उपायांच्या नावाखाली इंग्रज अधिकारी उन्मतपणे वागायला लागले. नुसता संशय येताच घरात शिरून घरातल्या माणसांना सरळ बाहेर काढीत. घरातली भांडीकुंडी भिरकावून बाहेर फेकीत. बुटासह सरळ देवघरात पाय ठेवीत. बाळंतिणीच्या खोल्याही त्यांच्या ह्या प्रकारच्या मग्रूर, मस्तवालपणाला अपवाद उरल्या नव्हत्या. प्लेयगच्या रोगानं अगोदरच संत्रस्त असलेल्यांना इंग्रज अधिकाऱ्यांची ही उन्मत्त वागणूक, अपमानाचं मीठ चोळणारी व्हायची. जगण्यापेक्षा मरणे बरे वाटायला लावणारीत होती. प्लेअगच्या गाठीच्या तापापेक्षा अपमानाचा मनस्ताप त्यांना असह्य होई. अशाच परिस्थितीत महाराणी व्हिक्टोरिआचा हिरक महोत्सव साजरा करण्याचा संकल्प म्हणजे वाहत्या व्रणावर मीठ चोळण्याचाच अमानुष, असंस्कृत प्रकार होता.

**चाफेकर बंधूचं हौतात्म्य :-**

वीर वासुदेव बळवंत फडक्यांच्याच प्रकृती-प्रवृत्तीचे होते दामोदर, वासुदेव नि बाळकृष्ण हे तिघे चाफेकर बंधू. इंग्रजांची उन्मत्त वागणूक, त्यांचे अन्याय, अत्याचार चाफेकर बंधूना सहन होत नसत. व्हिक्टोरिया राणीच्या हिरक महोत्सवाच्या घोषणेनं तर त्यांचा संताप अनावर झाला, भारतमाता निःशस्त्र असली, अशक्तन असली तरी दुर्बल नाही, मेलेली नाही. तिचे सारेच पुत्र थंड रक्ताचे षंढ नाहीत हे प्रत्यक्ष कृतीनंच सत्तेनं धुंद झालेल्या इंग्रज सत्ताधाऱ्यांना दाखवून देण्याचा त्यांनी निर्धार केला. त्यासाठी दिवसही निवडला तो राणीच्या हिरक महोत्यवी समारंभाचा. त्या दिवशीचा समारंभ संपवून इंग्रज अधिकारी परतायला लागले. चाफेकर बंधूनी त्यांना गणेश खिंडीत गाठायचं ठरविलं. 'गोंद्या आला रे

आला' ही त्यांनी संकेत सूचना ठरवली होती. संकेत मिळताच दामोदर चाफेकरांनी गाडीवर प्राणघातक मारा केला. चढाई केलेल्या पहिल्या वाहनात आयर्स्ट होता. तो जागच्या जागीच ठार झाला. (२२ जून १८९८) चाफेकर बंधूचे लक्ष्य होतं रॅन्डसाहेब. तो दुसऱ्या गाडीतून येत होता. ही चूक लक्षात येताच लगेच दुसऱ्या गाडीवर चढाई करून गोळ्यांचा मारा करण्यात आला. पण तो त्याच क्षणी ठार झाला नाही. प्राणघातक दुखापत झाली नि शेवटी आठदहा दिवसांनी तो रुग्णालयात मृत्यू पावला. (३ जुलै, १८९८)

**धरपकड नि फाशी :-**

ध्यानीमनी नसलेल्या ह्या आकस्मिक घटनेमुळे इंग्रजी सत्ता जशी गोंधळून गेली तशीच विलक्षण त्वेषानं नुसती चवताळून उठली. पुण्यात सर्वत्र धरपकडीच्या सत्राला आरंभ झाला. चाफेकर बंधूपैकी दामोदर नि त्यांचा साहाय्यक आपटे ह्या दोघांना मुंबईला पकडण्यात आलं. रॅन्ड नि आयर्स्ट ह्या उभयतांच्या हत्येचं दायित्व दामोदर चाफेकरांनी उघडपणे स्वीकारलं. खटला भरण्यात आला नि त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. येरवड्याच्या तुरुंगात त्यांना फाशीवर चढविण्यात आलं. (१८ एप्रिल १८९८). बाळकृष्ण चाफेकरानं पळून जाऊन निझामी राजवटीत आश्रय घेतलेला होता. पण त्यांना तेथूनही हुडकून काढून अटक करण्यात आली. खटला भरला गेला नि त्यांनाही फाशी देण्यात आली. (८ मे १८९९). गणेश नि रामचंद्र ह्या द्रविडबंधूनी चाफेकराची माहिती शासनाला पुरवून त्यांना पकडण्यास जे साहाय्य केलं त्या फितूरीच्या नि देशद्रोहाच्या अपराधासाठी वासुदेव चाफेकर नि महादेव रानडे ह्यांनी त्यांची हत्या केली. त्यांनाही फाशीच्या दोरांना सामोरा जाण्याची शिक्षा झाली नि फाशीवर चढविण्यात आलं. (१२ मे १८९९, १० मे १८९९).

**सावरकर-किशोरवयीन प्रतिज्ञा :-**

सन १८८५ ला भारतीय राष्ट्रीय सभा अस्तित्वात आली. सभेच्या जनकाच्या अपेक्षेप्रमाणं चर्चा, संवाद, प्रार्थना, याचना नि निषेधाद्वारे खदखदणारा असंतोष प्रवाहीत करण्यात बऱ्याच प्रमाणात यशही येऊ लागलेलं होतं. कारण नव विद्याविभुषित पदवीधरांचा वर्ग मोठ्या उत्साहात काँग्रेसमध्ये सहभागी व्हायला लागलेला दिसत होता. पण अशाही परिस्थितीत सशस्त्र संघर्षाविना स्वराज्य प्राप्त होणं शक्य नाही. अन्याय, अत्याचार करणाऱ्या राज्यकर्त्यांचा सूड उगवून स्वतःच्या बलिदानाने जनतेला स्वातंत्र्याचा संदेश देणं हाच मार्ग-प्रभावी नि परिणामकारक मानणाऱ्या उग्र प्रकृती स्वातंत्र्यावाद्यांचा वर्ग निष्प्रभ झालेला नव्हता. वीर वासुदेव बळवंत फडक्यांचा उठाव, चाफेकर बंधूंनी त्याच दिशेनं केलेले प्रयत्ना ही त्याची साक्षच होती. विनायक-तात्या ह्या काळात भगूरलाच होता. दामोदर चाफेकरांवरील खटल्याचा वृत्तपत्रातून येणारा वृत्तांत तो वाचतच असे. दामोदर चाफेकरांविषयी वृत्तपत्रातून येणारी टिकाटिप्पणी, त्यात करण्यात येणारा त्यांच्या कृत्याचा निषेध, त्यांची करण्यात येणारी निंदा व त्यांना 'माथेफिरू' 'वेडा', वगैरे लावण्यात येणारी दुर्विशेषणे विनायक-तात्याला मुळीच सहन होत नसत. अगदी दिखावूपणाने वा तथाकथित मुत्सद्देगिरी म्हणूनही अशी विशेषणे विनायक-तात्यांच्या लेखी नुसती अशोभनीयच नव्हे तर अनावश्यक नि अनर्थकारकच ठरत असत. खटल्याचा वृत्तात 'केसरी'तून वाचत असताना त्याचं मन अतिशय उत्तेजित आणि क्षुब्ध होई. चाफेकरांच्या खटल्याचा निर्णय लागला, त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. त्या दिवशीचं हे वृत्त वाचताच विनायक-तात्याच्या मनाची विलक्षण कालवाकालव झाली. त्या मनाच्या कासाविस अवस्थेत त्याला झोप म्हणून येईना. चाफेकरांच्या फाशीचं दृश्य त्याच्या डोळ्यापुढं सतत सरळत असावं. चाफेकरांचं कार्य त्यांच्यानंतर कोणीतरी चालवायलाच हवं, ते त्यांच्या मृत्यूबरोबर संपता कामा नये हा विचार त्याच्या बालमनात सारखा थैमान घालीत राही. मग मीच ते काम का स्वीकारू नये? का

चालवू नये? असं त्याच्या अंगभूत स्वातंत्र्याकांक्षी मनाला जाणवू लागलं. मनाच्या अशा अवस्थेतच दोनचार दिवस गेलेत. शेवटी अंतर मनातील अशा अनावर आवेगातच विनायक-तात्यानं देवघरातील आपल्या कुलस्वामिनीकडेच सरळ धाव घेतली. कारण त्यावेळी तरी विनायक तरी विनायक-तात्यांची आपल्या कुलदेवतेवर विलक्षण दृढ अशी श्रद्धा होती. तिच्या पवित्र चरणांवर हात ठेवून तिची अनुमती घेऊन विनायक-तात्यानं प्रतिज्ञा घेतली, "माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी, मी सशस्त्र युद्धात शत्रूस मारीत चाफेकरासारख्या मरेन किंवा शिवाजीसारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकी स्वराज्याचा राज्याभिषेक करवीन.... यापुढे मी माझ्या देशाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून, मारिता मारिता मरेतो झुंजेन." (१८९९).

**राष्ट्रभक्तयसमहू-मित्रमेळा स्थापना :-**

किशोरवयीन विनायक-तात्यानं अवघ्या १५ व्या वर्षी देशस्वातंत्र्यासाठी सशस्त्र संघर्षाची अशी भीष्म प्रतिज्ञा केली. त्याची ही प्रतिज्ञा पोरसवदा वयातली बालीश पोरखेळ नव्हती. ती होती देशस्वातंत्र्यार्थ स्वीकारलेल्या साहसी जीवन नाट्याची नांदीच. त्याची पुढची वाटचाल नेमकी ह्याच दिशेने घडली. एव्हाना नासिकाचा प्लेयगचा कहर कमी झालेला होता. विनायक-तात्या नासिकला परतला तो हाच ध्यास घेऊन. पण नासिक त्यावेळी तरी राजकीय दृष्ट्या विलक्षण उदासिन गाव होतं. तरीही प्रतिज्ञाबद्ध विनायक-तात्याची दृष्टी समविचारी सहकाऱ्यांच्या शोधात सारखी भिरभिरत असायची. मनातला संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यासाठी समविचारी सहकारी मिळेपर्यंतचा विनायक-तात्याचा बराचसा वेळ वाचनात जायचा. त्याच्या वाचनाच्या वेडापायी तो 'पुस्तकातला किडा'च (book worm) मानला जाऊन थट्टेचा विषय ठरायचा. अशी एकप्रकारची अवहेलना होत असली तरी विनायक-तात्याच्या मनाला निराशा म्हणून अशी शिवली नाही. शेवटी

त्याच्या शोधक, चौकसदृष्टीला अपवाद म्हणून का होईना; पण म्हसकर नि पागे असे दोन समविचारी लाभले. म्हसकर तसे वयानं मोठे. ते सरकारी रुग्णाहलयात कर्मचारी होते. त्याच रुग्णालयात बाबा-विनायक-तात्याचे वडीलभाऊ आजारी म्हणून दाखल झालेले. बाबांचा नि म्हसकरांचा त्या रुग्णालयात परिचय झाला. बाबाकडूनच म्हसकरांना विनायक-तात्याविषयी बरीच माहिती मिळालेली होती. त्याच्याच परिणामी म्हसकर नि विनायक-तात्या परस्परांचे मित्र झाले. म्हसकरामुळेच पागेशी परिचय झाला.

समविचारी अशा रीतीनं एकत्र आले. त्यांच्यात मग विचारविनिमय, चर्चा होऊ लागल्या, बैठका झडू लागल्या. तिघांचंही एकमत होऊन शेवटी 'राष्ट्रभक्तच समूह' नावाची गुप्त संस्था स्थापन करण्यात आली. 'रामोहरी' हा गुप्त संघटनेचा संकेत-सूचक शब्द ठरला.

आरंभीच्या काळात ह्या संघटनेच्या बैठकी वेगवेगळ्या ठिकाणी फिरत्या होत्या. थोड्याच दिवसात 'मित्रमेळा' नावाची उघड आघाडी म्हणून स्थापन करण्यात आली. (१९००) ह्या उघड आघाडीच्या मंडळाच्यावतीनं 'गणेशोत्सव', 'शिवाजी उत्सव'सारखे वरवर धार्मिक-ऐतिहासिक; पण राष्ट्रप्रेम नि स्वातंत्र्याकांक्षा जागविणारे कार्यक्रम अगदी उघडपणे करण्यात येत असत. त्यातून चर्चासत्रे, व्याख्याने, पोवाडे, मेळे आदि कार्यक्रम प्रकटपणे साजरे केले जात असत. त्याद्वारे तरुण एकत्र येत, परिचय वाढायचा. अशापैकी पारख, परीक्षा केलेल्या पक्क्या तरुणांना मग 'राष्ट्रभक्तस समूह'. ह्या गुप्त संघटनेची दीक्षा देण्यात येत असे. ह्याही काळात विनायक-तात्याचं वाचन दांडगं होतं. तसंच होतं त्याचं वक्तृत्व. विलक्षण प्रभावी, अतिशय परिणामकारक असं. 'राष्ट्रभक्तस समूहा'च्या फिरत्या बैठकी थांबल्या. नगरकर आळीतील तीळभांडेश्वराच्या बोळीत अगदी भुयारासारख्या आबा दरेकराच्या खोलीत शेवटी शनिवारी, रविवारी बैठकी नियमितपणे झडायला लागल्या. ही जागा निश्चित ठरताच मग शिवाजी, प्रताप, झाशीची राणी आदि

स्वातंत्र्यवीराच्या प्रतिमा, चित्रे भिंतीवर झळकलीत. साप्ताहिक बैठकीत विनायक-तात्या मग आपल्या वाक्पटुत्वानं नि प्रभावी वक्तृगत्वानं आपले विचार श्रोत्यांच्या गळी उतरवीत असत.

समाधीटपणा, वक्तृपत्व आदि अंगभूत गुणांनी विनायक-तात्या एव्हांना नाशिकातील अनेक थोरामोठ्याच्या परिचयाचा झालेला होता. वाचन, वक्तृत्वाच्या जोडीला चळवळ्या स्वभाव ह्यामुळं त्याचे सर्वत्र कौतुकच होई. आरंभीच्या काळात राजकीय-राष्ट्रीयदृष्ट्या अतिशय उदासीन असलेल्या नाशिकात आता मित्रमेळ्याच्या विविध रंगी, अनेक ढंगी कार्यक्रमामुळे एक वेगळ्या प्रकारचं चैतन्य नाशिकच्या परिसरात निर्माण व्हायला लागलं. एक प्रकारचा आगळा जिवंतपणा दिसायला लागला. वक्तृ त्वाप्रमाणं विनायक-तात्या निबंधस्पर्धेतही भाग घेई. तीत तो प्रशस्ती वा पारितोषिकाचा मानकरी ठरायचाच. एवढ्या लहानवायत असं प्रभावी लिखाण, अशी आकर्षक लेखनशैली ह्यामुळं अनेकदा त्याच्या लिखाणाबाबत संशयसुद्धा व्यक्तख केला जाई. अशाच एकाप्रसंगी तर विनायक-तात्यानं ‘हवं तर आपण सर्वासमक्ष निबंध लिहून द्यायला तयार आहो’ असं मोठ्या धीटपणे बजावलंसुद्धा होतं. सारांश, अगदी लहान वयातच त्याच्या दांडग्या वाचनामुळं नि स्वयंभू, स्वतंत्र विचारशक्तीधमुळं त्याच्या लिखाणाला एक प्रकारची प्रौढता, परिपक्व्ता नि आकर्षकता आलेली होती.

**आबा दरेकर-स्वातंत्र्य शाहीर कवी गोविंद झाला :-**

वक्तृरत्वाची देणगी नि वाचनाच्या वेडाप्रमाणं विनायक-तात्याला कवित्व प्रतिभाही लाभलेली होती. तो बालपणापासूनच कविताही रचित असे. त्यामुळेच त्याच्या नाशिकच्या आबा दरेकरांशी सहज परिचय झाला. मोलमजूरी करून आबाची आई आपल्या ह्या पांगळ्या पोराचे पालन पोषण करायची. आबा गरीब नि पायांनी पांगळे असले, अशिक्षित असले तरी त्यांची जीवंत प्रतिभा विलक्षण प्रखर नि प्रज्वलंत होती. शीघ्र कवित्वाची

एक प्रकारची देणगीच त्यांना होती. उनाड स्वभाव नि टवाळखोर प्रकृतीच्या आबा दरेकरांच्या मित्रांचा एक दरबारच असायचा. त्यांची जिवंत प्रतिभा सतत श्रृंगारिक लावण्यातच रमत असायची. विनायक-तात्यानं त्यांचा प्रतिभागुण ओळखून त्यांना श्रृंगारिक लावण्या रचण्यात प्रतिभा राबविण्याऐवजी देशभक्ती पर कवणं करण्यात, देशगौरवाची गाथा गाण्यात पणास लावण्याची आर्जवी सूचना केली. तसेच वृत्ते समजावून सांगितलीत, शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी साहाय्य केलं. परिणामी लावणीकार आबा दरेकरांचा स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद झाला. श्रृंगारिक, लावण्यांच्या जागी 'सुंदर मी होणार, सुंदर मी होणार, मरणाने जगणार,' 'रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळेना.' अशा सुंदर पंक्ती त्यांची प्रतिभा प्रसवू लागली. हौताम्याची गौरव गीतं, देशभक्तीमची गाथा नि स्वातंत्र्याची स्तोत्रं ते आता गाऊ लागले. आबा दरेकर पांगळे, विनायक-तात्या त्यांना पाठीवर गरुडासारखे वाहून नेत. मेळ्यामेळ्यातून मग कवी गोविंद आपल्या वीररसपूर्ण स्वातंत्र्यगीतांनी, देशभक्तीहपर पोवड्यांनी बहार उडवून देत. अशा प्रकारे तरुणाचं जागरण करणं, त्यांना कार्यप्रवण करणं हा विनायक-तात्याचा सततचा उद्योग होता. परिणामी मित्रमेळ्याचे मेळे, उत्सावादि कार्यक्रम वाढत गेले. तसतशी 'राष्ट्रभक्ती समूह' ह्या गुप्त संघटनेही सदस्य संख्याही वाढत गेली. विनायक-तात्या जेथे कोठे जात तेथे मग 'राष्ट्रभक्त् समूह' ची शाखा काढीत. हळूहळू नाशिक परिसरात कोठूर, भगूर, त्रिंबकेश्वर आदि ठिकठिकाणी शाखा स्थापन झाल्या नि गुप्त संघटनेचा विस्तार वाढत गेला.

**शालान्त मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण-विवाह :-**

कुलदेवतेच्या साक्षीनं निर्धारपूर्वक केलेली प्रतिज्ञा अशा रितीनं प्रत्यक्ष कार्यकर्तृत्वात परिणत व्हायला लागली. शालेय शिक्षणाचा अभ्यास पूर्ण करीत असतानाही विनायक-तात्याला देशस्वातंत्र्यासाठी घेतलेल्या शपथेचा कधी विसर पडला नाही, तो पडणं शक्यच नव्हतं. शिक्षण ह्या

शपथेला पूरक ठरावं हीच विनायक-तात्याची मूळ नि मुख्य भूमिका होती, प्रमुख भावना होती. क्रमिक पुस्तकाच्या वाचनात डोकं खुपसून बसणं जमणचं शक्य नव्हतं. कारण सर्वोच्चा गुण, प्रथम क्रमांक, विषयात ह्यात त्याला मुळी रसच नव्हता. परीक्षा तोंडावर आली की मग शेवटच्या महिन्यात कसून अभ्यास करायचा नि परीक्षा उत्तीर्ण व्हायची हाच विनायक-तात्याच्या शैक्षणिक जीवनाचा क्रम होता नि शेवटपर्यंत तो तसाच राहिला. अशा प्रकारे अभ्यास, परीक्षा नि प्रत्यक्ष कार्य करीत असतानाच विनायक-तात्याच्या वडिलांचा मृत्यू झाला. आईच्या मायेचं छत्र केव्हाच नाहीसं झालेलं होतं. आता वडीलही पाठीशी उरले नाहीत. वडिलांच्या पाठोपाठ काकांनीही तीच वाट धरली. घरात वडील बंधु गणेशपंत-बाबा हेच काय ते वडील माणूस. सारा भार त्यांच्यावरच येऊन पडला. बाबारावांनी तो मोठ्या समर्थपणे सांभाळला. विनायक-तात्याच्या शिक्षणात कसलाही खंड तर पडू दिला नाहीच; पण कोडकौतुकातही कसली म्हणून उणीव भासू दिली नाही, पोरकेपण जाणवू दिलं नाही. अशा स्थितीत शासकीय शाळेतून विनायक-तात्या मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला. (१९०१). (ह्यानंतर विनायक-तात्याचा उल्लेख केवळ सावरकर असाच). सावकरांचं वय ह्यावेळी असेल सोळा सतरा वर्षाचं. ह्याच काळात त्यावेळच्या प्रथापद्धतीनुसार त्यांच्या मामांनी लग्नाचा विचार मांडला. विनायकाला तर पुढच्या उच्चप शिक्षणाचा ध्यास लागलेला. सुखवस्तु, सधन घराण्याची आर्थिक स्थिती एव्हाना विलक्षण ढासळलेली. वडिलांच्या नि काकांच्या मृत्यूनंतर ह्या घराण्याचे सारेच ग्रह फिरलेले होते. अशावेळी लग्नय शिक्षणात अडसर म्हणून तर होणार नाहीच, उलटपक्षी ते साहाय्यकच ठरण्याचा संभव अधिक अशा निश्चित शब्दात त्यांच्या सासऱ्याच्या वतीनं त्यांच्या मामानं त्यांना आश्वस्थ केलं. सावरकरांनी मग लग्नाबला मान्यता मान्यता दिली. जव्हार संस्थानच्या दिवाणपदी असलेल्या भाऊराव चिपळूणकरांच्या मुलीशी सावकरांचा विवाह मोठ्या थाटामाटात साजरा झाला.

**पुणे-फर्ग्युसन महाविद्यालयात :-**

सावरकर मॅट्रीक झाले. त्यांचा विवाह ह्याच वर्षी झाला. पुढील महाविद्यालयीन उच्चभ शिक्षणासाठी त्यांनी पुणं गाठलं. पुण्याच्या सुप्रसिद्ध फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी प्रवेश मिळविला. नाशिकसारख्या राजकीय दृष्ट्या अतिशय उदासिन नि कृतीशून्य गावात सावरकरांनी आपल्या कार्यकर्तृत्वानं एक प्रकारचा जिवंतपणा आणलेला होता. पुणे तर राजकीय दृष्ट्या अतिशय जागरूक नगर. ते जसं विद्येचं माहेर होतं तसंच होतं सर्वप्रकारच्या राजकीय-राष्ट्रीय घडामोडीचं केंद्र. अशा जिवंत जागरूक गावात सावरकरासारख्या चळवळ्या स्वभावाच्या प्रतिज्ञित स्वातंत्र्य भक्तायच्या कामाला गती, वेग येणं स्वाभाविकपणे अगदी अटळ होतं. कारण पुणे म्हणजे स्वातंत्र्य, स्वराज्याची पुण्यभूमी. शिवाजी-बाजीच्या ह्या पराक्रमपावन भूमीत 'लालमहल' नि 'शनिवारवाडा' साक्षीला उभा होताच. वीर वासुदेव बळवंत फडक्यांनी इंग्रजी सत्तेपुढं सशस्त्र उठावाचं आव्हान उभं केलं ते ह्याच पुण्याच्या परिसरात. इंग्रजी अन्याय, अत्याचाराचा चाफेकर बंधू नि रानडे ह्यांनी प्रतिशोध घेतला तो ह्याच पुण्यात. सावरकरांना स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा लोकमान्यांचा 'केसरी' ह्याच पुण्यात त्यावेळी गर्जत होता. त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेणारा परांजप्याचा 'काळ' ह्याच पुण्यातून प्रकाशित होत असे. सारांश, सावकरांच्या प्रकृती-प्रवृत्तीला पोषक, त्यांच्या आशा-आकांक्षाना आकार देणारं, त्यांच्या कार्यकर्तृत्वाला कसाला लावणारं वातावरण त्यावेळी पुण्यात होतं. अशा गावात मग सावकरांनी मोठ्या उत्साही, उल्हसित नि उत्तेजित मनानं दाखल होणं अगदी साहजिकच ठरलं. महाविद्यालयात प्रवेश मिळताच सावरकरांनी फर्ग्युसनच्या वसतीगृहातच राहण्याची आपली सोय करून घेतली.

**सावरकर कॅम्प :-**

उक्तीर तशी कृती, विचार तसा आचार अशा वर्तन व्यवहारातून व्यक्ती होणाऱ्या  सावरकरांच्या जातीवंत तळमळीमुळे ते जातील तेथे नेतृत्व त्यांच्याकडे आपोआप चालत येई. आकर्षक व्यक्तिळमत्वाला लाभलेल्या प्रामाणिक नि नैष्ठिक वागणूकीमुळे पुण्यातही तरुण विद्यार्थी वर्ग आपोआपच त्यांच्याभोवती जमा व्हायला वेळ लागला नाही. मग काय? नाशिकप्रमाणे पुण्यातही त्यांनी आपल्या कामाचं सूतोवाच न केलं असतं तरच आश्चर्य. वसतीगृहात मग 'राष्ट्रभक्तळ समूह' च्या धर्तीवर बैठकी भरायला लागल्या. शिवरायाच्या उत्सवाच्या निमित्तानं मग प्रत्यक्ष वसतीगृहातच स्वातंत्र्याची पूजा व्हायला आरंभ झाला. महाविद्यालयाच्या मागील टेकडी वजा परिसरात सावरकर मित्रमंडळाची गुप्त खलबते आरंभ झाली. तरुन सावरकरांची जातिवंत प्रतिभा बहरास आली. 'शिवरायाची आरती', 'बाजीप्रभू', 'सिंहगड' ह्यावरील गाजलेल्या पोवड्यांचा काळ जवळपास हाच. वीररसप्रधान ह्या पोवाड्यातून दिल्या जाणाऱ्या  स्वातंत्र्याचा संदेश ह्यामुळे पोवाडे प्रकटपणे गाणं अशक्यच होतं. पण मग घरोघरी ह्या पोवाड्यांची गुप्तपणे 'पारायणं' व्हायला लागली. 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' महाविद्यालयीन काळातलेच. चौकटी बाहेर ज्यांची दृष्टी जाऊच शकत नव्हती असे सरळमार्गी, व्यवहारी प्राध्यापक सावरकरांचे कार्य म्हणजे आत्मघातकी उपद्व्याप समजत. त्यांच्या मित्रमंडळाचा कुत्सितपणे, तुच्छतेने 'सावरकर कॅम्प' म्हणून उल्लेख करीत असत. 'अरे, हां सावरकर त्याच्या ह्या वेडापायी आपल्या घरादारावर नांगर तर फिरवणारच; पण तो तुमच्या घरादाराची पण राखरांगोळी करील' अशा शब्दात भय सूचना देत. 'सावरकर कॅम्प' च्या एकीत बेकीची बीजं पेरण्याचाही प्रयत्न् करीत असत. परंतु अशा भय सूचनांना भीक घालण्याइतका 'सावरकर कॅम्प' रोडावला तर नाहीच उलट अधिकाधिक बाळसे धरीत वाढतच गेला, विस्तारतचं गेला. फर्ग्युसन कॉलेजचा परिसर ओलांडून 'कॅम्प'नं डेक्करन महाविद्यालयाच्या

परिसरात पाऊन टाकलं नि तेथेही आपले पाय पक्के रोवण्यात अपेक्षित यश मिळविलं.

## राष्ट्रभक्ता समूहाचं विशालरूप-अभिनव भारत :-

अंतःकरणातील स्वातंत्र्याची अनावर ऊर्मी, अंगभूत तळमळ, त्यासाठी आवश्यक त्या चळवळ्या स्वभावाच्या जोडीला असलेली प्रभावी वक्तृत्वाची देणगी, डोळ्यात भरणारं कर्तृत्व ह्यामुळं सावरकरांच्या व्यक्तिमत्वाला अगदी किशोरवयातच एक आगळं तेजोवलय लाभलेलं होतं. नाशिकला शालेय शिक्षण घेत असताना जसं तेथील थोरामोठ्यांनी त्यांचं कौतुक केलं, त्यांना प्रोत्साहन दिलं; तसंच नेमकं पुण्यातही घडलं. ते तसं स्वाभाविकही होतच होतं, पुण्यात आता तरुण सावकरांचा लोकमान्य टिळक नि शिवरामपंत परांजपे आदि जेष्ठ नि श्रेष्ठ नेत्यांशी परिचय झाला, संबंध आला. नाशिकला त्यांनी तत्कालीन मित्रांच्या साहाय्यानं 'राष्ट्रभक्ती समूह- मित्रमेळा' ह्या संघटना स्थापन केलेल्या होत्याच. आता तर तरुण सावरकराचं कार्यक्षेत्र विस्तारलं होतं. वाढत्या विस्ताराला अनुरुप असं संघटनेचं नामकरण करणं सावरकरांना आवश्यक वाटलं. नाशिककर मित्र नि पुण्यातील तरुण सहभागी अशा उभयतांच्या सन्मातीनं मग सावरकरांनी पाऊल उचललं नि 'अभिनव भारत' असं अतिशय सूचक नि समर्पक नामकरण केलं. (१९०४)

## पुणे-विदेशी वस्तूंची होळी :-

हा काळही देशात मोठ्या क्षोभ-प्रक्षोभाचाच होता. बंगालच्या फाळणीच्या निर्णयामुळे बंगालमधील तरुण वर्ग विलक्षण संतप्त होता. असंतोष तेथे धगधगत होता. चिडलेला तरुण वर्ग चवताळून उठला. तेथे स्वदेशीचा स्वीकार नि विदेशीचा धिःकार करण्याची चळवळ आरंभिली गेली नि ती दिवसागणिक फोफावत गेली. ह्या आंदोलनाचं लोण महाराष्ट्रातही पोचलं. ह्याच संदर्भात मग पुण्यात साहित्य सम्राट न. चि.

केळकरांच्या अध्यक्षतेखाली एक सभा आयोजित करण्यात आली होती. 'सावरकर कॅम्प'च्या काही निवडक सावरकर सभेला गेले. चर्चा, भाषणं, निषेधपत्र, आवेदनं नि त्याला अनुसरून ठरावादि ठराविक साच्याचे सर्व सोपस्कार ह्याही सभेत कार्मकांडाप्रमाणे पार पडतील ह्याची सावकरांना अर्थातच जाणीव होती. नेमकं तेच झालं. सावरकर सभेत उठून उभे राहिले. निषेध नोंदवायचा; पण तो तरी परिणामकारक ठरावा नि त्यासाठीच विदेशी वस्तूची प्रकटपणे होळी करण्यात यावी अशी सूचना त्यांनी सभेत मांडली. त्यांची ही सूचना ऐकताच सारी सभा अवाक् झाली. ध्यानीमनी नसताना प्रकटपणे केलेल्या सूचनेमुळे अध्यक्षही गडबडून गेले. पण 'काळ' कर्ते शिवरामपंत परांजप्यांनी मात्र सावरकरांची कृतीपर सूचना उचलून धरली. आता मात्र सर्वांचीच पंचाईत झाली. परंतु प्रसंगावधान साधून अध्यक्षांनी कोंडी फोडण्याचा प्रयत्नक केला. लोकमान्य टिळक त्या दिवशी पुण्यात नसल्यामुळे सभेतही नव्हते. त्यांच्या कानावर सूचना घालावी, त्यांच्या विचारानं नि अनुमतीनंच काय तो निर्णय घ्यावा असं ठरवून सभेची त्या दिवशी समाप्ती करण्यात आली.

त्या दिवशी प्रसंग टळला खरा; परंतु निकालात निघालेला नव्हता. लोकमान्यांच्या खंबीर नेतृत्वावर सावरकरांचा अर्थातच विश्वास होता. दुसऱ्या दिवशी 'सावरकर कॅम्प' नं लोकमान्यांची भेट घेतली. सभेनं वृत्त त्यांच्या कानावर गेलेलं होतंच. तरुणांच्या उत्साहावर पाणी ओतणं लोकमान्यांसारख्या कृतीवीराच्या प्रकृतीत नव्हतं. परंतु उत्साह केवळ उतावीळपणातून केलेला आगखाऊपणा ठरता कामा नये ही त्यांची भूमिका होती. उत्साह ठीक; पण तो कसाला उतरून खरा ठरावा म्हणून सूज्ञ नि व्यवहारी लोकमान्यांनी सूचनावजा अट घातली. विदेशी वस्तूची होळीच पेटवायची नि तीही प्रकटपणे. तर ती नुसती प्रतिकात्मक नाही तर परिणामकारक ठरावी म्हणून निदान गाडा भरून वस्तू जमविण्याची अट 'सावरकर कॅम्प' च्या उत्साही तरुणापुढे मांडली. 'सावरकर

कॅम्प'नंही लोकमान्याचं ते आवाहन एक आव्हान म्हणून तेवढ्याच उत्साहानं स्वीकारलं नि आपल्या नेत्याची अनुमती मिळविली.

**होळीप्रसंगी पहिलं प्रकट व्याख्यान :-**

दुसऱ्या दिवशी विजया दशमी म्हणजे दसरा होता. 'सावरकर कॅम्प' च्या कार्यकर्त्यांनी घरोघर हिंडून अक्षरशः गाडाभर विदेशी वस्तू गोळा केल्या. विदेशी वस्तूंनी भरलेला तो गाडा मग मोठ्या मिरवणुकीनं अगदी वाजत गाजत डेक्कान जिमखान्याजवळ आणण्यात आला. मिरवणुकीत शिवरामपंत परांजपे, भोपटकरासारखे नेते सहभागी झालेले होते. मध्येच लोकमान्य टिळकही काही काळ मिरवणुकीत उपस्थिती लावून गेले. डेक्कोन जिमखान्याच्या परिसरात विदेशी वस्तूची अगदी व्यवस्थित होळी रचण्यात आली नि मग साग्रसंगीत पद्धतीनं अगदी प्रकटपणे ती पेटविण्यात आली. राष्ट्रीय जनजातृतीच्या ह्या प्रेरक होलीकोत्सवात लोकमान्य टिळक अर्थातच उपस्थित होते. उत्सवात शिवरामपंत परांजप्यांनी त्यांच्या विशेष ढंगदार शैलीत मोठं नाट्यमय भाषण दिलं. त्यांच्यानंतर तरुण सावरकरांनी आपलं पहिलं प्रकट व्याख्यान केलं. कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. होळी पूर्णपणे विझेपर्यंत तरुण आयोजकांनी तेथेच थांबावं अशी सूचना करून लोकमान्यासह सारेच जेष्ठ नेते घरी परतले. लोकमान्यांच्या सावधतनेच्या सूचनेप्रमाणे तरुण कार्यकर्त्यांनी होळी विझेपर्यंत तिचे रक्षण केले नि नंतरच ही कार्यकर्ती मंडळी पांगली.

**होळी प्रकरणी दंड नि शिक्षा :-**

सावरकर महाविद्यालयीन विद्यार्थी. विद्यार्थ्यांनी राजकीय चळवळीत भाग घेता कामा नये असा दंडकच त्यावेळी प्रस्थापित झालेला होता. सावरकर नुसते ह्या प्रकरणी सहभागीच काय ते नव्हते तर त्यांनी होळी प्रकरणाचे पुढारीपण केलेलं होतं नि प्रकट व्याख्यानही दिलेले होतं.

म्हणजे त्यांनी एक प्रकारे अक्षम्य अपराधच केलेला होता. दुसऱ्या दिवशी लगेच त्यांना प्राचार्यांचं बोलावणं झालं. त्यावेळी त्यांचे प्राचार्य होते रँगलर र. पु. परांजपे. होळी प्रकरणाचे पुढारीपण नि प्रकट व्याख्यानाच्या अपराधासाठी त्यांनी सावरकरांना दहा रुपये दंड तर ठोठावलाच; पण त्याचवेळी तत्काल वसतीगृह सोडून जाण्याचा आदेश बजावला. 'सवरकर कॅम्प' नं तेवढ्याच तत्परतेनं वर्गणी गोळी करून दंड भरला. वसतीगृहातील कोणी जोगळेकर नावाचा विद्यार्थी लगेच पुढे सरसावला. त्यानं स्वतःच्या खोलीत सावरकरांची सोय करण्याचं धैर्य दाखवून सवरकरांवर वसतीगृह सोडून जाण्याची वेळ येऊ दिली नाही. प्राचार्यांनी आपली शिस्त म्हणजे शिस्त, त्यात कसलीही सोय सवलत नाही, दया माया नाही असल्या प्रकारच्या कृतीनं आपण ब्रिटिशांपेक्षाही कांकणभर अधिकच ब्रिटिशनिष्ठ असल्याचं दाखवून दिलं. पण दुसऱ्याच दिवशी लोकमान्यांनी 'हे आमचे गुरूच नव्हेत.' ह्या शिर्षकाचा जळजळीत टीका करणारा लेख केसरीतून लिहिला.

होळी प्रकरणात सावरकरांना करण्यात आलेली दंडाची शिक्षा, त्यासाठीच त्यांना वसतीगृहातून बाहेर हाकलण्याचा दिलेला आदेश नि त्यामुळे लोकमान्य टिळकांसारख्या नेत्यानं त्याची नोंद घेऊन केलेली खरमरीत टीका ह्यामुळं झालं काय तर सावरकर हे नाव महाराष्ट्राची सीमा ओलांडून पंजाबात पंजाब केसरी लाला लजपतराय ह्यांच्या कानापर्यंत पोचलं. महाविद्यालयातील सावरकरांचं हे शेवटचचं वर्ष होतं. त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणं सावरकरांनी आता आपलं सारं लक्ष अभ्यासावरच केंद्रीत केलं नि अपेक्षेप्रमाणे सावरकर पहिली पदवी परीक्षा बी. ए. उत्तीर्ण झाले. (१९०५)

**मुंबई - 'विहारी'च्या संपादक मंडळावर :-**

पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सावरकरांनी विधी विषयक (कायदा-लॉ) अभ्यासासाठी मुंबईच्या विधीमहाविद्यालयात प्रवेश केला. मुंबईच्या

वास्तव्यात त्यांना एक मोठी संधी लाभली. कारण त्यांच्या वक्तृवत्वाचा नि प्रतिभेचा प्रभाव एव्हाना मुंबईपर्यंत पोचलेला होताच. ‘विहारी’ नावाच्या प्रतिष्ठाप्राप्त साप्ताहिकाच्या संपादक मंडळात काम करण्याचं त्यांना निमंत्रण मिळालं. त्यांच्या प्रज्ञा-प्रतिभेला विपुल वाव असलेली ही सोन्यासारखी संधी अगदी विनाप्रयास सहज चालून आलेली होती. ह्या साप्ताहिकात काम करीत असतानाच त्यांच्या प्रतिभेचा रम्य कल्पनाविलास असलेला ‘वंदेमातरम्’ हा लेख त्यांनी लिहिला.

**शिवाजी शिष्यवृत्तीचे मानकरी-लंडनला प्रयाण :-**

मुंबईच्या वास्तव्यातच लंडन मध्ये स्थायिक झालेल्या पं. शामजीकृष्ण वर्मा ह्यांच्या ‘इंडियन सोशॉलॉजिस्ट’ ह्या इंग्रजी साप्ताहिकाचा अंक त्यांच्या हाती पडला. त्यात इंग्लंडडसारख्या स्वतंत्र देशात राहून राजकीय तत्त्वज्ञान नि व्यवहार ह्यांचा अभ्यास करता यावा म्हणून स्वातंत्र्याकांक्षी, देशाभिमानी नि होतकरू तरुणासाठी शिष्यवृत्ती देण्याची रुपरेखात्मक मांडणी केलेली होती. पंडितजीविषयी सावरकरांना केसरीतून वाचलेल्या लेखामुळं माहिती होतीच. स्वतंत्र देशातील लंडनसारख्या राजधानीत उच्च शिक्षणांची ही सुवर्णसंधी होती. सावरकरांच्या क्रांतीकार्याला ती विशेष पोषक होती. शिष्यवृत्तीसह ‘इंडिया हाऊस’ नामक वसतीगृहाची थोडक्या खर्चाची सोयही पंडितजींनी केलेली होती. वेळ निघून गेलेली होती खरी. पण त्याची फारशी नोंद न घेता सावरकरांनी आवेदन (अर्ज) खरडलं नि लगेच ते रवानाही केलं. लगेच अवधान साधून त्यांनी पुणे गाठलं. पुण्यात त्वरीत टिळकांची तशीच शिवरामपंत परांजप्यांचीही भेट घेतली. अपेक्षेप्रमाणं उभयतांनी त्यांच्या नावाचा अनुरोध करणारी पत्रं दिली. एवढंच नाही तर उशीर झालेला असला, अनेकानेक स्पर्धकांची आवेदने असली तरीही सावरकरांच्या नावाचा विशेष विचार आवश्यकतेने केला जावा म्हणून लोकमान्यांनी पं. शामजीना विशेष पत्र लिहिलं. योग नेमका जुळून

आला. लोकमान्य टिळकांसारख्या नेत्यानं आग्रही विनंती केल्यामुळे सावकरांची निवड निश्चित झाली. 'शिवाजी शिष्यवृत्ती' चे मानकरी ठरून त्यांना लंडनला जाण्याची संधी लाभली. ह्या शिष्यवृत्तीची एक महत्त्वाची मोठीच अट होती ती आयुष्यात इंग्रजी सत्तेची नोकरी न पत्करण्याची, परंतु सावरकरांसाठी ती मुळी अटच (कंडीशन) नव्हती. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी 'मारिता मारिता मरेतो झुंजेन' ची प्रतिज्ञा करणाऱ्या. नि त्यानुसार कार्यरत असणाऱ्या सावरकरांची तर ती विशेष पात्रता (क्वालिफिकेशन) होती. लोकमान्यांनी त्यांच्या पत्रात सावरकरांना होळी प्रकरणात झालेल्या शिक्षेचाही उल्लेख केलेलाच होता. सावरकरांनीही अगदी स्पष्ट शब्दात आपली भूमिका पत्राद्वारे पंडितजींना कळविली होती. लंडन प्रवासाला आवश्यक ते सर्व सोपस्कार पूर्ण करून सावरकरांनी लंडनला जाण्यासाठी 'पर्शिया' आगनावेवर पाऊल टाकलं. (६ जून १९०६) साधारणपणे पंधरावीस दिवसांच्या जलप्रवासानंतर जुलैच्या पहिल्या हप्त्यात सावरकरांनी लंडनच्या भूमीवर पाय ठेवला. लंडनला ते पोचण्यापूर्वीच त्यांच्याविषयीची गुप्त माहिती देणारं पत्र पुणे विभागीय कार्यालयातून रवाना झालेलं होतं. (१४ जून, १९०६)

अभ्यासात प्रथम क्रमांक, विषयातील प्राविण्य, पदवी ह्यात सावरकरांना विशेष रस नि रुची नव्हतीच. त्यांच्या अंगीकृत स्वातंत्र्य संपादनाच्या कार्यात ह्या बाबींना गौणच स्थान होतं. लंडनला जाण्यातही बॅरिस्टरीची उपाधी हे केवळ निमित्त होतं. स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या विचाराचा प्रसार-प्रचार, त्यासाठी आवश्यक ती संघटना बांधणी, तिचा विस्तार, तसंच शस्त्रास्त्रांचा अभ्यास आदिसाठी आवश्यक ती संघटना बांधणी, तिचा विस्तार, तसंच शस्त्रास्त्रांचा अभ्यास आदिसाठी लंडन हे सावरकरांना महत्त्वाचं होतं. कारण लंडन म्हणजे इंग्रजी साम्राज्याच्या राजधानीचं स्थळं. त्या काळात तेथे हिंदुस्थातून विविध भागातून सधन, श्रीमंत घराण्यातील तरुण शिक्षणासाठी येणार. थोरामोठ्यांच्या सदैव भेटी ह्याच नगराला लाभणार आदि बाबी सावरकर

जाणून होते. आपल्या प्रतिज्ञेप्रमाणं आपल्या व्रताच्या परिपूर्तीसाठीच सावरकरांनी लंडनचा मार्ग धरला होता. सावरकराचं ध्येय पक्कय होतं. त्यांचं धोरण निश्चित होतं. लंडन प्रयाणामागची त्यांची हीच भूमिका होती, अन्य नाही. स्वीकृत ध्येयधोरणानुसार त्यांच्या व्रती भूमिकेचा शुभारंभ त्यांनी त्यांनी लगेच जलप्रवासातच केला.

**आगनावेवर कार्यारंभ :-**

परदेशाचा सावरकरांचा हा पहिलाच प्रवास. एकटेच होते, परिचित असा सोबतीलाही कोणीच नव्हता. गप्पाटप्पा करण्याची सोयसंधी अशी नव्हतीच. आगनावेनं भारताचा तट सोडताच सावरकरांनी आपल्या राखीव कक्षेची (केबीन) विचारपूस करून शोध घेतला. आंत प्रवेश करताच त्यांच्या प्रवास त्यांच्या प्रवास कक्षेत एक उमदा, आकर्षक तरुण आपल्या सामानाची ठेवाठेव करताना त्यांच्या दृष्टीस पडला. तोही पाटीवरील नाव वाचून आपला सहप्रवासी एक भारतीयच असल्याच्या समाधानात त्यांची वाटच पाहत होता. प्रवेश करताच तो उद्गारवा, “आपणच का मि. सावरकर? मी आपलीच वाट पाहात होतो.” नाव वाचून समाधान वाटणारा. पण बराच वेळ लागल्या कारणानं किंचित चिंतेत पडणारा परंतु प्रत्यक्ष पाहताच आनंद व्यक्तत करणारा सावरकरांचा हा कक्षभागीदार होता एक तरणाबांड, पंजाबी शीख. पंजाबातील नाभा संस्थानच्या महाराजांची शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) घेऊन तो उच्च शिक्षणासाठी लंडनला निघालेला होता. ह्या शीख तरुणाचं नाव हरनामसिंग. आईचा एकुलता एक नि कोवळ्या मनाचा हा शीख तरुण आईच्या आठवणीनं अगदी व्याकूळ होता. आईपासून इतक्या दूर ह्या भावनेनं, आठवणीनं, अगदी दूरच्या नवख्या देशात इतके दिवस राहण्याचा नुसत्या विचारानंच तो अगदी कासावीस झालेला होता. त्याच्या जीवाची विलक्षण अशी घालमेल होऊ लागलेली होती. त्यातच त्याला नौका प्रवासाचा त्रास होऊन सारख्या उलट्या होऊ लागल्या.

त्याचा जीव अगदी रडकुंडीला आला नि मग एडनपासून परतायचा तो विचार करू लागला. सावरकरांनी त्याला खूप साहाय्य केलं, त्याला धीर दिला. आईच्या आठवणीनं होणारी मनाची व्याकुळता म्हणजे दुबळेपणा नाही. ते तर ममत्व, जिव्हाळा, प्रेम अशा शब्दांनी त्याचं सांत्वन तर केलेच; परंतु त्याच वेळी आईची आई जी आपली भारतमाता तिची पारतंत्र्याने केलेली दैन्नायवस्था ह्या विषयी त्याचं मन जागृत केलं. क्लाईव्ह, हेस्टिंग्ज आदि मंडळी अशाच तरुणवयात इतक्या सुदूर हिंदुस्थानात आलीत नि हां हां म्हणता व्यापार करीत त्यांनी हिंदुस्थानावर आपलं स्वामित्व प्रस्थापित कसं केलं ह्याविषयी सांगून त्याचं वैचारिक परिवर्तनचं घडवून आणलं. सावरकरांच्या बोलण्याचा नेमका परिणाम त्या कोवळ्या मनाच्या हरनामसिंगवर घडून आला. आपणही आता त्यांच इंग्रज्यांच्या देशात जाऊन, शिकून, सवरून आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्नत करायला नकोत काय? असल्या प्रश्नवजा युक्तीमवादपटुत्वानं हरनामसिंगची विचारदिशाच पार पालटून गेली. एडनपासून परत जाण्याचा विचार तर त्यानं पार झटकणूच टाकला. एवढ्यावरच न थांबता सावरकरांच्या चुंबकीय सान्निवध्यात त्यानं 'अभिनव भारत' ह्या गुप्त संघटनेची शपथही घेतली. शपथेप्रमाणं तो तसाच वागला. लंडनमध्ये तो सावरकरांच्या सर्व कार्यात सक्रीय सहकारी राहिला. त्यासाठी त्यानं आपली पदवीसुद्धा गमावली. लंडनच्या जलप्रवासात अन्य दोघां प्रवाशांचंही सावरकरांनी असंच पूर्ण परिवर्तन घडवून आणलं. तेही 'अभिनव भारत'चे प्रतिष्ठित सदस्य झालेत. अर्थात त्यांनी आपलं नाव उघडपणानं येता कामा नये ही अट घातली होती. सावरकरांनी ती मान्य केली नि तशीच अगदी शेवटपर्यंत पाळली. त्यांच्या 'शत्रूच्या शिबिरात' ह्या आत्मचरित्रपर भागात सावरकर त्यांची नाव न लिहिता त्यांचा उल्लेख 'केशवानंद' नि 'शिष्टाचारी' असाच करतात. हे शिष्टाचारी महाशय इंग्रजी राहणीत अगदी मुरलेले होते. जेवणातील काटाचमच्यापासून तो डोईवरील 'टॉपहॅट'शी ते अगदी परिचित. वेष

सुटबूट असा नि वर मात्र पंजाबी फेटा बांधलेल्या हरनामसिंगकडे पाहून इंग्रज प्रवाशांची टारगट मुलंबाळं टवाळखोरपणे हसत असत. हरनामसिंगनं फेटा बांधू नये अशी सूचना करण्यात हेच शिष्टाचारी होते. त्यांच्या सूचनेचा सरळ अव्हेर न करता सावरकरांनी आपण सर्वच फेटा बांधू असा उपाय सांगितला. आपलं राज्य असताना ह्याचीही अशीच थट्टा व्हायची. त्यांचा उल्लेख पेशवाईत 'लालतोंडे' असा होत असे वगैरे सांगून त्या वातावरणात आपलं भारतीयत्व टिकविण्याचा प्रयत्ना केला. सावरकर त्यामुळेच ज्यांचा उल्लेनख 'शिष्टाचारी' करतात. त्यांनाही सावरकरांच्या विचारांनी असं प्रभावित केलेलं होतं.

**लंडन जल प्रवासात :-**

सावरकर अनेकदा विलक्षण अंतर्मुख होत असत. अशा वेळी ते नौकेच्या फलाटावर येत असत. एकदा ते असेच फलाटावर असतांना वर तारकांनी खचखचून भरलेलं अफाट निळं आकाश नि खाली नितळ, निळा अथंग सागर पाहून कवी सावरकरांची प्रतिभा जागृत झाली नि तेथेच 'तारकास' नावाची कविता रचली.

सुनील नभ हे, सुंदर नभ हे, नभ हे अतुल अहा
सुनील सागर, सुंदर सागर, सागर अतलचि हा
नक्षत्राही तारंकीत हे नभ चमचम हासे
प्रतिबिंबाही त्या सागरहि तारंकीत भासे
नुमजे लागे कुठे नभ, कुठे जल सीमा पाही
नभात जल ते जलात नभ ते संगमुनी जाई
खरा कोणता सागर ह्यातुनि, वरती की खाली
खरे तसे आकाश कोणते, गुंग मती झाली
आकाशिचे तारे सागरी प्रतिंबिबित होती
किंवा आकाशी हे बिंबति सागरीचे मोती.

इतिहास पुराणातील अनेकानेक दृष्टांत, तसेच विविध उपमा, उत्प्रेक्षांची ह्या कवितेत उधळण असून 'तयाचि तारे म्हणूनि ज्योतिषी भले भले चकले' ह्या ध्रुवपदानं प्रत्येक चरण सजविलेलं आहे.

**'ग्रेजइन' प्रवेश-भारतभवन वसतीगृहातः-**

लंडनला पोचताच सावरकरांनी सर्वप्रथम आपल्या शिष्यवृत्तीदात्या पं. शामजीकृष्ण वर्माची भेट घेतली. पंडितजीनीच भारतीय विद्यार्थ्यांसाठी काढलेल्या 'इंडिया हाऊस' मध्येच त्यांची राहण्याची सोय झाली. हरनामसिंगसुद्धा त्यांच्या सोबतच होता. वरकरणी का असेना, हेतू गौण का असे ना; पण सावरकर बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी लंडनला गेलेले होते. त्याप्रमाणं त्यांनी 'ग्रेजइन' नावाच्या संस्थेत आपलं नाव नोंदविलं. लंडनला पोचून पुरता हप्तासुद्धा झाला असेल नसेल, लंडनच्या संसदेत हिंदुस्थान विषयक अर्थसंकल्प चर्चेला येणार ही माहिती मिळताच सावरकरांनी संबंधित अधिकाऱ्याला आवेदन करून हरनामसिंगसह उपस्थित राहण्याची अनुमती मागितली नि ती मिळताच ते संसदेत उपस्थित राहिले. लगेच दुसऱ्याच दिवची त्यांनी 'हिंदुस्थाना तुला पचेल ते तू खा', असा लेख 'विहारी' साप्ताहिकात प्रकाशित करण्यासाठी रवाना केला. सावरकर ज्या 'इंडिया हाऊस' मध्ये राहत त्याचा कारभार हळूहळू त्यांच्या हाती येताच त्यांनी त्याचं 'भारत भवन' असे नामकरण केलं नि ते रुढही केलं.

'इंडिया हाऊस-भारत भवन' हे भारतीय विद्यार्थ्यासाठीच उभं केलेलं वसतीगृह. लंडनला येणाऱ्या विद्यार्थ्यांची कमी खर्चात सोय व्हावी म्हणूनच पंडित श्यामजीकृष्ण वर्मानी हे वसतीगृह काढलेलं होतं; पण लंडनला इतरत्र राहणाऱ्या विद्यार्थ्यांचीही तेथे सारखी ये-जा असायची. सावरकरांच्या कार्याच्या दृष्टीनं ही बाब तर सर्वाधिक महत्त्वाची होती. जलप्रवासातच त्यांनी तिघांना अभिमन भारताची दीक्षा देऊन आपल्या कार्याचा श्रीगणेशा केलेला होताच; पण शेवटी 'अभिनव भारत' ही

क्रान्तीकारक देशभक्तांची एक गुप्त संस्था होती. उघडपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांतूनच ह्या गुप्तसंघटनेचा आवाका विस्तृत होणं शक्य होतं. 'राष्ट्रभक्त् समूह' च्या जोडीला जशी सावरकरांनी 'मित्रमेळा' ही संघटना काढली होती त्याच धर्तीवर आता लंडनमध्ये त्यांनी 'फ्री इंडिया सोसायटी' नावाची उघड संस्था स्थापन केली. भारतभवनात असणाऱ्या नि येणाऱ्या प्रत्येक भारतीय तरुणाला सावरकरांची शोधक दृष्टी टिपत असे. अशा सर्वांच्या सहभागासाठी म्हणूनच त्यांनी ही उघडसंस्था काढली. लंडनमधील भारतीय तरुणांचा परस्परांशी परिचय व्हावा, त्यांची एक संघटीत शक्ती उभी करावी, हा उघड संस्था काढण्यामागचा हेतू होता. त्यात तावून, सुलाखून निघणाऱ्याला अभिनव भारताची मग दीक्षा द्यावी ही सावरकरांची दूरदर्शी भूमिका होती. ह्या 'फ्री इंडिया सोसायटी'च्या वतीनं सावरकरांनी तरुणांची सभासम्मेलने भरविण्यास आरंभ केला. त्यासाठी व्याख्याने आयोजित केली. 'शिवाजी उत्सव', 'श्री गुरुगोविंदसिंग जयंती' तसंच 'विजयादशमी' (दसरा) उत्सव साजरे केले. एकदा विजया दशमीच्या उत्सवाचं अध्यक्षपद त्यावेळच्या बॅ. मो. क. गांधी ह्यानी भुषविलेलं होतं. कारण त्याकाळी गांधी आफ्रिकेत बॅरिस्टरी करायचे. ते लंडनला येत जात असत. भारत भवनालाही ते अनेकदा भेटी देत असत.

सावरकर भारत भवनात राहत असताना सभा, व्याख्याने, उत्सवादिंची अशी एकच धमाल होती. त्यांचं आकर्षक व्यक्तिसमत्व अनेक तरुणांचं एक प्रेरणाकेद्रच होऊन बसलं. ते त्यांच्या युक्तिरवाद पटुत्वानं प्रभावित होत. सामान्य तरुणाचं असामान्य देशभक्तात परिवर्तन घडवून आणण्याचं सामर्थ्य त्यांच्या नुसत्य हस्तांदोलनात होतं असं वर्णन त्यांचे एक सहकारी एम. पी. टी. आचार्य ह्यांनीच त्यावेळी केलेलं होतं.

**जोसेफ मॅझिनी ग्रन्थ-लिखाण :-**

अशा प्रकारच्या अनेकविध कार्यक्रमात व्यस्त असतांना सावरकर आपल्या क्रान्तीकार्याला पोषक अशा वाचनातही मग्नप असत. इटालीच्या स्वातंत्र्याचा मंत्रद्रष्टा वीर जोसेफ मॅझिनी हा सावरकरांच्या आकर्षणाचा विशेष विषय होता. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी लिखित मॅझिनीचं लहानसं चरित्र त्यांच्या वाचनात आलेलं होतं. त्यानंच स्थापन केलेल्या 'तरुण इटाली' ह्या संघटनेचीही त्यांना माहिती होती. त्या पोटीच लंडन प्रवासात आगनाव मार्सेला थांबली तेव्हा मिळालेल्या वेळात त्यांनी तेथे मॅझिनीच्या घराचा शोध घेण्याचा, त्या स्वातंत्र्यवीराच्या वास्तव्यानं पुनित झालेल्या त्या वास्तूचं दर्शन घेण्याचाही प्रयत्नत केलेला होता. आता लंडनमध्ये मॅझिनीच्या चरित्राचा अभ्यास करण्याचं त्यांच्या मनानं घेतलं. भारत भवनाचे व्यवस्थापक असलेल्या मुखर्जी महाशयाजवळ त्यांनी गोष्ट काढली. हे मुखर्जी महोदय लंडनला स्थायिक झालेले होते. सावरकरांचं आकर्षक व्यक्तिमत्व, भारत भवनात येताच त्यांनी आरंभ केलेलं कार्य, त्याची सततची धडपड नि तळमळ मुखर्जी महाशयाच्या डोळ्यात भरणारीच होती. हा तरुण वेगळ्याच प्रवृत्ती-प्रकृतीचा नि महत्त्वाकांक्षी असल्याचं त्यांनी ताडलं होतं. सावरकरांनी अत्यंत लाघवी शब्दात केलेली विनंती ऐकताच 'भारत भवन' च्या ग्रंथालयात हाताशी लागतील ती मॅझिनीवरील पुस्तक काढून त्यांच्या स्वाधीन केली. सावरकरांनी ती सारी आधाश्यासारखी वाचून काढलीत. त्याच पुस्तकावरून त्यांचे अधिक खंड असल्याचं त्याना दिसून येताच सावरकरांनी ते उर्वरित खंड मिळवून देण्यासाठी मुखर्जी महाशयांना विनवणी केली. त्यांनीही ती तेवढ्याच तत्परतेनं पूर्ण केली.

सावरकरांनी रात्रीचा दिवस करून सारे खंड वाचून काढले. सविस्तर टिपणं केलीत नि मग 'जोसेफ मॅझिनी' नि त्यांची 'तरुण इटाली' ही संघटना ह्याविषयी माहिती देणारा ग्रंथ अवघ्या तीनचार महिन्यात पूर्ण केला. तसंच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य प्रयत्ना च्या संदर्भाला आवश्यक नि उचित अशी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली. तो सिद्ध झालेला ग्रंथ

प्रकाशनासाठी आपल्या वडील बंधु बाबाराव सावरकरांकडे रवाना केला. त्यांनी तो प्रकाशित केला. सावरकारांच्या लेखणीतून उतरलेल्या ह्या ग्रंथासाठी भारतात अनेकांनी प्रकाशनपूर्व नोंदणी करून तो घेतलेला होता. त्या काळात ह्या ग्रंथानं विक्रीचा उच्चां क गाठला होता. त्यामुळे त्याच्या दुसऱ्या आवृत्तीची विज्ञापनं (जाहीरात) सुद्धा झळकायला लागली होती. त्यामुळेच इंग्रज राज्यकर्त्यांना त्यातील संभाव्य धोक्याची जाग येऊन ग्रंथावर बंदी घोषित करण्यात आली. बंदी घालती गेली तरी घराघरातून ह्या ग्रंथाची नि विशेषतः त्याच्या प्रस्तावनेची पारायणे होत असत. एवढेच नाही तर त्याकाळच्या अनेक तरुणांनी ही प्रदीर्घ गद्य प्रस्तावना पाठ करून स्मृती कोषात सुरक्षित केलेली होती. सभासभातून त्यातील उतारे म्हणून सावरकरी विचारांचा प्रसार-प्रचार करण्यात येत होता. मॅझिनीवरील लिखाण करीत असतांना ‘फ्री इंडिया सोसायटी’च्या बैठकी-सभातून सावरकर ह्या विषयावर भारत भवनात व्याख्यानेही देत असत. मॅझिनीचं राजकीय तत्वज्ञान पटवून देणारं सावरकरांचं वक्तृयत्व, त्यांची विश्लेषण पद्धती, युक्तीवाद पटुत्वाची मांडणी ह्यामुळे श्रोते भारावून जात, प्रभावित होत. सावरकरांच्या स्वातंत्र्यविषयक तळमळीबाबत कोणाच्याही मनात कसलाही संदेह नसे. तरीही मॅझिनीकालीन इटालीतील परिस्थिती नि हिंदुस्थानातील तत्कालीन वातावरण ह्यामुळे अनेकांना त्यांचं मत मान्य करणं जड जात असे. मॅझिनीप्रमाणे राज्यक्रान्ती अगदी अशक्य नसली तरी अति कठीण, जवळपास असंभव अशीच अनेकांची धारणा होई, त्याच दिशेनं प्रयत्न शील असणाऱ्या सावरकरांना मित्रपरिवारातील ह्या शंकेची अर्थातच जाण होती. ती लक्षात घेऊनच मग त्यांनी स्वदेशाच्या इतिहासाचीच साक्ष काढण्याच्या प्रयत्ना त अठराशे सत्त्तावनच्या सशस्त्र अठावाकडे आपलं लक्ष वळविलं. आपल्याच देशातील सशस्त्र राज्यक्रान्तीचं उदाहरणच त्यांच्यापुढं ठेवावं हाच सावरकरांचा त्यामागचा उद्देश होता.

इंग्रज लोक कागदपत्रांच्या बाबतीत विलक्षण जागरूक. त्यांनी काळजीपूर्वक सांभाळून ठेवलेली कागदपत्रं, अहवाल, त्यांच्या दैनंदिनी, त्यातील घटना नोंदीवर केलेली भाष्ये तसंच स्वतंत्र ग्रंथरूपात केलेले लिखाण आदि वाचनाचा त्यांनी संकल्प केला. ग्रंथालयात अठराशे सत्तावनवरील घटनावर कपाटेची कपाटे भरलेली. त्यांनी त्यातील निवडक ग्रंथांचं, कागदपत्रांचं वाचन करायला नि वाचलेल्या माहितीची टिपणं काढायला आरंभ ही केला. जसजसं वाचन वाढत गेलं तसतसंअठराशे सत्तावनचा तो सशस्त्र उठाव एक मामुली बंड नव्हतं तर तो एक राष्ट्रीय स्वातंत्र्याचा उठाव होता, तो एक राज्यक्रान्तीचा प्रयत्नल होता म्हणून त्यांचं मत अधिकाधिक दृढ होत गेलं.

**अठराशे सत्तावनचे पहिले स्वातंत्र्यसमर :-**

ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या लेखी हिंदुस्थान त्यांच्या साम्राज्याचा एक भाग, साम्राज्यातील प्रजाजन, लोक म्हणजे सम्राटाची प्रजा. प्रजेनं वा सैनिकांनी सम्राटाविरुद्ध शस्त्र उपसून उठाव करणं म्हणजे बंड (म्युटीनी). इंग्रज राज्यकर्त्यांनीही त्याला बंड ठरविणं योग्य नसलं तरी स्वाभाविक होतं. कारण त्यांचं राज्य त्यांच्या दृष्टीनं संवैधानिक नि वैध होतं (कॉन्स्टीट्युशनल नि लिगल) परंतु इंग्रजाळलेले नि त्यामुळेच पराधीन विद्वत्ता असलेले भारतीय विचारवंत, लेखक अठराशे सत्तावनच्या उठावाला 'बंड' म्हणूनच उल्लेखित. स्वातंत्र्योत्तरही बौधिक दास्याची ही परंपरा अनेक वर्ष तशीच चालत होती. गेल्या काही वर्षात मात्र पालट झालेला असून त्याचं श्रेय जर कोणाला द्यायचं तर सावरकरांच्या ह्याच ग्रंथाला द्यावं लागतं. कारण त्यांनीच सर्वप्रथम अठराशे सत्तावनचा सशस्त्र उठाव नुसतं हिंदी सैनिकांच बंड नव्हतं तर ते पहिलं स्वातंत्र्य युद्ध होतं हा सिद्धान्त आपल्या 'आठराशे सत्तावनचं पहिले स्वातंत्र्यसमर' ह्या ग्रंथातून प्रस्थापित केला.

वास्तविक 'बंड' म्हणजे स्वकीय सत्तेविरुद्धचा सशस्त्र उठाव. जहांगीरनं स्वतंत्र राज्याकरिता अकबराविरुद्ध केलेली सशस्त्र उठावणी 'बंड' होती. औरंगजेबानं शहाजानच्या विरोधात केलेला तसाच प्रयत्नर एका बंडाचाच भाग होता. संभाजीराजे हे शिवाजी राजांच्या विरोधात दिलेरखानच्या छावणीत दाखल झालेत. त्याचा हेतू एकप्रकारे बंडाचाच होता. त्याहीपेक्षा अमेरिकेच्या वसाहतींनी इंग्लं डच्या राजाविरुद्ध उठाव केला तो खऱ्या अर्थानं बंडाचाच प्रकार होता. कारण अमेरिकेतील वसाहती इंग्रज होत्या. त्या वसाहती इंग्लंडलाच आपली मायभूमी मानीत असत. तेथील राजा वा राणीला आपला राजा, आपली राणी म्हणूनच सन्मानित. इंग्लंभडच्या 'युनियन जॅक' हाच तेही आपला राष्ट्रध्वज मानीत, त्यालाच आपली मानवन्दना देत असत. इंग्लनडच्या संसदेत प्रतिनिधीत्व हीच त्यांची आरंभापासून शेवटपर्यंत मागणी होती. वसाहतींनी शेवटी इंग्लंकडविरुद्ध शस्त्र उपसलं. त्यांची ही कृती एक बंडच होती, अन्य नाही. परंतु अमेरिकन वसाहतींच्या अठावाचा उल्लेतख कोणी 'बंड' असा करीत नाही तर 'अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध' असाच करण्यात येतो. सत्तावनच्या उठावातील उणीवा म्हणून ज्या उल्ले'खिल्या जातात त्या तशाच नि त्याच प्रमाणात वसाहतीतील उठावातही होत्याच होत्या. असं असतांना स्वकीय सत्तेविरुद्धच्या वसाहतींच्या उठावणीस 'स्वातंत्र्य युद्ध' संबोधणं नि परकीय सत्तेविरुद्धची सशस्त्र कृती 'बंड' समजणं नुसतं तर्क विसंगतच नव्हे तर तर्कदुष्ट ठरतं. उभय उठावण्यात भेद म्हणता येईल तो एवढाच की वसाहतीचा इंग्लंकडविरोधी उठाव यशस्वी झाला तर सत्तावनचा अपेशी ठरला. अपयशाबाबत इतिहास निर्दयी असतो असं कोण्या लेखकांनं जे म्हटलंय् तेच शेवटी खरं म्हणायचं.

इंग्रजांनीच मोठ्या काळजीपूर्वक जतन करून, संग्रहीत करून सांभाळून तेवलेल्या कागदपत्रांच्या, अहवालाच्या आधारावर सावरकरांनी आपल्या ग्रंथाची रचना केली. घटना एकच. पण सावरकरांची दृष्टी वेगळी

होती. राष्ट्रीय दृष्टीकोनातून तीच घटना न्याहाळताच त्यांना सत्तावनची सशस्त्र उठावणी केवळ स्वार्थप्रेरित कृती न वाटता ‘स्वधर्म नि स्वराज्य’ ह्या दिव्य हेतूनं केलेलं ‘स्वातंत्र्ययुद्ध’ वाटलं. ‘अठराशे सत्तावनचे पहिले स्वातंत्र्यसमर’ हा अलौकिक ग्रंथ त्यांनी पूर्ण केला. ‘मॅझिनी’प्रमाणं हाही ग्रंथ त्यांनी वडील बंधूकडे रवाना केला. परंतु हिंदुस्थानात ह्या ज्वालाग्राही ग्रंथाचं मुद्रण करण्यास कोणी धजत नव्हतं. ‘मॅझिनी’वरील बंदीचा अनुभव होताच. परिणामी बाबाराव सावरकरांनी ग्रन्थाची मुद्रणप्रत लंडनला परत रवाना केली. ग्रंथ मराठीत. तो लंडनमध्ये छापणं कठीण. संस्कृतचा विशेष अभ्यास करणाऱ्या जर्मनीसारख्या इंग्लंचडविरोधी देशात तो छापण्याचा प्रयत्न् करण्यात आला. परंतु तोही यशस्वी ठरला नाही. सावरकर मित्र परिवारानं मग त्या मराठी ग्रंथाचं इंग्रजीत भाषांतर करण्यास आरंभ केला. तो पूर्ण होताच हॉलंडमध्ये त्या ग्रंथाचं गुप्तपणे मुद्रण करण्यात यश मिळालं.

**इंग्रजी साम्राज्याच्या राजधानीत १८५७ची अर्धशताब्दि :-**

ह्या ग्रंथांच्या लिखाण नि मुद्रणाचा असा प्रयत्न  होत असतांनाच सावरकर भारत भवनातील ‘फ्री इंडिया सोसायटी’ च्या साप्ताहित बैठकातून ह्या विषयावर अधुमधून व्याख्यानं देत असत. ते लंडनला पोचण्यापूर्वीच त्यांच्याविषयी माहिती देणारं पत्र लंडनला पोचलं होतंच. त्यामुळे त्यांच्यावर कडक दृष्टी होतीच. अठराशे सत्तावन विषयक त्यांचं ग्रंथालयातील नियमित वाचन, त्यांची व्याख्यानं ह्यातून ब्रिटिश राज्यकर्त्यांना काहीशी कुणकुण लागली असावी. परंतु त्याहिपेक्षा ते वर्षच महत्त्वाचं ठरलं होतं. कारण हे वर्ष होतं. १९०७. अठराशे सत्तावनच्या घटनेला पन्नास वर्ष पूर्ण झालेली होती. अठराशे सत्तावन सारखा उठाव होण्यांविषयी लंडनमध्ये वावड्या उडत उठत होत्या. ब्रिटिश जनमानस ह्या वावड्यांनी किंचित भयभीत होतेच. त्यांचा भयगंड काढून टाकण्यासाठी लंडनच्या नाट्यगृहातून, थियेटरा थियेटरामधून

सत्तावनच्या उठावाचं विकृत नाट्य दाखविण्याचे प्रयोग केले जाऊ लागलेले होते. इंग्रजांच्या असल्या विकृत प्रचार-प्रसाराचा नुसता प्रतिवादच नव्हे तर रोखठोक प्रत्युत्तर म्हणून भारत भवनात सत्तावनच्या प्रकट महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं. महिनाभर 'तपस्यामास' पाळण्यात आला. १० मे म्हणजेच ज्या दिवशी मंगल पांडेनं पहिली गोळी झाडली त्याच दिवशी ह्या उत्सवाचं आयोजन हेतूतः करण्यात आलेलं होतं. 'भारत भवन'चं सभागृह सत्तावनच्या स्वातंत्र्य युद्धातील वीरांच्या छायाचित्रासह विविध प्रकारच्या रंगीत पुष्पांनी सजविण्यात आलेलं होतं. राष्ट्रगीत, राष्ट्रीय प्रार्थना, हुतात्म्यांचं स्मरण नि श्रद्धांजली, स्वार्थ त्यागाची प्रतिज्ञा, अध्यक्षीर भाषण नि प्रसाद वितरणानंतर राष्ट्रगीत असा एकून भारदस्त नि राष्ट्रीय उत्थनाला पोषक-प्रेरक असा कार्यक्रम आखण्यात आलेला होता. ह्या कार्यक्रमाची प्रसिद्धि मोठी योजनाबद्ध पद्धतीनं तपस्यामात पूर्वीपासून करण्यात आलेली होती. केंब्रिज, ऑक्सफर्ड, सॉरेन्सेस्टर, रेडिंग अशा दूरदूरच्या ठिकाणाहून भारतीय विद्यार्थी ह्या कार्यक्रमात मोठ्या संख्येनं उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते पॅरिस निवासी बॅ. राणाजी. त्यांच्या समवेस पॅरिसहूनही काही मंडळी आलेली होती. मॅडम कामा त्यावेळी पॅरिसलाच होत्या. त्या प्रत्यक्ष उपस्थित राहू शकल्या नाहीत; परंतु त्यांनी राणाजी बरोबर संदेशपत्र पाठविलेलं होतं. भारतभवनच्या सभागृहाच्या बाहेर उपस्थितांना उभं राहावं लागलं. इतकी गर्दी त्या दिवशी लोटली होती. वातावरणात सर्वत्र विलक्षण उत्साह होता. ह्या महोत्सवात सावरकारांचे प्रमुख व्याख्यानं तर होतंच; परंतु खान, दास, मास्तर, आदि इतर वक्त्यांचीही सत्तावनच्या हुतात्म्यांचा गौरव करणारी भाषणं झालीत. अध्यक्षांनी आपलं मे महिन्याचं उत्पन्न देशवीरांसाठी दिलं. कामाबाईंनी ही उत्सवाला ७५ रु. देणगी दिली होती. ह्या उत्सवाचा विशेष म्हणजे प्रसाद म्हणून चपात्यांच्या द्वारे सत्तावनच्या उठावाचा संदेश ठिकठिकाणच्या केन्द्रांना त्यावेळी जो देण्यात आलेला होता; तोच संदेश नेमका प्रतिकात्मक रूपात ह्या

उत्सवातून देण्यात आला. श्रीमती दत्त ह्या विदुषीच्या ‘वन्देमातरम’ ह्या राष्ट्रगीताने महोत्सवाची सांगता साधण्यात आलेली होती. (१० मे १९०८).

**अप्रकाशित ग्रंथावर अभूतपूर्व बंदी प्रयोग :-**

सावरकरांच्या एकूण सर्व हालचालीवर ब्रिटिश गुप्तहेर खात्याचं लक्ष होतच. अठराशे सत्तावनवरील विलक्षण स्फोटक ग्रंथ सावरकर लिहित असल्याची कुणकुण गुप्तहेरांना असावी. भर लंडनमध्ये म्हणजे ब्रिटिश साम्राज्याच्या राजधानीत उघडपणे सत्तावनचा गौरव महोत्सव व्हावा हे पाहून ब्रिटिश शासन अगदी चवताळून उठलं. हाती तसा तसलाही पुरावा नसताना अशा ज्वालाग्राही ग्रंथाच्या नुसत्या विचारानंच ब्रिटिश राज्यकर्ते धास्तावलेले होते. प्रचलीत, प्रस्थापित अर्थानं प्रकाशित न झालेल्या ग्रंथावर ब्रिटिश शासनानं बंदी घातली. त्यांची ही कृती अनाकलनीय, अभूतपूर्व अशीच होती. कारण अप्रकाशित ग्रंथावर बंदीची घोषणा हा प्रकार न्यायनिष्ठ म्हणून म्हणविणाऱ्या ब्रिटिश राज्यात घडलेला होता. सावरकरांनी ‘लंडन टाईम्स’ला पत्र लिहूनही शासनानं पुरावाही सादर केला नाही नि ग्रंथावरील बंदीचा आदेशही मागे घेतला नाही. इंग्रजांच्या तथातथित न्यायीपणाची लक्तारं सावरकरांनी अशी त्यांच्याच साम्राज्याच्या राजधानीत अगदी उघड्यावर वाळत घातलीत.

**ग्रंथ- ‘क्रांतिकारकांची गीता’ :-**

सावरकरांचा हा ग्रंथ सशस्त्र राज्यक्रांतीच्या समर्थकांना विशेष प्रेरक ठरला. क्रांतीवीर भगतसिंग नि नेताजी सुभाषचंद्र बोस ह्या उभय क्रांतीकारक देशभक्तां ची ह्या ग्रंथाच्या आवृत्या काढल्या होत्या. ‘क्रांतिकारकांची गीता’ म्हणून ग्रंथाचा गौरव करण्यात येई. इंग्रजी भाषांतराद्वारे ग्रंथ गुप्तपणे प्रचारात असला तरी ह्या ग्रंथाचं मूळ मराठी हस्तलिखित परिसला मॅडम कामाबाईंकडे सुरक्षित होतं. गोव्याच्या डॉ.

कुटीनो ह्यांच्याकडे ते पुढं आलं. त्यांनी ती मूळ हस्तलिखित प्रत स्वातंत्र्योत्तर काळात नागपूरच्या डॉ. गोवेकरांच्या स्वाधीन केली. आज हा ग्रंथ त्याच्या मूळ स्वरूपात वाचकांना उपलब्ध आहे (स्वा. सा. रा. स्मारक प्रकाशन, समग्र सावरकर वाङ्मआय, खंड ४)

**जागृती नि संघटन-पहिली आघाडी :-**

लंडनमधील 'फ्री इंडिया सोसायटी' ही काही कोणती गुप्त संघटना नव्हती; पण 'अभिनव भारत' ह्या गुप्त संघटनेची उघड आघाडी निश्चितच होती. सोसायटीचे सर्व कार्यक्रम सभा, बैठका, चर्चासत्रे, उत्सावादि अगदी उघडपणे होत असत. त्यामुळेच 'शिवजयंती', विजयादशमी (दसरा), 'गुरुगोविंदसिंग जयंती', 'रक्षाबंधनादि' कार्यक्रमांप्रमाणेच अठराशे सत्तावनचा अर्धशताब्दि महोत्सवही अगदी प्रकटपणे मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आलेला होता. अशा उत्सवांच्या निमित्तानं लंडनमधील भारतीय तरुण एकत्र येत. अशा अनेक तरुणांशी संपर्क साधून सावरकर त्यांच्या मनात भारतीय स्वातंत्र्याचं बीजारोपण करीत असत. त्यांना कृतीप्रवण करीत. सावरकरांच्या योजनाबद्ध राज्यक्रांतीच्या आराखड्या-तील हीच पहिली आघाडी होती. हिंदुस्थानच्या विविध भागातून उच्चत शिक्षणासाठी म्हणून येणाऱ्या तरुणांशी संपर्क साधणं, त्याच्यात सशस्त्र राज्यक्रांतीच्या विचाराचा प्रसार-प्रचार करणं, ते मायदेशी परतून आपापल्या भागात ह्याच दिशेनं प्रयत्नंशील राहतील एवढी त्यांची स्वातंत्र्याकांक्षा प्रज्वलीत करणं, भूमिका पक्की करणं हा प्रधान हेतू मनात बाळगणूच सावरकर लंडनला आलेले होते. आपल्या ध्येयधोरणानुसार त्यांनी जलप्रवासात आगनावेवरच आपल्या कार्याला आरंभही केलेला होता. त्यांचा हा प्रमुख उद्देश बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला. त्या काळातील सावरकरांच्या प्रभावळीतील सहकाऱ्यांची नुसती नावे जरी डोळ्याखालून घातली तरी ह्या पहिल्या आघाडीच्या पूर्ततेची सहज साक्ष पटते. हरनामसिंग, केशवानंद, शिष्टाचारी, कारेगावकर,

बापट (पुढील काळातील सेनापती) मदनलाल धिंग्रा, काशीप्रसाद जयस्वाल, हेमचंद्रदास, होतीलाल नि ग्यानचंद्र वर्मा, डॉ. राजन, वीरेंद्र चट्टोपाध्याय, भाई परमानंद, लाला हरदयाल. बॅ. राणा, मॅडम कामा, सुखसागर दत्त, निरंजन पाल आदि हिंदुस्थानच्या वेगवेगळ्या भागातून आलेली तरुण मंडळी सावरकरांची तत्कालीन सहकारी होती.

**हौतात्म्य-दुसरी आघाडी :-**

वैचारिक परिवर्तन, संघटनात्मक बांधणी अशी योजनाबद्ध सशस्त्र क्रांतीच्या योजनेतील पहिली वहिली आघाडी उभी करीत असतानाच सावरकर दुसरीही आघाडी उघडण्यासाठी प्रयत्नीशील होते. हिंदुस्थानातील उन्मत्त ब्रिटिश राज्यकर्त्यांवर त्यांच्या अमानुष, अत्याचारी वागणुकीचा प्रतिशोष घ्यायचा. त्या कृत्यासाठी ठोठावण्यात येणाऱ्या जन्मठेप, फाशी आदि शिक्षांना धीरोदत्तपणे सामोरे जायचं. फाशीच्या स्तंभावरून स्वतःच्या बलिदानाने देश-स्वातंत्र्याचा संदेश द्यायचा. आपल्या मृतवत झालेल्या देशबांधवांना खडबडून जागं करायचं हाच आत्मबलिदानांच्या, हौतात्म्याच्या आघाडीचा मुख्य पण मर्यादित उद्देश होता. केवळ हौतात्म्यासाठी हौतात्म्य ही राज्यक्रांतीच्या योजनेतील मूळ नि मुख्य भूमिका कधीच नव्हती. ही मर्यादित; पण महत्त्वाची आघाडी लढविण्यासाठी म्हणून हिंदुस्थानातील अभिनव भारताच्या प्रतिज्ञित सदस्यांना 'रिव्हॉल्व्हर्स' 'पिस्तुल' आदि पाठविण्यास सावरकरांनी आरंभ केला. ती गुप्तपणे पाठवावी लागत. त्यासाठी सावरकरांनी मित्रांना मोठमोठ्या ग्रंथभेटीची कल्पक योजना प्रत्यक्षात आणली. जाडजूड ग्रंथ आतून कोरून त्यात चपखलपणे 'रिव्हॉल्व्हर्स' बसवून त्यातून ह्या भेटी पाठविण्यास आरंभ केला. एकाएका रिव्हॉल्व्हर्सच्या अशा भेटी रवाना करीत असतानाच एकगठ्ठा अशी शस्त्र रवाना करण्याची संधी मिळाली. भारत भवनातील चतुर्भूज नावाचा आचाऱ्याचं काम करणारा कर्मचारी हिंदुस्थानला रवाना होणार होता. सावरकरांनी नेमकं त्याला धरलं नि

त्याला हे काम करण्यासाठी सिद्ध केलं. सावरकरांच्या म्हणण्यास्तव म्हणा किंवा पांच पौंडाचा लाभ पदरी पाडून घेण्याच्या लोभामुळे म्हणा; पण चतुर्भुजनं ते दायित्व स्वीकारलं. पॅरिसमध्ये पिस्तुलांची-रिव्हॉल्व्हर्सची खरेदी करण्यात आली नि ती सारी एकत्र एका पेटीच्या तळकप्यात मोठ्या कल्पकतेनं अशी बसविण्यात आली की सर्वसाधारणपणे कोणालाही सहज सुगावा लागता कामा नये. हे काम सावरकर नि व्ही. व्ही. एस. अय्यर ह्या त्यांच्या सहकाऱ्यांनी विलक्षण दक्षतेनं केलेलं होतं. ही कामगिरी स्वीकारून चतुर्भूज इंग्लंअडहून साधारपणे १९०९ च्या फेब्रुवारी महिन्यात लंडनहून निघाला नि एका इटालीयन आगनावेनं तो मुंबईस येऊन पोहोचला. सावरकरांच्या सूचनेप्रमाणे मुंबईला ती शस्त्रे संबधितांच्या स्वाधीन करण्यात तो यशस्वी ठरला. आरक्षींचा डोळा चुकवीत चुकवीत ही शस्त्र पाटणकरांच्या स्वाधीन करताच त्यांनी ती पेणला सुरक्षितपणे रवाना केली. बाबाराव सावरकरांना ह्या सर्व उलाढालीची माहिती अर्थातच असावी. लंडनहून आलेल्या ह्या सामानाची योग्य ती सोय लावण्यासाठीच ते नाशिकहून मूंबईला गेले. आरक्षींनाही कुणकुण असावी. तेही मागावर असावेत. संशय होता. पण पुरावा नव्हता. तरीही किरकोळ कारणावरून म्हणजे अभिनव भारत ग्रंथमालेत की ज्यात काही कविता बाबारावांनी प्रकाशित केल्या होत्या त्यावरच राजद्रोही साहित्य प्रचाराचा आरोप लादून बाबाराव सावरकरांना मुंबईतच अटक करण्यात आली. त्यांना तेथून नाशिकला आणण्यात आलं. (फेब्रु. १८, १९०९). बाबाराव नाशिकहून मुंबईला आले होते ते चतुर्भूजबरोबर पोचलेल्या रिव्हॉल्व्हर्सची व्यवस्थित विल्हेवाट लावण्यासाठीच.

चतुर्भूजबरोबर सावरकरांनी पाठविलेल्या ह्याच ब्रॉअुशनिंग रिव्हॉल्व्हर्सपैकी काही नाशिकच्या अभिनव भारताच्या क्रांतिकारकांपर्यंत अर्थातच पोहोचलीत. अनंत कान्हेरे हा त्यापैकीच एक. बाबाराव सावरकरांना मुंबईत अगदी किरकोळ कारणासाठी अटक करण्यात आली

होती. राजद्रोहाचा संदेश देणाऱ्या कविता प्रकाशित करण्याच्या क्षुल्लाक कारणासाठी अटक झाली होती. नाशिकात आणून त्यांची धिंड काढण्यात आली. पुढे त्याच्यावर खटला भरण्यात आला नि जन्मठेपेसारखी कठोर काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावण्यात आल्यामुळं नाशिकचा तरुण क्रांतिकारक वर्ग संतप्त होता. त्या वेळी नैशिकचा जिल्हाधिकारी होता जॅक्सन. हे महाशय संस्कृत, मराठीचे मोठे रसिक नि जाणकार होते. परंतु सत्तांध होऊन त्यांनी तांबे नावाच्या एका धार्मिक प्रवचनकारावरही बंदी आणली होती. तसेच खरे वकिलांची सनद ह्यानेच रद्द केलेली होती. ह्या सर्व प्रकारच्या दडपशाही प्रकारामुळे तरुणांचे रक्तह खवळलेलं होतंच. त्याच काळात जॅक्सनसाहेबांची मुंबईला बदलीही झाली. आता मात्र हे सावज तसंच सुटता कामा नये असा उसळत्या रक्ताच्या तरुणांनी निश्चित निर्णय घेतला. बढती मिळून जॅक्सनसाहेब बदली होऊन मुंबईला जाणार म्हणून नाशिक नगर परिषदेनं निरोप समारंभ आयोजित केला होता. त्याच दिवशी विजयानंद थिएटरात बालगंधर्वाची भूमिका असलेल्या ‘संगीत शारदा’ चा प्रयोग होता नि त्याला जॅक्सन उपस्थित राहणार होता. अनंत कान्हेरे नि त्याचे सहकारी देशपांडे, कर्वे ह्यांनी हीच साधली. त्यांनी दबा धरून बसून जॅक्सन सभागृहात प्रवेशताच त्याच्यावर गोळ्यांचा वर्षाव केला नि तो रक्तानच्या थारोळ्यात तेथेच कोसळून पडला. (२१ डिसेंबर, १९०९) त्यांना पकडण्यात आलं; खटला भरण्यात आला नि तिघानांही ठाण्यात कारागृहात फासावर लटकविण्यात आलं. (एप्रिल १९, १९०९) भारत परतंत्र म्हणून शस्त्रास्त्रांनी दुर्बल करून टाकलेला असता तरी साऱ्या(च भारतीय तरुणांनी आपलं सत्त्व नि स्वत्व, आपला अभिमान विकलेला नाही, आपली अस्मिता गमावलेली नाही. इंग्रजांची सत्तान्ध, अन्याय्य, अत्याचारी राजवट ते थंड मनानं नि षंड वृत्तीनं सहन करण्याइतके मुर्दाड होऊन बसलेले नाहीत हे प्रत्यक्ष कृतीतून नि त्यासाठी देण्यात यावयाच्या आत्मबलिदानातून दाखवून देणं एवढाच असल्या प्रतिशोधात्मक हत्यांचा नि हौतात्म्याचा हेतू असायचा.

मृत्यूच्या व्यासपीठाहून स्वातंत्र्याचा संदेश हेच हौतात्म्याच्या दुसऱ्या आघाडीचं मर्म होतं, अन्य नाही.

**स्फोटकांचा यशस्वी प्रयोग :-**

पिस्तुलादि शस्त्रांची अशी गुप्त जमवाजमव, पाठवणी नि प्रत्यक्ष प्रयोग ह्या बरोबरच स्फोटकादि शस्त्रांची तितक्याच गुप्तपणे निर्मिती ह्याचाही ह्या दुसऱ्या आघाडीत समावेश होता. तेवढ्यासाठीच बापटांची पॅरिसला रवानगी करण्यात आलेली होती. बापटांनी ती कामगिरी यशस्वीपणे पार पाडली. रशियन क्रांतिकारकांशी सबंध प्रस्थापित करून त्यांनी रसगोलकांच्या वा स्फोटकांच्या (बॉम्बस्) निर्मितीची प्रक्रिया हस्तगत केली. भारत भवनच्या तिसऱ्या माळ्यावर त्याचे प्रयोग करण्यात येऊन त्यात अपेक्षित यशही लाभलं. स्वतः बापत तर त्या प्रयोगाच्या यशानं एवढे उत्तेजित झालेले होते की सिद्ध झालेला हा रसगोलक (म्बॉम्ब) इंग्रज संसदेवरच टाकून पाहिल्याच प्रयोगाचा धमाका उडवून द्यावा असा त्यांचा विचार होता. परंतु सावरकरांनीच त्यांचा तशा प्रकारचा विचार आत्मघातकी नि कार्यहानी करणारा ठरेल म्हणून त्यांना समज दिली. स्फोटक निर्मितीची विद्या हस्तगत झाली, प्रयोगही यशस्वी झाला. मग त्याचा असंख्य प्रती करण्यात आल्या. त्याची हिंदुस्थानाला रवानगी करण्यात आली. बाबाराव सावरकरांच्या अटकेनंतर त्यांच्या घरावर घालण्यात आलेल्या धाडीत अशाच प्रती सापडल्या होत्या. कारण स्फोटक निर्मितीचा प्रसार व्हावा, त्यांची विविध ठिकाणी वेगवेगळी केंद्र निर्माण करण्यात यावीत नि एकाच वेळी अनेक ठिकाणी स्फोट घडवून आणून इंग्रजी सत्ता हादरवून सोडावी अशी सावरकरांची योजनाबद्ध आखणी होती. तेवढ्यासाठीच सावरकरांनी बापट, होतिलाल वर्मा नि हेमचंद्रदास आदि क्रांतिकारकांची हिंदुस्थानात रवानगी केली. योजनेप्रमाणं नेमका परिणामही जो दिसून आला तो खुदीराम बोसच्या किंग्जफोर्डवरील प्रयोगात. अवघ्या १९ वर्ष वयाच्या खुदीराम बोसने

मुज्ञरफरपूर येथे किंग्जफोर्डवर बॉम्ब फेकला. ज्या गाडीवर बॉम्बचा प्रयोग करण्यात आला त्यात तो नव्हता म्हणून बचावला खरा. तीस मैलावर खुदीरामला अटक करण्यात आली. मुज्फरपूर बंदीगृहात त्याला फाशी देण्यात आली. (१९ ऑ. १९०८). त्यावेळी त्याचे वय होते केवळ १९ वर्षांचे. त्याचा सहकारी होता प्रफुलचंद चाकी, त्यानं स्वतःवर गोळा झाडून आत्म बलिदान केलं. खुदीरामनं केलेल्या प्रयोगाचं वृत्त जेव्हा लंडनला पोचलं तेव्हा सावरकरांना त्यांच्या योजनेही पावतीच मिळाल्याचा आगळा आनंद झाला. पारतंत्र्यानं निःशस्त्र करून टाकलेल्या नि निचेष्ट, निर्जिव होऊन पडलेल्या देशबांधवांना स्वातंत्र्य संपादनाच्या कामासाठी खडबडून जागं करण्यासाठीच ह्या असल्या हत्यांचा नि उत्पाती कृत्यांचा निश्चितच उपयोग होता. परंतु असले प्रयोगही ह्या दुसऱ्या हौतात्म्याच्या आघाडीचा एक भागच काय ते होते नि तेही केवळ प्रासंगिक, प्रधान नव्हे. एक कलेक्टर वा जिल्हाधिकारी येथे तर दुसरा न्यायाधीश तेथे ठार मारून देश स्वतंत्र होणे नाही ही वस्तुस्थिती इतर कोणाहीपेक्षा सावरकर अधिक जाणून होते. हौतात्म्या त्यांच्या सशस्त्र राज्यक्रांतीच्या योजनेतील एक प्रासंगिक साधन होतं, साध्य नाही. इंग्रजी सत्तेविरुद्ध उठाव करण्याच्या प्रक्रियेतील तो एक विवेकी तरीही उग्र प्रतिकात्मक असा आत्मबलिदानाचा प्रकार होता. मीठाचा सत्याग्रह हाही शांत, सोपा जनजागृतीचा प्रतिकात्मक प्रकास्च नव्हता काय?

**बाबाराव सावरकरांना अटक-जन्मठेप :-**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी शत्रूस 'मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी प्रतिज्ञा घेतलेले सावरकर त्याच दिशेनं झपाटल्यागत अथक धडपडत असता दोन अप्रिय, नव्हे दुःखद वार्ता त्यांना परदेशी ऐकाव्या लागल्या होत्या. ते लंडनला गेले त्यावेळी लाडका मुलगा प्रभाकार अगदी लहान होता. तो देवीच्या आजारानं वारल्याचं वृत्त लंडनला कळविण्यात आलं. त्याहीपेक्षा त्या पाठोपाठच त्यांच्यावर भयंकर आघात करणारी जी दुसरी

बातमी कानावर येऊन आदळली ती वडील बंधु नि सहकारी असलेल्या बाबाराव सावरकरांच्या जन्मठेप-काळ्या पाण्याच्या शिक्षेची. अंदमानच्या कराल कारावासात त्याची रवानगी करण्यात आल्याच्या वार्तेनं त्यांना भयंकर धक्कांच बसला. त्यांच्या मनाची विळक्षण कालवाकालव करणारेच हे वृत्त होते. अंतःकरण पिळवटून टाकणाऱ्या, मनाला विलक्षण वेदना देणाऱ्या घटना अशा एका पाठोपाठ घडत असतानाही सावरकरांनी आपल्या मनाचं संतुलन बिघडू दिलं नाही, अंतःकरणाचा प्रक्षोभ होऊ दिला नाही, कारण तसं होणं त्यांच्या व्रताला, प्रतिज्ञेला मुळी शोभणारच नव्हतं, स्वीकृत व्रताच्या कंटकमयतेची त्यांना पूरती जाण होती, संकटं येणारच, कारण ती त्यांच्या व्रताची स्वभावप्रकृतीच असल्याचे सावरकर ओळखून होते. मग ती संकटं वेळोवेळी एक एकटी येवोत वा झुंडीनी; त्यांना सामोरा जाणं हाच एकमेव मार्ग मानून त्यांनी आपल्या येसू वहिनीचं 'सांत्वन' करण्यासाठी नि तसेच धीर देणारं ओवीबद्ध पत्र लिहिलं. सावरकरांची 'सांत्वन' ही कविता शब्दप्रकृतीनं जेवढी प्रासादिक तेवढीच त्यांच्या प्रखर भूमिकेचा आविष्कार म्हणून उल्लेखनीय ठरते. वाहिनीस वंदन करून, आशिर्वादपर पत्राची पावती देत सावरकर लिहितात.

आशिर्वाद पत्र पावले । जे लिहिले ते ध्यानी आले ॥
मानस प्रमुदित झाले । धन्यता वाटली उदंड ॥
ध्यन्यध्यन्य आपुला वंश । सुनिश्चये ईश्वरी अंश ॥
की रामसेवा पुण्यलेश । आपुल्या भाग्यी लाधला ॥
अमर होय ही वंशलता । निर्वशं जीचा देवा करीता ॥
दिगंती पसरे सुगंधता । लोकहित परिमलाची ॥

देशसेवा म्हणजेच देवसेवा हीच स्वातंत्र्यव्रती सावरकरांची दिव्य-भव्य, उदात्त भूमिका होती. ह्या भूमिकेतून सावरकर आपल्या वहिनीसही समाजावतात –

'महत्कार्याचे कंकण धरिले । आता महत्तमत्व पाहिजे बाणले
ऐसे वर्तन पाहिजे केले । की जे पसंत पडेल संताना ॥

असं घडलं तर एक दिवस असा येईल की ज्या दिवशी
स्वातंत्र्यदेवीचा नवरात्र उत्सव संपेल नि ती प्रत्यक्ष प्रकट होईल.
एकदा नवरात्र संपली । नवमाला पूर्ण झाली
कुलदेवी प्रकटेल काली । विजया लक्ष्मी पावन ॥
तोपर्यंत
अनेक पूर्वज ऋषीवर । अज्ञात वंशजांचा संभार
साधूसाधू गर्जतील । ऐसे वर्तणे या काला

स्वातंत्र्य व्रती सावरकरांच्या जीवनात वैयक्तिक सुखदुःख कशी उदात्त रूप घेऊन प्रकट होत ह्याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे त्यांची 'सांत्वन' ही कविता म्हणता येईल.

**ब्रिटिशांच्या राजधानीत मदनलालचे धाडस-हौतात्म्य :-**

बाबाराव सावरकरांना मुंबईला अटक करण्यात आली. नासिकला परत आणून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांची नाशिकात धिंड काढून त्यांना अपमानित केलं गेलं होतं. राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना काळेपाणी जन्मठेपेची शिक्षा देण्यात आलेली होती. त्या पाठोपाठ धाकटे नारायणराव सावरकरांनाही अटक केली गेली. ह्या सर्व घटना विलक्षण धक्कापदायक होत्या. मनात भावभावनांचा कल्लोटळ नि मस्तकात विचारांचं वादळ उठलेलं असतानाही सावरकरांनी धीरोदत्त भूमिकेतून वहिनीचं 'सांत्वन' करीतच आपल्या दाहक व्रत्ताच्या दिव्यत्वाची परीक्षा देऊनच 'साधुसाधु गर्जतील । ऐसे वर्तणे या काला' म्हणून धीर दिलेला होता. तरीही त्यांच्या जीवाची होणारी घालमेल अभिनव भारताचा सदस्य असलेल्या मदनलाल धिंग्राच्या बारीक दृष्टीतून सुटली नाही. मदनलाल सावरकरांना विलक्षण मानणारा. हा पंजाबी तरुण सधन घराण्यात जन्मलेला. त्याचे वडील मोठे प्रतिष्ठीत. इंग्रज अधिकाऱ्याबरोबर बैठक असणारे. मदनलालचे दोघे भाऊ लंडनला शिकत असत. मदनलालवर त्याच्या हूडपणामुळे वडिलांची खपा मर्जी होती. त्याला लंडनला

पाठविण्यास ते तयार नव्हते. परंतु नौकेवर नोकरी पत्करून मदनलाल लंडनला पोचलाच. तो इंजिनिअरींगचा विद्यार्थी होता. बापटही तोच अभ्यास करणारे. दोघे तसे मित्र. मदनलाल प्रकृतीनं जरा उग्र, स्वभावानं संतापी होता. वृत्तीनं तो अगदी विलासी नसला; तरी ऐटबाज राहणीचं त्याला आकर्षण होतं. संगीतनृत्य वगैरेचं वेड नसलं तरी आवड मात्र होती. हिंदु असल्याचा त्याला अभिमान होता. त्याचा धर्माभिमान नि देशाभिमान त्याच्या उग्र प्रकृती स्वभावाला साजेसा असा प्रखर होता. त्यामुळेच तो भारतभवन नि सावरकरांकडे ओढला गेला. इंग्रजांनी आपल्या मायभूमीची कशी दुर्दशा करून टाकली ह्याची त्याला जाणीव होती. ती एक प्रकारची बोचणी होती. भारत भवनातील चर्चा, बैठका, सभा, भाषणं, वाद नि उत्सवादिक कार्यक्रमांचा त्याला अगदी तिटकारा नसला तरी त्यात त्याला फारशी रसरुची नव्हती. वाणीपेक्षा ठोस कृतीवर त्याचा भर होता नि तशी कृती करण्याची धमकही तो उरी बाळगुण होता. ‘फ्री इंडिया सोसायटी’ च्या भारत भवनातील एका सभेच्या दिवशी तर तो चक्क बाहेरच्या खोलीत ध्वनी मुद्रिकावर गाणं ऐकत बसला होता. सावरकर त्या दिवशी त्याला थोडे टाकून बोलले; परंतु त्यामुळे त्याला अपमानित वाटलं नाही तर आपल्या बेछूट वागण्याचा खेद वाटला, खंट वाटली. प्रखर देशाभिमानी नि उग्र प्रकृती मदनलालला ‘हौतात्म्य’ खुणावत असावं. दोन चार दिवसांनी तो सावरकरांच्या भेटीस गेला. ते एकटे गवसताच मदनलालनं सरळ प्रश्न टाकला की ज्या हौतात्म्याचा ते सदैव गौरव करीत असतात ते प्रत्यक्षात उतरविण्याची घडी आलीय् काय? त्याच्या सूचक प्रश्नाला त्या परिस्थितीत तेवढंच सूचक नि समर्पक उत्तर सावरकरांनी दिलं की, निर्धारपूर्वक निश्चित निर्णय ही ती घडी आली असल्याचाच काय तो संकेत करतो.

सावरकरांचं सूचक उत्तर मदनलालच्या मनाला नेमकं भिडलं. निर्धारी मदनलालनं मनाशी नेमका संकल्प केला, तो प्रत्यक्षात आणण्याची सारी सिद्धता करण्यात त्यानं काही दिवस घालविले. शस्त्र

खरेदी, नेमबाजीचं शिक्षण तसंच प्रवेशपत्र आदि सारी पूर्वसिद्धता करून पंचहत्यारी मदनलाल 'इंपेरिअल इन्स्टिटयूट' च्या परिसरातील 'जहांगीर हॉल' मध्ये उपस्थित झाला. कारण ह्याच हॉलमध्ये होणाऱ्या समारंभासाठी सर कर्झन वायली हा हिंदुस्थानचा राजकीय धोरणविषयक सूत्रधार येणार होता. मदनलालनं ही सारी माहिती आगावू मिळवून ठेवलेली होती. वायली मदनलालाच्या वडिलांशी परिचित, त्याच्या वडीलभावाना ओळखणारा. उभयतांनी त्याला मदनलालच्या भारतभवन भेटीविषयी कळवून जरा लक्ष ठेवण्यास सांगितेललं होतं, मदनलालही हे अर्थातच ओळखून होता. कार्यक्रम संपवून येताना मदनलाल त्याच्या दृष्टीस पडला. मदनलालही बोलण्यासाठी म्हणून पुढे सरकला. जवळ येताच मदनलालनं बोलणं हळू केलं, त्यामुळे वायली अधिक जवळ आला. नेमकी हीच संधी साधून मदनलालनं त्याच्यावर गोळ्यांचा वर्षाव केला. वायली तात्काळ रक्ता ळलेला अवस्थेत कोसळला. संकल्पित कृती मदनलालनं पार पाडली होती. थोडी झटपट अर्थातच झाली. त्यातही मदनलाल उणा पडला नाही. तो जागीच थांबला. उपस्थितांच्या छातीत धडधडायला लागलं असेल. परंतु मदनलाल आत्मसमाधानानं शांत होता. मदनलालच्या अभूतपूर्व धाडशी कृत्यानं देशविदेशाच्या वर्तमानपत्रातून रकानेच्या भरभरून गेले, सर्वत्र मथळे झळकले, भिंतीभिंतीवर पत्रकं झळकलीत. ब्रिटिश साम्राज्याच्या भर राजधानीत केल्या गेलेल्या ह्या साहसी कृत्याचीच सर्वत्र चर्चा व्हायला लागली. प्रार्थना, याचना, आवेदने, प्रतिनिधीमंडळे नि अनेकानेक निषेधपत्रांच्या भिंडोळ्या भिरकावून जे साधलं नसतं ते मदनलालच्या धाडसानं साधलं गेलं (१ जुलै १९०९)

**मदनलालच्या निषेधाच्या ठरावाचाच निषेध :-**

कर्नल वायलीला श्रद्धांजली वाहण्यासाठी नि त्याहीपेक्षा मदनलालच्या साहसी कृत्याचा निशेष करण्यासाठी प्रसिद्ध 'कॅक्स्टन

सभागृहात' शोकसभा घेण्यात येणार होती. ह्या सभेचे अध्यक्ष होते आगाखान. अनेक इंग्रज अधिकारी, नामवंत, प्रतिष्ठित तसंच काही भारतीय नेतेही 'कॅक्स्टन हॉल' मध्ये उपस्थित होते. वायलीला श्रद्धांजली वाहणारी तशीच मदनलालच्या धिःक्का र, निषेध करणारी भाषणं झाली. थिओडोर मॉरिसन नावाचा गृहस्थ ह्याच सभेत मदनलालच्या धाकट्या भावाला हेतूतःच घेऊन आला नि त्याच्या तोंडून त्याच्या भावाचा निषेध करवून घेतला, सभेत त्यामुळे थोडी गडबड जाणवताच घाईघाईत सर्वानुमते निषेध ठराव मान्य झाल्याची अध्यक्षांनी घोषणा करण्याचा प्रयत्न करताच सावरकरांनी उठून उभे राहून 'नाही, सर्वानुमते कदापि नाही' असे ओरडून प्रतिकार केला. पामर नावाचा बॅरिस्टर त्यांच्यावर चवताळून गेला नि त्यानं सावरकरांना ठोसा लावला. डोळ्यांना इजा झाली तरी सावरकरांनी जागा न सोडता मदनलालच्या निषेध ठरावाला विरोध तसाच चालू ठेवला, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी प्रक्षुब्ध झालेत. ते सभा सोडून चालते झालेत. दादासाहेब खापर्डेही सभागृहातून बाहेर पडले. सभेत एकच गोंधळ माजला. कारण ज्या पामरनं प्रहार केला होता त्याच्या टाळक्यावर तेवढ्याच जोराचा प्रहार सावरकरांच्या एम्. पी. टी. आचार्य नावाच्या सहकाऱ्यानं केलेला होता. गोंधळात, पळापळीतच निषेधसभा संपली. निशेष ठराव जागच्या जागीच बारगळला. सावरकर मित्रासह घरी पोचले त्यांनी लगेच 'लंडनटाईम्स'ला पत्र लिहून "आपण मदनलालचा उल्ले ख खुनी, हत्यारी म्हणून करण्याला विरोध करीत होतो. न्यायालयात तसं सिद्ध होईपर्यंत तसा उल्लेनख करणं विधीनियमात बसणारं नव्हतं. विधी नियमांचाच अभ्यास करणाऱ्या आपला त्यालाच विरोध होता" ह्या शब्दात आपल्या कृतीचं स्पष्टीकरण नि समर्थन केलं. विरोध केला तो विधीनियमांना धरून ही आपली भूमिका सावरकरांनी स्पष्ट नि तीही प्रकटपणे करून पुढचं सारं शुक्लाकाष्ठ टाळलं.

**मदनलाल तुरुंगात-राजहृत निवेदन प्रकाशित :-**

तुरुंगात मदनलालला भेटण्यासाठी हिंदी तरुणाची सारखी गर्दी असायची. परंतु अनुमती मिळायची नाही. काही इंग्रजी स्त्री पुरुषही त्याला भेटण्यास उत्सुक असत. अभिनव भारताच्या गटापैकी ग्यानचंद वर्मा हेच सर्वप्रथम भेटायला गेले. (५ जुलै १९०९) त्यांना पाहताच मदनलालच म्हणाला, “मै आपके लिए क्या कर सकता हू”. ‘मूत्यू’च्या छायेखाली वावरणाऱ्या मदनलालच्या ह्या प्रश्ना नं ग्यानचंदजीच आवाक् झाले. सीमेच्या धैर्यानंच तो सहज नेहमीसारखं बोलून गेला होता. एवढंच नाही तर तेथे तुरुंगात आरसा नाही म्हणून आरसा पाठविण्याची मागणी त्यानं ह्याच वेळी केलेली असावी. सावरकर स्वतः नंतर मदनलालला भेटावयास गेले. त्यांनी सूचकपणे ‘दर्शन’ ह्या पवित्र, पुण्यसूचक शब्दात आपल्या भेटीचं प्रयोजन व्यक्ति केलं. मदनलालला त्याच्या कृतीची ही पावतीच त्याच्या परम् आदरणीय नेत्यानं दिली होती. त्याला अर्थातच कृतकृत्य वाटलं असावं. सावरकरांनी त्याला शेवटची इच्छा विचारली. कारण त्याच्या धाडसी कृतीचा शेवट त्याच्या फाशीत, हौतात्म्यातच होणार हे सावरकर नि मदनलाल दोघेही अर्थातच जाणून होते. आपली उत्तरक्रिया हिंदुधर्मानुसार व्हावी, आपल्या शवाला आपल्या नातेवाईक, विशेषतः आपल्या बंधूना स्पर्श करू देऊ नये नि आपलं सामानसुमान विकून येणारं द्रव्य राष्ट्रीय द्रव्य राष्ट्रीय फंडाला देण्यात यावं अशी इच्छा मदनलालनं त्यावेळी सावरकरांजवळ व्यक्तर केली होती. तसंच आपलं निवेदन आपल्याला फाशी देण्यापूर्वी प्रकाशित व्हावं ही त्याची विशेष तीव्र मनिषा होती.

मदनलालचं निवेदन शासनाकडे. ते प्रकट वा प्रकाशित होणं शक्यचं नव्हतं; परंतु शेवटी देशस्वातंत्र्याच्या धाडसी प्रयत्नात मदनलाल हौताम्त्य पत्करणारा उग्र देशभक्तत होता. त्याची शेवटची इच्छा त्याच्या सहकाऱ्यांनी पूर्ण करणं हे त्यांचं दायित्व होतं, ती एक कठोर सत्वपरिक्षाच होती. सावरकरांनी त्याप्रमाणं निश्चि त निर्णय घेतला. ग्या,नचंद वर्माना पॅरिसला रवाना केलं. तिथे मुद्रणप्रत तयार करण्यात

आली. कारण ते निवेदन मूलतः सावरकरांनीच लिहिलेलं असावं. बाह्य नि अंतर पुरावा तेच सांगतो. डेव्हिड गार्नेट हा लेखक हिंदुस्थानी क्रान्तिकारकांविषयी सहानुभूती बाळगणारा. त्यानं हे धोक्याचं काम स्वीकारलं. रॉबर्ट लींड नावाचा दुसरा एक लेखक त्यादिवशी 'डेलीन्यूज'च्या रात्रपाळीवर होता. त्याच्या साहाय्यानं शेवटी ते प्रकाशित झालं. शासनाकडची गुप्त नि सुरक्षित प्रत तशीच बंदीत राहिली नि निवेदन प्रसिद्ध झालं. ब्रिटिश राज्यकर्ते गोंधळात पडले. धावपळीला आरंभ झाला. चौकशी सत्र सुरू झालं; पण "जो देश दास्यात जखडलेला असतो तो सदैव युद्धमानच असतो. आमची शस्त्र हिसकावून येऊन आम्हाला निःशस्त्र करून टाकलेलं. बंदूका, तोफाना अंतरलेल्या मायभूमीचा पुत्र म्हणून मी. तिच्या स्वातंत्र्यासाठी पिस्तूलानं माझ्या पुरतं माझं दायित्व पूर्ण केलं. माझ्या देशाचा अपमान मी देवाचा अपमान, माझ्या धर्मसंस्कृतीच्या अपमान मानतो." अशा आशयाचं मदनलालचं निवेदन त्याच्या मृत्युपूर्वी त्याच्या इच्छेप्रमाणं प्रकाशित करण्यात आलं. मदनलालवर खटला चालला, परंतु त्यानं आरंभापासूनच ब्रिटिशांचा अधिकारच नाकारलेला होता. शेवटी निकाल-निर्णय लागायचा तोच लागला. मदनलालला मरेपर्यन्त फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. पेन्टेनव्हिल तुरुंगात त्याला फाशीवर चढविण्यात आलं. त्याच्याच पावलावर पाऊल टाकून आपल्या धाडशी कृत्यानी वीर मरण पत्करणारे कान्हेरे-देशपांडे-कर्वे ह्यांनी हौतात्म्याची आघाडी लढविली. त्यांच्या हौतात्म्यानं देशस्वातंत्र्यासाठी उसळत्या रक्तायची पिढी निर्माण केली. हेच ह्या आघाडीच्या सशस्त्र संघर्षाच्या तत्त्वज्ञातील मोल नि महत्त्व. ते मर्यादित असलं तरी तितकंच प्रभावी नि परिणामकारक खचितच होतं.

**स्वातंत्र्य आंतर्राष्ट्रीय पटावर-तिसरी आघाडी :-**

मदनलालनं भर राजधानीत केलेल्या कृत्यापेक्षा त्याच्या प्रकट निवेदनानं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्नप आंतर्राष्ट्रीय पटावर

आणला. भारतीयांचा असंतोष जागतिक चर्चेचा विषय झाला. याही आघाडीवर सावरकरांचं लक्ष होतं. ही तिसरी आघाडी लढविण्यासठी सावरकर नि अभिनव भारताचे सहकारी देशोदेशाच्या क्रांतिकारकांशी सततचा सम्पर्क ठेवून असत. आयरिश नि रशियन क्रांतिकारकांशी विशेष संबंध ठेवले जात. 'गॅलीक अमेरिका' ह्या वृत्तपत्रातूनही सावरकरांनी अनेक लेख प्रकाशित केलेले होते. आंतर्राष्ट्रीय मत जागृत करण्याची अशी सुवर्णसंधी चालून आलेली असतांना सावरकरांसारख्या दूरदृष्टी राज्यक्रांतिकारकानं ती घालविणं शक्यच नव्हतं. जर्मनीतील 'स्टटगार्ट' येथे समाजवाद्यांची आंतर्राष्ट्रीय परिषद भरणार होती. तीन दिवस (१८ ऑ. ते २० ऑ. १९०७) चालणाऱ्या ह्या सोशॉलीस्ट काँग्रेसमध्ये हिंदुस्थानचही प्रतिनिधित्व असावं म्हणून हिंदी क्रांतिकारक प्रयत्नयशील होते. सावरकर नि त्याच्या सहकाऱ्यांनी ब्रिटिश मजूर पक्षाचे एक पुढारी हिंडमन ह्यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांच्या सहानुभूतीचा लाभ उचलला. पॅरिसमधील सरदार सिंगजी राणा नि विशेषतः मॅडम कामांना ह्या परिषदेचं निमंत्रणही होतं. परिषदेला उपस्थित राहण्यापूर्वी त्यांनी अभिनव भारताचं सभासदत्व स्वीकारलं. हिंडमन तर हिंदुन्थानच्या स्वातंत्र्याच्या ठरावालाही अनुकूल होते. परंतु इतर उपस्थित ब्रिटिश समाजवाद्यांचा विरोध झाला. ठराव मांडणं कठीण होतं; परंतु कामाबाईंना भाषणाची अनुमती मिळाली नि त्यांनी त्याच संधीचा लाभ घेऊन वेळ येताच भाषणाच्या ओघात स्वतंत्र हिंदुस्थानचा ध्वज फडकविला. उपस्थितांनी उभे राहून ध्वजाला मानवंदना दिली नि एक प्रकारे आंतर्राष्ट्रीय पटावर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाला प्रमाणित केलं. हा ध्वज पॅरिसमधील अभिनव भारताच्या हेमचंद्र दास ह्यांनी तयार केलेला होता. पुढे पहिल्या जागतिक महायुद्धाच्या काळात जर्मन सम्राट कैसर विल्यम्स ह्याने अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन ह्यांना केलेल्या तारेत जागतिक युद्ध नि शांततेच्या संदर्भात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची सोडवणूक ही महत्त्वाची अट असल्याचे जे कळविलं त्याची पार्श्वभूमी एक

प्रकारे ह्या परिषदेतील अभिनव भारताच्या सहभागाचीच पावती होती. आंतर्राष्ट्रीय पटावर भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्नच अशाप्रकारे उमटविण्यात सावरकर नि अभिनव भारताच्या दूरदृष्टी मुत्सद्देगिरीची साक्ष पटते.

**ब्रिटिश सैन्यातील हिंदी सैनिक-चौथी आघाडी :-**

सशस्त्र क्रांतीच्या सावरकरी योजनेतील शेवटची; पण सर्वाधिक महत्त्वाची आघाडी होती. ब्रिटिश सैन्यातील सैनिकांचा उठाव. ही आघाडी सिद्ध करण्यासाठी सावरकर 'मोठ्या दूरदृष्टीने प्रथमपासूनच प्रयत्नाशील होते. हिंदी सैनिकांच्या छावण्यावर सावरकर गुप्तपत्रांचा मारा सतत करीत असतच. त्यांचा सर्वाधिक भर पंजाबी सैनिकांवर असायचा. हरनामसिंगच्या साहाय्यानं त्यांनी गुरुमुखीचा वापर करून अनेक पत्रे पाठवलेली होती. ब्रिटिश सेनेत आपण नौकरी करीत असलेल्या हिंदी सैनिकांनी मुळीसुद्धा संकोच बाळगता कामा नये. कारण निःशस्त्र हिंदुस्थानात सैनिकी शिक्षण घेण्याची, शस्त्र हाताळण्याची नि प्रत्यक्ष रणांगणावरील डावपेच शिकण्याची संधी सहज लाभणं केवळ सैन्यातील तरुणांनाच शक्य आहे. मातृभूमीचं प्रेम, भक्ती  नि तिच्या स्वातंत्र्याची तळमळ मात्र उरी असावी असं प्रतिपादन सावरकर गुप्त पत्रातून करीत असत. नंतरच्या दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तर सावरकर 'तरुणांनो, भूदलात, वायुदलात, नौदलात भरती व्हा' म्हणून उघडपणे प्रचार करीत.

**ससेहोलपटीचा प्रकृतीवर परिणाम :-**

सावरकर लंडनला पोचण्यापूर्वीच त्यांच्याविषयीची गुप्त माहिती देणारं पत्र पुणे विभागातून लंडनला रवाना झालेलं होतं. ब्रिटिश गुप्तहेर खातं आरंभापासूनच त्यांच्यावर लक्ष ठेवून होतंच. त्यांनी भारत भवनात आरंभ केलेले उत्सवादि कार्यक्रम, त्यांची 'फ्री इंडिया सोसायटी'च्या सभेतील भाषणं, त्यांच्या भेटीगाठी, त्याचं मॅझिनी, सत्तावनवरील लिखाण,

विशेषतः त्यांनी भारत भवनात मोठ्या थाटामाटांत साजरा केलेला अठराशे सत्तावनच्या अर्धशताब्दि महोत्सव, त्याला लोटलेली हिंदी तरुणाची गर्दी, मदनलाल धिंग्राचं धाडसी कृत्य, निशेष सभेतील साहसी विरोध, मदनलालचं जप्त निवेदन प्रकाशित करण्याचा प्रयत्ना ह्या सर्व घडामोडीमुळं त्यांच्या प्रत्येक बारीकसारिक हालचालीवर गुप्तहेरांची दृष्टी खिळून असायची, लंडनमधील सर्व प्रकारच्या उचापती नि उत्पाती कृत्याचं केन्द्र दुसरं कोणतही नसून ‘भारत भवनच’. त्या मागची प्रेरक शक्ती  सावरकरच असल्याची त्यांची पक्की खात्री झालेली होती. भारत भवन बंद करण्यात आल्यामुळं सावरकर बिपिनचंद्र पालांच्या घरी चालविण्यात येणाऱ्या वसतीगृहात आश्रयास गेलेले होते. त्यांचा मुलगा निरंजनपाल सावरकरांचा चाहता, मित्र होता. हिंदुस्थानात सावरकर कुटुंबाचीही वाताहत झालेली होती. गुप्तचरांना सततचा ससेमिरा, आर्थिक चणचण, भाडेकरू म्हणून कोणी जागा देईना अशा परिस्थितीत सावरकरांना लंडनच्या गलिच्छ नि बदनाम वस्तीत राहवं लागलं. सुखसागर दत्त त्यांच्या साथीला असायचा. अशा प्रकारच्या धकाधकीचा, ताणतणावाचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर होऊन ती सारखी ढासळत गेली. शेवटी त्यांना डॉ. मुथु ह्यांच्या रुग्णालयात दाखल व्हावं लागलं. रुग्णालयातही अर्थात सावरकर अगदी निष्क्रीय राहिले नाहीत, ह्या काळातच ‘शिखांचा इतिहास’ हा ग्रंथ त्यांनी पूर्ण केला, त्यांच्या पहिल्या मुलाची स्मृती अमर करावी म्हणून त्यांनी हा ग्रंथ ह्या दिवंगत मुलाच्या स्मृतीस अर्पण केला खरा; परंतु त्यांच्या क्रांतिकारक जीवनाच्या धगीपासून तोही सुटला नाही. ‘जिथे न शकति शिवू भासले अग्निचमेघ वारे! तेथेही शकले शिवू क्रांतीचे अग्निजमेघ वारे’ ह्या शब्दात सावरकरांनी ह्या संबंधात आपली वेदना मुखर केलेली आहे. आजही ह्या ग्रंथाचा कसलाच ठावठिकाणा लागलेला नाही.

**ब्रायटन काठी- ‘सागरा प्राण तळमळला’:-**

डॉ. मुथु ह्यांच्या रुग्णालयातील विश्रांतीमुळे सावरकरांच्या प्रकृतीत थोडीफार सुधारणा झाली. अशक्तापणाच तेवढा जाणवत होता. वैद्यकीय समादेशानुसार ते हवापालट करण्यासाठी म्हणून ब्रायटनला गेलेत, तेथेच सागर किनारी बसलेले असतांना मातृभूमीसाठी त्यांचा जीव अगदी कसा कासावीस झाला. आता मातृभूमीचं दर्शन होणं नाही असं वाटून त्यांच्या जीवाची विलक्षण घालमेल व्हायला लागली. सागर लाटांचं काठावर येऊन आदळणं नि परतणं पाहून संवेदनाशील सावरकरांच्या कल्पक कवी मनानं जो टाहो फोडला तो म्हणजेच त्यांची 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' ही कविता, हे प्रसिद्ध भावगीत होय. मातृभूमी दर्शनाची अनावर, आवेगी उर्मी शब्दरूपात जी बाहेर पडली तीच त्यांची 'सागरास'. ही कविता मराठी सारस्वताचं लेणं ठरली. 'ने मजसी ने' म्हणत सागराला आर्जची विणवणी करणारं सावरकरांचं कवी मन तशाही स्थितीत देशाभिमानानं सागराला दटावण्यास-दरडावण्यासही मागे पुढे पाहत नाही.

हे आंग्लनभूमि भयभीता रे !
अबला न माझीही माता रे !!
कथिल अगस्तिस आता रे !
जो आचमनी एक क्षणी तुज प्याला!!

भावनिकता, कल्पकता, रम्यता नि गेयता अशा सर्व गुणांनी सम्पन्न सावरकरांचं हे भावगीत केवळ अजोड अशाच कोटीतलं ठरतं. वेदनांनी विव्हळणऱ्या अंतःकरणाचा टाहो म्हणजे कविता असंच जर (cry of a suffering soul) असेल तर सावरकरांची ही कविता अद्वितीयच ठरते. मनातल्या मनात पंक्ती पचित सावरकर ही कविता गुणगुणत असताना निरंजन पाल आपला अनुभवी आभिप्राय देतात की, शेवटी सावरकर एखाद्या लहानमुलासारखे रडताना त्यांना दिसलेत.

**पॅरिसला प्रयाण – लंडनला परत-अटक :-**

सारखी ढासळत जाणारी प्रकृती, त्यातच गुप्तचरांचा ससेमिरा म्हणजे राज्यकर्त्यांनी त्यांच्या भोवती आवळत आणलेला अटकेचा फास हे सावरकरांच्या सहकाऱ्यांनी नेमकं ताडलं. सशस्त्र स्वातंत्र्य संघर्षाचा हा अग्रणी, धूरीण, अभिनव भारताची ही प्रेरक शक्ती इंग्रजांच्या कवेत गवसली तर सारं आन्दोलनच संपुष्टात येईल म्हणून त्यांचे सारे सहकारी मोठ्या चिंतेत असत. सावरकरांनी आता लंडनला राहता कामा नये असं त्यांना वाटायचं. सावरकरांनी त्वरित लंडन सोडावं, पॅरिसची वाट धरावी. तेथेच सुरक्षित राहून पुढचं कार्य करता येईल असा विचार करून त्यांनी पॅरिसला जाण्याचा आग्रह धरला. सहकारी मित्रांच्या आग्रहास्तव शेवटी सावरकरांनी पॅरिसला प्रयाण केलं. ब्रिटिशांच्या जाचापासून मुक्ताता झाली; पण पॅरिसमध्ये मनानं ते विलक्षण अस्वस्थ असत. अनेक सहकारी देशभक्त फासावर चढविलेले, दुसरे कित्येक कराल कारावासाचं कष्टभोगी आयुष्य जगत असतांना आपण मात्र पॅरिसला बागेत हिरवळीवर हुंदडावं हा विचार त्यांच्या मनाला सारखा डाचत राही. शरीर सुरक्षित; पण मन विलक्षण अस्वस्थ, त्यांच्या मनाची ही कुतरओढ त्यांचे मित्र अर्थातच ओळखून होते. सावरकरांनी कोणत्यांही परिस्थितीत पॅरिस सोडण्याचा विचारसुद्धा करू नये म्हणून आटोकाट प्रयत्ना करीत. परंतु सावरकरी विवेकाला त्यांचं म्हणणे पटायचं नाही. पॅरिसचं वास्तव त्यांना अंगचोरपणा वाटायचा. शेवटी त्यांनी आपल्या अंतर्मनाचा आवाजच प्रमाण मानला. निर्णय घेतला. लाला हरदयालांनी अगदी डोळ्यात पाणी साठवून शेवटची युक्ति वादपूर्ण विनवणी केली, "सावरकर आपण राज्यक्रांतीचे शिल्पकार, सेनानी. सेनापती कधी आघाडीवर लढत नसतो. तो पिछाडीवरुन युद्धाची योजना आखतो, सूत्रे हलवितो. एक सावरकर आपल्या प्रज्ञा, प्रतिभेनं, विचार-आचारानं, युक्तीप वृत्तीने दहा मदनलाल घडवू शकतो, एक मदनलाल दहा सावरकर तर काय एक सुद्धा निर्माण करू शकत नाही ह्याचा विचार करा." हरदयालांचा हा आग्रही युक्तिधवादही त्यांचा निर्णय बदलू शकला नाही. कारण

सावरकरांचे उत्तर होतं, "उघड युद्धाच्या सेनापतीला ते आवश्यक नि योग्य. गुप्त राज्यक्रांतीच्या संग्रामात ते उचित नाही. अटळही नाही. शेवटी सावरकरही परिस्थितीच जन्माला घालते. एक सावरकर गेला, नसला तर परिस्थिती दुसरा निर्माण करील. राज्यक्रांतीच्या युद्धात कोणीही एकमेव नि अटळ ठरत नाही, ठरू नये." सहकाऱ्यांचे आग्रही ममत्व तेवढ्याच आपुलकीच्या कठोरतेनं दूर सारून सावरकरांनी मित्रांचा निरोप घेतला. पॅरिस सोडलं. पुढं काय त्यांचा निर्णय भावनिक मनाचा नव्हता तर मस्तकी विचार-विवेकाचा होता. लंडन व्हिक्टोरिया स्थानकावर पाय ठेवतांच मॅकर्थी नि पारकर ह्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना अटक केली. (३ मार्च १९१०) तेथेच त्यांची झडती घेण्यात आली. त्यावेळी त्यांच्याजवळ हुतात्मा मदनलालच छायाचित्र नि काही कागदपत्र सापडलीत. ती जप्त करून त्यांची रवानगी बिक्स्टन तुरुंगात करण्यात आली.

**ब्रिक्स्टन तुरुंगात :-**

ब्रिक्स्टन तुरुंगात खटल्याच्या कामासाठी न्यायालयात नेण्यात येई. नेमकी ही संधी साधावी नि शक्य तर सावरकरांची सुटका करावी म्हणून सावरकरांच्या सहकाऱ्यांनी आयरिश क्रांतिकारकांच्या साहाय्यानं तसा प्रयत्नन करून पाहिलेला होता; पण तो यशस्वी ठरला नाही. सावरकरांचा खटला हिंदुस्थानात चालविला जावा असा न्यायालयीन निर्णय झाला. आपणास अटक झाली ती लंडनला, तेव्हा लंडनच्या न्यायालयातच खटल्याचं कामकाज चालविणं वैंध असा सावरकरांचा युक्तिनवाद होता. परंतु न्यायालयानं तो फेटाळून लावला. शेवटी त्यांना हिंदुस्थानला पाठविण्यात येणार हे सावरकर जसं ओळखून होते तसंच त्यांचे मित्रही जाणून होते. लंडनला सोडविण्याच्या प्रयत्नाहला यश आले नाही. हिंदुस्थानला नेत असताना जलप्रवासात सुटकेचा प्रयत्न करण्याचा विचार नि योजना सावरकरांनी ब्रिक्स्टन बंदीत भेटीला

येणाऱ्या सहकाऱ्यांना सांकेतिक सूचकतेने कदाचित कळविण्यात यश मिळविलं असावं. कारण त्यांचे सहकारी त्या दिशेने-प्रयत्ना लाही लागले होते. सावरकरांच्या सहकाऱ्यांना मिळालेल्या सांकेतिक सूचनाबाबत ब्रिटिश शासनालाही संशय असावा. हा संभाव्य धोका टाळावा. निदान पक्षी आवश्यक ती सावधानता बाळगावी म्हणूनही असेल; पण ब्रिटिश राज्यकर्त्यांनी फ्रेंच शासनाला ह्या संदर्भात सूचना करून सतर्क निश्चितच करून ठेवलेलं होतं, ह्यात संशय नाही.

**'मोरिया' आगनौकेवर-त्रिखंडात गाजलेली उडीः-**

हिंदुस्थानला त्यांची रवानगी करण्यासाठी त्यांना 'मोरिया' नावाच्या आगनावेवर चढविण्यात आलं (१ जुलै १९१०) आगनावेच्या प्रवासाला आरंभ झाला. ती 'मार्से'ला पोहोचली. काही किरकोळ दुरुस्ती नि आवश्यक त्या इंधनासाठी म्हणून नौका 'मार्सेच्या' धक्क्यावर थांबली. नाव 'मार्सेला' थांबणार ही सावरकरांनी मनाशी आपली अटकळ बांधलेली होती. त्याप्रमाणे पुढचा बेतही निश्चित केलेला असावा. शौच्याला जाण्याविषयी सांगितलं. पहारेकरी हिंदी होता. त्यानं सोबत असलेल्या पार्कर नि पॉवर ह्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या कानावर ती गोष्ट घातली. मग त्यापैकी एकाला सोबतीला घेऊन सावरकरांना संडासाकडे नेलं. ही इंग्लि शसाहेबाची ब्याद सावरकरांनी बेमालूम बतावणी करून टाळली नि ती टळताच संडासात प्रवेश केला. दार आतून बंद करून रात्री झोपेच्या वेळी घातलेला झगा तावदानावर फेकला. 'आता नाही तर कधीच नाही' असा निर्धारी निर्णय घेऊन सावरकरांनी संडासातून आपलं शरीर झोकून दिलं. पोहून ते धक्क्याच्या भिंतीपर्यंत पोचलेत. तेथे गवसलेल्या पोलिसाला आपल्याला ठाण्यात येण्याविषयी सांगून पाहिलं. तोपर्यंत नौकेतून बंदी पळाल्यानं गोंधळून गेलेले पहारेकरी, अधिकारीही स्थळी पोहोचले होते. त्यांनी सावरकरांची मानगूट पकडून परत 'मोरिया' वर आणलं. हा सारा अभूतपूर्व, विलक्षण थरारक नाट्य प्रकार घडला तो

पांच-दहा मिनिटात. पूर्वसंकेतानुसार सावरकरांचे सहकारी व्ही. व्ही. एस् अय्यर इतर सहकाऱ्यांबरोबर आलेले होते; परंतु त्यांची दृष्टादृष्ट होण्यापूर्वीच सावरकर ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या कवेत सांपडलेले होते नि त्यामुळेच त्यांचा धाडशी प्रयत्न शेवटी अपयशी ठरला.

**साहसी उडी-आंतर्राष्ट्रीय प्रश्न. :-**

सावरकरांचा हा विलक्षण साहसी उडीचा प्रकार अपेशी ठरला. उडी अयशस्वी ठरली. त्यातून अपेक्षित मुक्तपता साधता आली नाही. त्यांच्या पॅरिस येथील सहकाऱ्यांची साहाय्याची योजना, सिद्धता निष्फळ ठरली. पण त्यामुळं सहकारी हतबल झाले नाहीत. त्यांनी फ्रेंच वृत्तपत्राकडे धाव घेतली. लंडन 'डेलीमेल' च्या पॅरिस आवृत्तीतून त्यांनी हा सारा प्रकार प्रसिद्ध केला, परिणामी सावरकरांचा सुटकेच्या साहसी प्रकाराला जागतिक प्रसिद्धी लाभली नि तो आंतर्राष्ट्रीय प्रश्न झाला. फ्रान्सच्या भूमीवर म्हणजे एका स्वतंत्र-सार्वभौम राष्ट्राच्या भूमीवर पकडून ब्रिटिशांनी बंदीस आपल्या ताब्यात घेण्याची कृती आंतर्राष्ट्रीय संकेत नि नियमांचं उल्लंघन करणारी होती. हा साराच प्रकार मग एक वादविषय ठरला. फ्रान्समधील समाजवादी क्रांतिकारकांनी ह्या प्रकरणावर मोठं वादळ उठवून दिलं. आंतर्राष्ट्रीय न्यायालयाच्या मागणीनं जोर धरला. शेवटी हेगच्या आंतर्राष्ट्रीय न्यायालयाचा निकाल लागला. तो ही सावरकरांना अनुकूल असा नव्हताच. परंतु एका व्यक्तीयच्या धाडशी प्रयत्नाचा हा प्रकार आंतरराष्ट्रीय न्यायालयापर्यंत चर्चिला जावा ही बाबच इतिहासात अनन्य साधारण महत्त्वाची ठरली. कारण राष्ट्राराष्ट्रातील वाद विषयाशी संबधित असलेल्या हेगच्या न्यायालयाचा सावरकरांच्या कृत्यानं दोन राष्ट्रातील वाद विषयाचं परिमाण दिलेलं होतं.

**'साष्टी'-आगनावेवर:-**

सावरकरांना पकडून परत ‘मोरिया’ वर आणण्यात आलं. परंतु पुढचा प्रवास त्याच आगनावेनं करण्याचा विचार सोडून देण्यात आला. पुढच्या प्रवासासाठी मग ‘साष्टी’ आगनौकेवर चढविण्यात आलं. ‘मोरिया’कडे नेतांना त्यांच्याशी असभ्यपणे वागणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना सावरकरांनी ‘मी जीवावर उदार झालेला आहे. आपण आगावूपणा केल्यास लक्षात ठेवा.’ ह्या शब्दात खडसावलं होतं. त्यानंतरच अधिकारी आपोआपच सरळ झाले. कोणीही त्यांना मग हिंडीस पिडीस केलं नाही वा असभ्य शिवीगाळीची भाषा वापरण्यास धजले नाहीत. परंतु आता मृत्यूविना मुक्ती  नाही ह्याची त्यांना प्रकर्षानं जाणीव होऊ लागली, परंतु मृत्यूच्या विचारानं भयभीत न होता त्यांनी आत्म्याच्या सिद्धान्ताच्या द्वारेआत्मबलाला आवाहन केलं ते

आनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला,
मारिल रिपु जगति असा कवण जन्मला
अग्नि  जाळी मजसि ना शस्त्र छेदितों,
भिवूनि मला भ्याड मृत्यु पळत सुततो !

ह्या कवच मंत्राचं.

ज्या ‘साष्टी’ आगनौकेवर सावरकरांना चढविण्यात आलं ती मार्सेहून निघून मुंबईला पोहोचली. (दि. २२ जुलै १९१०). लगेच सावरकरांना नाशिकच्या न्यायालयात डांबण्यात आलं. तेथून हलवून त्यांची काही दिवस येरवड्याच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली. खटला भरण्यात आला. परंतु सावरकरांनी खटल्यात भाग घेण्यास ठाम नकार दिला. ब्रिटिश शासनाचा आपल्यावर खटला भरण्याचा नि तो चालविण्याचा अधिकारच नाही. आपल्याला फ्रान्सच्या भूमीवर अटक करण्यात आली म्हणून फ्रान्सच्या स्वाधीन करण्यात यावं. आपण बंदी असलोच तर ते फ्रेंच शासनाचे, ब्रिटिशांचे नाही हा सावरकरांचा युक्तिटवाद होता. ब्रिटिश राज्यकर्त्यांना अर्थातच तो मान्य होणं शक्यच नव्हतं.

**दोन जन्मठेपांची शिक्षा – 'महाराजा'नं अंदमानला रवानगी :-**

ब्रिटिश साम्राज्यविरुद्ध युद्धाचा प्रयत्नह, त्यासाठी संघटन नि शस्त्रास्त्रांची गुप्तपणे जमवाजमव हा एक नि जॅक्सन हत्या प्रकरणी साहाय्य करणं असा दुसरा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. वरील दोन आरोपासाठी त्यांना दोन जन्मठेपांची शिक्षा ठोठावण्यात आली. एका जन्मठेपीचा पंचवीस वर्षाचा कालावधी संपल्यानंतर दुसऱ्या जन्मठेपीचा आरंभ अशी एकूण पन्नास वर्षाची शिक्षा असा अभुतपूर्व प्रकार ब्रिटिश तर्कानं घडवून आणला. शिक्षा ऐकताच सावरकर उद्गारले, 'पन्नास वर्ष आपलं राज्य तरी टिकणार आहे काय?' ज्या धीरोदात्तपणानं सावरकरांनी असे दुर्दम्य आशावादी उद्गार काढलेत त्याच धैर्यानं त्यांची विनोदबुद्धि जागी होऊन ते म्हणाले, 'दोन जन्मठेपी म्हणजे ब्रिटिश शासनानं माझ्या मायभूमीचा पुनर्जन्माच्या सिद्धान्ताची स्वीकारोक्तीच दिली तर. इंग्रजांच्या भौतिक सत्ता, सामर्थ्यावर माझ्या मायदेशाचा हा आत्मिक-तात्विक विजयच होय." असामान्य ध्येय निष्ठा, विशुद्ध स्वातंत्र्य भक्ती हीच सावरकरांची शक्ती होती.

मोक्षमुक्ति ही तुझीच रुपे तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती योगीजन पपब्रह्म वदती
जे जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तेते
स्वातंत्रते भगवती सर्व तव सहचारी होते.

देशस्वातंत्र्यासाठी मरण हेच त्यांचं जीवन होतं. नि स्वातंत्र्याविना असलेलं जीवन हे त्यांना मरणवत् वाटत होतं.

तुज वीण मरण जे जनन
तुज वीण जनन ते मरण
तुज सकल चराचर शरण

'विश्वात आजवरी शाश्वत काय झाले?' हे सैद्धांतिक तत्त्व ओळखूनच स्वातंत्र्याच्या दिव्य दाहक व्रताचा स्वीकार 'सतीचे वाण' मानून उघड्या डोळ्यांनीच त्यांनी केलेल्या होता.

'कि घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने
लब्धप्रकाश इतिहास निसर्ग माने!
जेदिव्य दाहक म्हणूनि असावयाचे
बुद्धयाची वाण धरिले करि हे सतीचे!'

वरील शब्दातच सावरकरांनी आपल्या पूजनीय वहिनीस आपल्या अटकेचं वृत्त कळविलं होतं. देश स्वातंत्र्याची अनावर उर्मी, अदम्य आकांक्षाच त्यांना देशासाठी कसलेही कष्ट भोगण्याची नि त्यागाची प्रेरणा देई. त्याच बळावर अशी भयंकर शिक्षा भोगण्याची त्यांची मानसिक सिद्धता होती. शिक्षा भोगण्यासाठी त्यांना अंदमानच्या कराल कारावासात पाठविण्यात आलं (११ जुलै १९१२).

**अंदमान तुरुंग – मृत्युमुखात कार्याचा आरंभ :-**

अंदमानचा तुरुंग म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूच 'आ' वासलेलं मुखच. असल्या भयंकर मृत्यूमुखातून कधीमधी बाहेर पडेल तर ते आपलं कलेवरच अशी खूणगांठ बांधूनच सावरकरांनी त्यात प्रवेश केला. चोरी, दरोडा, हत्या, डाका अशा भयंकर अमानुष अपराधांसाठी अंदमानच्या काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावण्यात येई. राजकीय बंदी नि चोर दरोडेखोर ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या लेखी एकच ठरत असंच ह्यावरून दिसतं. अंदमानच्या कराल कारावासात कोलू-घाना पिसणं, काथ्या कुटणं, दोर वळणं, फटके मारणं, कालकोठडीत डांबलं जाणं अशा विलक्षण जीवघेण्या शिक्षा देण्यात येत. सराईत अपराधीसुद्धा तेथील कष्ट असह्य होऊन मरण जवळ करीत असत. जगण्यापेक्षा मरण बरं असंच भयंकर त्या कारावासातील कष्टभोगाचं स्वरूप होतं.

अशा प्रकारच्या कारावासात पन्नास वर्ष काढण्याची वेळ येऊन ठेपली खरी. तरीही सावरकर धैर्यगलीत झाले नाहीत. 'महाराजा' अंदमानला पोचली. तेथे पोचताच सावरकरांच्या मनात जर कोणता विचार आला असेल तर तो होता अंदमानच्या सामरिक महत्त्वाचा. स्वतंत्र भारतावर

पूर्वेकडून होणाऱ्या संभाव्य आघाताला अटकाव करण्यासाठी अंदमान भारताचा 'सिंधुदुर्ग' व्हावा हेच त्यावेळी सावरकरांच्या द्रष्ट्या सामरिक दृष्टीला दिसलं, आज त्यांची दृष्टी खरी ठरली. कारण आता भारतीय नौसेनाचा जसा तळ उभा झालाय् तसंच आंतरराष्ट्रीय विमानतळही आकार घेतंय. तसंच अंदमानात शिक्षा भोगणारे सावरकर निराश झालेल्या, आत्महत्येचा प्रयत्नय करण्याचा विचार करणाऱ्या सहबंदीवानांना सांगत-आजच्या आपल्या कष्टभोगाची कोणी नोंदवी घेतांना दिसत तरी उद्या हे अंदमानचं कारागृह एक 'तीर्थक्षेत्र' झाल्याविना राहणार नाही. स्वतंत्र भारताचे यात्री अंदमानची तीर्थयात्रा करतील. त्यांचं हेही म्हणणं आज तंतोतंत खरं ठरलंय. अंदमान तीर्थ झालंय्. अंदमानच्या चंक्रांकीत कोठड्याच्या तुरुंगात आता दृक्श्राव्य माध्यमाद्वारे क्रांतिकारक देशभक्तांच्या कष्टभोगाची तेथे गौरव गाथा गायिली जात आहे.

अंदमानच्या कराल कारावासात कष्टभोगी आयुष्य प्रत्यक्ष भोगित असतांनाही निराश होऊन आपलं व्रती आयुष्य सावरकरांनी निष्फळ, निष्क्रीय होऊ दिलं नाही. कारण तो त्यांचा स्वभाव नव्हता. उदंड, अदभ्य आशावाद. 'प्रतिकूल तेच घडेल' हे जीवनसूत्र सदैव उराशी बाळगूणच त्यांनी जोपासला होता. तुरुंगातील सहभोगी सहकारी बंद्यांचा सर्वोतोपरी कायापालट करण्याचा विचार करून सावरकरांनी तशाही स्थितीत बंद्यांना साक्षर शिक्षित करण्याच्या कार्याला हात घातला. अज्ञानी, अनाडी बंद्यात त्यांनी एक देश, एक भाषा अशी एकत्वाची भावना निर्माण केली, सांघिकतेचा विचार त्यांच्यात रुजविला. निरक्षर चोर, दरोडेखोर, हत्यारी ह्यांनाही साक्षर करून त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. एखादी साधी चिठ्ठी, वर्तमानपत्राचा फडतूस तुकडासुद्धा वाचणं ज्या कारागृहात भयंकर अपराध ठरून शिक्षा देण्यात येई, तेथे सावरकरी प्रयत्नाला यश येऊन वाचनालय, ग्रंथालय निर्माण करण्याचा विक्रम सावरकरांच्या प्रयत्नानं घडवून आणला. त्यांच्या ह्या

प्रबोधनाच्या परिणामी बंद्यांत एक प्रकारची आगळी जागरुकता तर निर्माण झालीच नि सांधिकतेच्या भावनेतून अन्याय्य वागणूकी विरोधाचा प्रतिकार करण्याची क्षमताही निर्माण झाली. अंदमानचा स्वतःला ईश्वर म्हणविणारा 'बारी'ज्या तुरुंगात गर्जत होता त्याच त्याच्या राज्यात सावरकरांनी एक नव्हे, दोन नव्हे तर तीन संप घडवून अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार केला. तसंच सुटका होताच शेतीच्या एका तुकड्यासाठी वा घराच्या एका कोपऱ्यासाठी तंटे बखेड्यांना तोंड फोडण्यापेक्षा अंदमानातच वस्ती, शेती करावी. आपणास तशी संधी मिळाल्यास आपणही तसच करू असं सांगून अंदमानला हिंदुस्थानचा एक उपनिवास करावा हा विचार सहकारी बंद्यांच्या मनीमानसी उतरविण्याचा प्रयत्नक केला. आज अंदमान हिंदुस्थानची एक आगळी वसाहतच झालेली असून तेथे हिंदी हीच संवादभाषा झालेली आहे. आज चेन्नई(मद्रास)च्या परिसरांत हिंदी फारशी समजली जात नाही. परंतु अंदमानला मात्र तामिळभाषी, बांगला भाषीं, तेलगुभाषी लोकांची व्यवहार भाषा हिंदीच झालेली आहे. सर्व बंदी सावरकरांना 'बडेबाबू', बॅलीस्टर बाबू', संबोधित असत, त्यांच्या कामाचा वाटासुद्धा ही चोर, दरोडेखोर, अनाडी, अज्ञानी मंडळी मोठ्या भक्तीझभावानं उचलीत नि तीही त्यांना मान्य नसतांना. ह्या सर्व त्यांचा कामाचा व्याप लक्षात घेता आजचं अंदमान सावरकरांच्या दूरदृष्टीची मूर्तीमंत साक्षच ठरतं. कारण सतत देशस्वातंत्र्य नि देशहित ह्यांचाच काय तो विचार करणाऱ्यास सावरकरांनी म्हणूनच

"म्या असता दिवस नसे व्यर्थ गमविला,
दिवसास्ताचेही म्हणून दुःख ना मला"

ह्या शब्दात आत्मसमाधान व्यक्त" करणं जेवढं स्वाभाविक तेवढंच उचित ठरतं.

**काल कोठडीत योग नि काव्यसाधना :-**

सहतुरुंगवासी देशबांधवाच्या हिताच्या, कल्याणाच्या तशाच राष्ट्रीय दृष्टीनं महत्त्वाच्या अनेक गोष्टी करणारे सावरकर तशाही दुर्धर परिस्थितीत आपली मती भंग होऊ नये, स्मृती भ्रष्ट होऊ नये म्हणून खोलीतल्या त्या भीषण एकांतात योग साधनेचाही सहेतूक प्रयत्ना करीत असत. स्वामी विवेकानंदाचा 'राजयोग' त्यांना मोठा साहाय्यक ठरला. हा ग्रंथ म्हणजे 'शांतरसाचा पेला' असाच त्यांचा अनुभव होता.

योगसाधनेकडे सावरकरांना परिस्थितीनं वळविलं होतं; परंतु काव्य तर त्यांच्या प्रकृतीतच होतं. अगदी लहान वयापासून ते काव्यरचनेत रमत. बालवयातच त्यांनी महाकाव्य लिहिण्याची महत्त्वाकांक्षा बाळगलेली होती. 'सिंहगडचा पोवाडा', 'बाजीप्रभू' वरील पोवाडा, 'स्वतंत्रतेचे स्तोत्र', 'शिवरायाची आरती', 'सांत्वन' 'माझे मृत्यूपत्र', 'सागरास', 'आत्मबल' सारख्या अनेकविध प्रासंगिक कविता त्यांच्या कवी मनाची साक्षच ठरतात. परंतु राज्यक्रांतीच्या धकाधकीत, धबडग्यात त्यांची प्रतिभा काव्यात रमणं शक्यच नव्हतं. परंतु आता अंदमानच्या त्या भीषण कोठडीतील एकांतात त्यांची मोडीत पडलेली महाकाव्य रचण्याची महत्त्वाकांक्षा एक मानसिक विरंगुळा म्हणून उफाळून वर आली. त्यांच्या जिवंत, ज्वलंत प्रतिभेला ते एक आव्हानच होतं, कारण आकांक्षा अनावर असली; तरी परिस्थिती विलक्षण प्रतिकूल होती. मनाचा चेंदामेंदा, अगदी पाचोळा करून टाकणारे ते कष्टमय वातावरण, कागद नाही, लेखणी नाही, परंतु काव्याच्या अनावर उर्मीनं त्यांच्या प्रतिभेला प्रवाहीत केलं. पंक्तीक रचाव्यात, सवड मिळेल त्याप्रमाणं त्या भिंतीच्या पांढऱ्या कागदावर घायपाताच्या काट्यानं लिहून काढाव्यात असा त्यांनी क्रमच ठरविला. खोली कधीकधी बदलण्याची वेळ आली तर त्यांना नवीन कागद लाभल्याचा आनंदच होत असे. अशा पद्धतीनं त्यांनी 'कमला' महाकाव्याच्या रचनेला आरंभ केला. ह्या काव्याचा विषयही पानिपतची पार्श्वभूमी असलेला असाच. रचलेल्या पंक्तीच ते पाठ करीत. पाठ केलेल्या पंक्तीच प्रयागच्या (अलाहाबाद) साप्ताहिकाचा संपादक असलेल्या

राजबंद्याला म्हणून दाखवून त्या त्यांच्याकडून पाठ करवून घेत. कारण तो लवकर सुटणारा होता; पण शेवटी हा संपादक हिंदी भाषी. काव्यपंक्ती मराठी. परंतु त्यांनं पाठ करण्याचं व्रतच स्वीकारलं. कालावधीत तो अपेक्षेप्रमाणे सुटला. पाठांतरीत पंक्तीत त्यानं मग मुंबईला येऊन सावरकरांच्या धाकट्या भावाला डॉ. नारायणराव सावरकरांना जमेल त्याप्रमाणे म्हणून दाखविल्या. डॉक्टरांनी त्या लिहून घेतल्या. अशा रीतीनं हे 'रानफुले' काव्य त्यांनी 'विजनवासी' ह्या नावानं प्रकाशात आणलं.

तसंच पाहिलं तर तुरुंगात साहित्याची निर्मिती ही फारशी नवीन नि अपूर्व बाब नाही. बनयान नावाच्या इंग्रज कवीनं 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' नावाचं काव्य तुरुंगातच लिहिलं. हिटलरनं 'माझा लढा' (माईन कॅम्फ) हे आत्मचरित्र कारावासातच पूर्ण केलं. मंडालेच्या बंदीवासातच लोकमान्य टिळकांनी गीतेचं रहस्य 'गीतारहस्य' उलगडण्याचा प्रयोग केला. भारताचा शोध (डिसकव्हरी ऑफ इंडिया) नेहरुंनी घेतला तोही कारावासातच. परंतु वरील प्रतिभावंत, प्रज्ञावंत विचारवंताच्या तत्कालीन परिस्थितीत नि सावरकरांच्या परिस्थितीत असलेलं महद्अंतर विसरून चालता येत नाही. वरील सर्वांना ग्रंथ, लेखन साहित्य उपलब्ध होतं. त्यांचा कारावासही अंदमानच्या भीषणतेच्या संदर्भात सापेक्षतः सुसह्य असाच होता. सावरकरांना लिखाणाच्या कसल्याच सोयी तर उपलब्ध नव्हत्याच, उलट लिहितांना नुसतं दृष्टीस पडणंही दंडनीय अपराध होता. क्रांतिकारक कवी सावरकरांच्या कष्टभोगी जीवनातील 'कमला' महाकाव्याची रचना नि प्रकाशन उभय बाबी म्हणूनच एक विलक्षण चमत्कारच ठरतात.

**बाबा-तात्या-सावरकरबंधूची दृष्टादृष्ट :**

सावरकरांच्या पूर्वीच त्यांचे वडीलबंधू बाबाराव सावरकर ह्यांना अंदमानला रवाना करण्यात आलेलं होतं. सावरकरांना अर्थातच हे

माहित होतं. परंतु सावरकरांनाही तशीच जन्मठेपेची शिक्षा होऊन त्यांचीही रवानगी त्याच तुरुंगात करण्यात आल्याचं त्यांच्या बंधुना मात्र माहित नव्हतं. त्यांना माहितही होऊ नये ह्यासंबंधी तुरुंगातील अधिकारी विलक्षण जागरुक नि सावधानही असत. दोघेही भाऊ एकाच बंदीवासात. परंतु दोघांची नुसती दृष्टादृष्टसुद्धा होता कामा नये म्हणून अधिकारी अतिशय सावधानता बाळगीत. अशा स्थितीत नुसतं दुरून पाहणं, बोलणंही शक्य नसे; घेतलेल्या दक्षतेमुळे उभय बंधूंची जवळजवळ वर्षदीडवर्षसाधी दृष्टादृष्टही होऊ शकली नाही. परंतु एक दिवस सावरकर अचानक त्यांच्या बंधूंच्या दृष्टीस पडलेच. त्यांना सभय आश्चर्याचा धक्का च बसला नि त्यांच्या तोंडून सहज शब्द बाहेर पडले, 'तात्या, तू इथे?' दोघांनाही त्वरित एकमेकांच्या दृष्टीआड करण्यात आलं. उभय बंधू अंदमानात असतांनाच एक दिवस मातेसमान प्रतिपाळ करणाऱ्या येसवहिनीचं निधन झाल्याचं त्यांना कळालं. डोळ्यात प्राण साठवून ती कधीतरी आपल्या पतीची सुटका होईल, निदानपक्षी भेट घेता येईल म्हणून जीव धरून वाट पाहत असायची. सावरकर द्वयांचे धाकटे बंधू डॉ. सावरकर भेटीची अनुमती मिळावी म्हणून सारखे धडपडत, धावपळ करीत. शेवटी येसू वहिनींना भ्रम झाला, 'ते, आले, ते आले' असं त्या भ्रमातच ओरडत ही माऊली मृत्यूच्या स्वाधीन झाली. तिच्या मृत्यूनंतर मात्र डॉ. सावरकर नि सावरकरांची पत्नीय माई ह्यांना दोनवेळा भेट घेण्याची अनुमती मिळाली. (मे १९१९, नोव्हे. १९२०).

अमाप कष्ट, निकृष्ट जेवण नि वर मानसिक छळ ह्यांच्या परिणामी उभय बंधूची प्रकृती ढासळत गेली. बाबारावांना तुरुंगाच्या रुग्णाचलयात दाखल करण्यात आलं, काही दिवसानंतर त्यांची प्रकृती थोडीफार सुधारली. त्यांना स्वतः स्वयंपाक करून जेवण करण्याची सवलतही देण्यात आली. मग चोरूनमारून तात्याचीही ते थोडीफार सोय करीत, पुढे तात्यांही आजारी झाले. त्यांनाही रुग्णानलय घडलं. तेथील उपचारनंतर मात्र त्यांना कार्यालयात काम दिलं गेलं. शारीरिक

कष्टापासून काही काळ मुक्तता लाभली. निरीक्षकाच्या कामावरी त्यांची नेमणूक झाली. त्यामुळं विश्रांती नि वेळही मिळू लागला.

**सुटका- डॉ. नारायणराव सावरकरांची धडपड :-**

इकडे हिंदुस्थानात डॉ. सावरकर उभय बंधूंच्या सुटकेसाठी अथक धडपड करीतच होते. सारख्या थोरामोठ्यांच्या भेटीगाठी घेत. त्यांच्या सुटकेसाठी जनतेची आवेदने पाठविण्यात येई. त्याची विविध प्रकारची धडपड, सावरकरांनी वेळोवेळी केलेली आवेदनं, त्यांनी दिलेली आश्वासने, जनतेकडून होणारी सततची मागणी ह्या सर्वांचा परिणाम झाला. रंगास्वामीअय्यंगार ह्यांनी त्यांच्या सुटकेचा ठराव आणला. त्याचा अपेक्षित परिणामी सावरकर बंधूंची अंदमानातून मुक्तंता करण्यात आली.

त्यांना हिंदुस्थानात आणण्यात आलं. अंदमान सुटलं खरं, पण तुरुंगवास संपला नाही. सावरकरांना रत्नातगिरी तुरुंगात पाठविण्यात आलं. (मे १९२१) दोनेक वर्षांनी त्यांना येरवड्याच्या बंदिवासात टाकण्यात आलं. (१९२३) येथेच मुंबईच्या राज्यपालांनी त्यांची भेट घेतली. उभयतात प्रदीर्घ चर्चा होऊन पांच वर्षपर्यंत कसल्याही राजकीय चळवळीत भाग न घेण्याचा, राजकीय विषयावर मत प्रदर्शन न करण्याच्या अटीवर तुरुंगमुक्तव करण्यात येऊन त्यांना रत्नाभगिरीला स्थानबद्ध करण्यात आलं. पूर्व अनुमतीविता रत्ना गिरीच्या सीमाबाहेर जाता येत नव्हतं; पण तुरुंगवास मात्र संपला.

**रत्नागिरी स्थानबद्धता-सामाजिक क्रांतिकार्य :-**

प्रत्यक्ष बंदिवासापेक्षा स्थानबद्धता तशी कितीतरी बरी, सुसह्य. अटी होत्या; पण तरीही बरंच स्वातंत्र्य होतं, मोकळीक होती. चौदा वर्षांचा प्रदीर्घ बिजनवास संपला. कौटुंबिक जीवनाची संधी लाभली. सावरकरांचा पहिला मुलगा प्रभाकर ते लंडनला असतानाच वारला होता. आता त्यांच्या कौटुंबिक जीवनवेलीवर कन्यारत्नाडची कळी

उगवली. अंधकारमय जीवनात ह्या नवप्रभातीचं दर्शन म्हणून मुलीचं 'प्रभात' असं सूचक नि समर्पक नाव ठेवण्यात आलं (१९२५). 'प्रभात' नंतर सावरकरांना पुत्र प्राप्तीचाही आनंद लाभला. मुलाचं नामकरण 'विश्वास' असं करण्यात आलं. सावरकर लंडनला असताना त्यावेळचे बॅरिस्टर गांधी अधूनमधून भारत भवनात येत असत. सावरकर नि गांधी ह्यांच्यात ज्याकाळी वादविवादही झडंत. विजयादशमी (दसऱ्याच्या) उत्सवाचं अध्यक्षस्थानही गांधीनी भूषविलं होतं. आता सावरकर रत्नागिरीला स्थानबद्ध असताना जवळपास सतरावर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर पुन्हा सावरकर गांधी भेट घडली. सोबत कस्तुरबा गांधीहि होत्या. (१९२७)

राजकीय आन्दोलनात सहभाग, राजकीय विषयावर मतप्रदर्शन ह्यावर स्थानबद्धतेत बंदी होती; परंतु ही बंदी त्यांना निस्तेज नि निष्क्रिय करू शकली नाही. राजकीय आघाडीवर निवृत्ती लादली असली तरी अन्य सामाजिक-साहित्यिक-सांस्कृतिक आघाड्या त्यांच्या संघर्षमय स्वभावाला आवाहन करणाऱ्या, आव्हान देणाऱ्या निश्चितच मोकळ्या होत्या. सशस्त्र क्रांतिच्या पुरस्कर्त्या स्वातंत्र्यवीरावर बळाची निवृत्ती लादलेली असली तरी कवी-विचारवंत-प्रतिभावंत सावरकरांचं क्षेत्र मोकळं होतं, अंदमानच्या कारावासातही जी ऊर्जा दबली नाही ती स्थानबद्धतेच्या काळात कशी लुळी, पांगळी ठरणार होती? सावरकरांनी आपलं लक्ष सामाजिक क्षेत्राकडे सर्व प्रथम वळविलं. हिंदू समाजजीवन जातिजातीत विभागलेलं होतं. जातिनिष्ठ नि जन्माधिष्ठित उच्चंनिचतेच्या विचार-भावनांनी, रुढी-परंपरांनी सारं समाजजीवन नासून टाकलेलं होतं, अडाणी देवभोळेपणा, अंधश्रद्धा रक्तात रुजलेली होती. भ्रमिष्ट धर्म कल्पनेपोटी अस्पृश्यतेसारखी अमानूष रुढी तगून होती. स्पर्शबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी, मंदिरबंदी सारख्या बेड्यांनी समाजजीवन जखडून टाकलेलं होतं. एकसंघ राष्ट्रनिर्मितीच्या मार्गावर हे असले बावळट प्रकार नुसते अडथळेच काय ते नव्हते; तर अनर्थकारक होते, मारक होते.

सावरकरांनी आपली प्रज्ञा-प्रतिभा, भक्ती-बळ मग केवळ समाज सुधारणाच नव्हे तर एक प्रकारची आमुलाग्र सामाजिक क्रांति घडवून आणण्यासाठी पणास लावून एक वैचारिक नि कृतीशील आंदोलनच रत्नाकगिरीच्या स्थानबद्धेत उभं केलं. प्रखर बुद्धिवाद नि विज्ञाननिष्ठेचा प्रभावी पुरस्कार करण्यास आरंभ केला. पैरुष बुद्धीच्या कसोटीला उतरेल, वैज्ञानिक प्रयोगातून जे प्रत्यक्ष अनुभवास येईल नि जे सर्वाधिक लोकांच्या सर्वाधिक हिताचं, कल्याणाचं, उपयोगाच तेच ग्राह्य. जे वैज्ञानिक प्रयोगशील नि प्रत्यक्ष निष्ठ कसोटीला उतरत नाही ते त्याज्य. मग ते वेदपुराणे, श्रुतीस्मृती आदि ग्रंथातून प्रतिपादन केलेलं असो वा नसो. वेदप्रामाण्य-ग्रंथप्रामाण्य सावरकर नाकारतात नि विज्ञानप्रमाण्याचा स्वीकार करतात. ह्याच वैज्ञानिक, बुद्धिनिष्ठ दृष्टीकोनातून सावरकर सर्वच धर्मग्रंथ मनुष्य निर्मित मानतात, ठरवतात, ईश्वर निर्मित नाही. पोथीनिष्ठ धर्मश्रद्धेपेक्षा विज्ञाननिष्ठ, विकसनशील विचार सावरकर स्वीकारून 'श्रृतिस्मृति पुराणोक्तस'पेक्षा अद्ययावत, अत्याधुनिक भूमिकेचा प्रखर पुरस्कार करतात. वेदस्मृत्यादि धर्मग्रंथावर समाज उभारणीचं युग संपलं. आजचा समाज आधुनिक विज्ञानाच्या वास्तव विचारावर उभा असावा ही त्यांची विचारसरणी होती. विज्ञानच (सायन्स) आजचा धर्म, तोच आजचा वेद अशी विशुद्ध वैज्ञानिक भूमिका स्वीकारून सावरकरांनी आपली वाणी राबविली, लेखणी परजली. 'यज्ञाची कुळकथा', 'खरा सनातन धर्म कोणता', 'पोथीनिष्ठ धर्म की प्रयोगनिष्ठ विज्ञान', 'गोपूजन नव्हे गोपालन', 'दोन शब्दात दोन संस्कृति', आजच्या सामाजिक क्रांतिचे सूत्र', 'पुरातन की अद्यतन', 'मनुस्मृतीतील महिला', 'धर्मभोळेपणाची नांगी ठेचू शकेल असे एकच बळ, विज्ञाबळ' असे अनेक लेख लिहून सावरकरांनी वैज्ञानिक दृष्टीच्या प्रसार-प्रचाराची एक आघाडीच उघडली. कारण लोकप्रियतेपेक्षा लोकहिताचा विचार महत्त्वाचा मानून धर्मभोळेपणा, भाबड्या समजूती, भ्रामक रूढी, भोळसट श्रद्धा, बावळट विचार, घातक अंधश्रद्धा, परंपरा ह्यावर सवरकरांनी आसूड उगारलं.

पोथीनिष्ठेला बांधलेला, धर्मश्रद्धेशी जखडलेला समाज मागासलेपणाशी बांधला, जखडला जातो. अशा समाजाची प्रगती ठप्प होते, विकाश खुंटतो हे वास्तव सावरकर जाणून होते. इंग्लंड सारख्या प्रगत देशात राहिलेल्या, तेथील प्रगत समाजजीवन प्रत्यक्ष अनुभवलेल्या नि देशोदेशीचा इतिहास वाचलेल्या सावरकरांना आजच्या संघर्षाच्या नि स्पर्धेच्या युगात आपला देश टिकला पाहिजे, ही त्यांनी भूमिका होती. वैज्ञानिक दृष्टीचा, विज्ञान निष्ठेचा स्वीकार केल्याविना तसं होणे नाही हे वास्तव ते ओळखून होते. पोथीनिष्ठेवर, धर्मश्रद्धांवर प्रखर टीका करताना सावरकरांनी बायबल नि कुराणाचाही अपवाद केला नाही.

आपली वाणी, लेखणी विज्ञाननिष्ठेच्या, बुद्धिवादाच्या प्रचार प्रसारासाठी अशी झिजवीत असतानाच सावरकर आपले विचार समाज जीवनाच्या आचारात उतरविण्यातही सक्रीय असत. कारण सावरकर नुसते वाचीवीर नव्हते; तर ते होते हाडाचे कृतीवरी. उक्तीस तशी कृती, विचार तसा आचार, कथनी तशी प्रत्यक्ष करणी हेच त्यांच्या एकूण जीवनाचं प्रेरकसूत्र होतं. स्पृश्य आणि अस्पृश्य हा भेदच आधुनिक विचाराच्या सावरकरांना मान्य नव्हता म्हणूनच ते पूर्वास्पृश्य अशा शब्दप्रयोग करीत असत. उभयतांच्या मुळांना शाळेत एतत्र सरमिसळ बसविण्यात यावं, कसलाही भेदाभेद होऊ नये म्हणून त्यांनी अधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या नि तसं परिवर्तन घडवून आणलं. ‘धर्माचं स्थान हृदय पोट नाव्हे’ ह्या वैचारिक भूमिकेतून स्पृश्य-अस्पृश्यांची सहभोजने घडवून आणली. ‘झुणकाभाकरीने हिंदुराष्ट्र’ ही त्यांची घोषणा होती. अशा सहभोजनात सहभागी होण्याची ते आग्रही भूमिका मांडीत नि भाग घेणाऱ्यांची नाव प्रसिद्ध करीत. कारण लपूनछपून केवळ तोंड देखलेपणाचा तो प्रकार नसावा; तर बुद्धिनिष्ठ व्रताचं ते वर्तन ठरावं ही त्यांची भूमिका होती. पूर्वास्पृश्य म्हणजे ‘श्रृतिस्मृतिपुराणोक्तन’, धर्माधर्म विचारात अस्पृश्य मानल्या गेलेल्यांना मंदिर प्रवेश नाकारणाऱ्यास सनातन्यांच्या विरोधात सावरकरांनी पतितपावन मंदिराची उभारणी

केली. प्रत्यक्ष शंकराचार्यांच्या उपस्थितीत एका अस्पृश्यांच्या हस्ते मूर्तीची प्रतिष्ठापना करवून सनातन्याचं नाक ठेचलं. कारण 'स्पर्शानं बाटते तो देवच नव्हे' ही सावरकरी बुद्धिवादाची वैचारिक भूमिका होती. देव दर्शनानं, देवस्पर्शानं पतित पावन होतात, 'नच जात पाहाते भक्तांयची ईश्वर' हा त्यामागचा विचार होता. स्त्रियांनी एकत्र येऊन हळदी-कुंकवाचे कार्यक्रम घडवावेत. ह्या करिताही ते प्रयत्नमशील असत. स्वदेशीचा पुरस्कार करताना गाडीतून स्वदेशी वस्तूंची विक्री करण्यातही कधी मागे राहिले नाहित. अंदमानातही एका तथाकथित अस्पृश्याला त्यांनी स्वतः बरोबर जेवणास बसवून घेतलेले होते. अशा प्रकारे विचार-आचाराद्वारे देशाघातक रूढी, परंपरा रत्नालगिरी परिसरात पुरत्या गाडून टाकून सावरकरांनी डॉ. आंबेडकरांना रत्नागिरी भेटिचं आमंत्रण पाठविलं. कसलीही पूर्व सूचना न देता केव्हाही त्यांच्या सोयीसवडीनुसार त्यांनी भेट द्यावी असं सावरकरांनी पत्रात मुद्दामच लिहिलं होतं. कारण अस्पृश्यता निवारण कार्याचं नाटकी ढोंग तेवढं त्यांना उभं करायचं नव्हतं. आपल्या बुद्धिवादी भूमिकेचा, वैज्ञानिक विचारांचा निर्भीडपणे प्रचार करता यावा म्हणून सावरकरांनी 'श्रद्धानंद' नावाचं वृत्तपत्र काढून त्यातून तडाखेबंद प्रचार केला.

वैज्ञानिक दृष्टीच्या आधारावरच सावरकरांनी 'गोपूजन नव्हे गोपालन-रक्षण' अशी उपयुक्तिवादी भूमिका स्वीकारली. गायीला सावरकर 'दुग्धबिंदु' मानतात. धार्मिक श्रद्धेतून तिला देवपण देणं सावरकर नुसत अडाणी, अवास्तवच काय ते मनात नाही तर प्रसंगी अनर्थकारक ठरणारं मानतात. गायीचं सशास्त्रीय, व्यवस्थित पालन पोषण करून तिला सुष्ठपुष्ठ करणं सावरकरी दृष्टीत अधिक महत्त्वाचं ठरतं. त्यासाठी मग ते प्राणी पालनपोषण शास्त्राचा (ॲनिमल हजबंडरी) अभ्यास करण्याचा आग्रह धरतात. सावरकरांची ही गायीविषयक विशुद्ध विचारसरणी धर्मश्रद्धेतून गायीला देवता मानणाऱ्या सनातन्यांच्या श्रद्धेला तडाखा देणारी खचितच होती. पण ती आपल्याच देशधर्म बांधवाचा केवळ

तेजोभंग करण्यासाठीच काय तो स्वीकारलेली निश्चितच नव्हती. तसं मानणं वास्तवाचा विपर्यास करणं होय. सावरकरांच्याच शब्दात सांगायचं तर रणभूमीवर गलीतगात्र झालेल्या अर्जुनाला फटकारून त्याला 'युद्धायकृत निश्चयः' म्हणून उठविणाऱ्या श्रीकृष्णाची त्यांची भूमिका होती. कर्णाला बुद्धयाच डिवचून त्याचा तेजोभंग करणाऱ्या शल्याची नाही. आमूलाग्र सामाजिक क्रांति घडवून आणण्याच्या निरपेक्ष राष्ट्रहितकारक विचारातूनच धर्मविषयक भोळ्याभाबड्या श्रद्धेवर त्यांना प्रखर टीका करणं आवश्यक वाटत होतं. समाज परिवर्तनाच्या क्षेत्रात सावरकर जसा बुद्धिवादाचा, विज्ञाननिष्ठेचा आग्रह धरतात तसंच आर्थिक समृद्धि, संम्पन्नतेसाठी त्याच विज्ञानाची प्रत्यक्षमूर्ती असलेल्या यंत्राचं स्वागत करतात. यंत्र म्हणजे मानवाचं सर्वाधिक सक्षम असं सहावं इंद्रीय अशीच भूमिका ते मांडतात. यंत्रामुळं विषमता वाढते हे म्हणणं त्यांना मुळीच मान्य नव्हतं. विषमता वाढीस लागते ती वितरणाच्या दोषामुळं, यंत्रामुळं नाही. यंत्रामुळं वाढतं ते उत्पादन असं स्पष्ट मत सावरकर नोंदवितात.

सामाजिक क्रांतिचा व्याप, विचार नि आचार अशा दोन्ही आघाड्यावर सावरकर सक्रिय राहून सांभाळीत होते. त्याच संदर्भात प्रबोधनाचं परिणामकारक माध्यम म्हणून सावरकर नाट्य प्रकाराकडे वळलेत. 'उत्तरक्रिया', 'उःशाप' नि 'सन्यस्त खड्ग' सारख्या नाटकांचा त्यांनी प्रपंच केला. प्रबोधन हाच त्यांच्या नाट्यलेखनाचा कळीचा विचार. पानिपतचा पराभव पूर्णतः पुसून टाकण्याची कृती हीच त्यात पतन पावलेल्यांची 'उत्तरक्रिया'. ती केवळ दर्भानं, मंत्रतंत्रानं होणारी नाही. त्यासाठी दर्भ नकोत दळभार म्हणजे सैनिकी बलच हवे हा 'उत्तर क्रिया' नाटकाचा केंद्रस्थानीचा विचार आहे. विद्रोही धर्मान्तर हा अस्पृश्यतेच्या कलंकावरील उपाय नव्हे. स्वकीयाचा त्याग न करता त्यांचं मत परिवर्तन, प्रसंगी आंदोलनात्मक संघर्ष करून असल्या प्रकारच्या रूढीपरंपरांचे निर्मूल निवारण हाच त्यावरील उचित उपाय हेच 'उःशाप' चं मर्म, अतिरेकी अहिंसा राष्ट्रहितकारक न ठरता मारकच ठरण्याचा

संभव अधिक हेओळखून राष्ट्र रक्षणार्थ शस्त्रपूजा, बलाची उपासना हीच खरी संरक्षक अहिंसा. कारण आक्रमकांचं निर्दालन करण्यासाठी उचललेलं शस्त्र हिंसक ठरत नाही तर अनेकाचं रक्षण करणाऱ्या अहिंसेचच पालन करतं हा 'सन्यस्त खड्ग' नाटकाच्या गाभ्याचा विचार म्हणून मांडतात.

**रत्नाकगिरी-साहित्य सेवा :-**

स्थानबद्धतेच्या काळातच विचारवंत सावरकरांनी समाज प्रबोधनासाठी अनेक लेख लिहिलेत; तर प्रतिभावंत सावरकर त्याच प्रबोधनासाठी नाट्यकलेकडेही वळलेत. ह्या काळात इतिहासकार सावरकरांनी इतिहास लेखनाचाही प्रपंच मांडला. महाराष्ट्रात शिवरायांनी आरंभ केलेलं स्वराज्य-स्वातंत्र्याचं आंदोलन प्रादेशिक होतं असं अनेकांचं मत होतं. ते महाराष्ट्रा पुरतं होतं नि तसंच राहिलं. ती एक प्रादेशिक चळवळ होती. ते मर्यादित आंदोलनच काय ते होतं असं अनेकांचं मत होतं. महाराष्ट्राबाहेर तर ही विचारसरणी सर्वाधिक दृढ होती. ह्या प्रास्थापित-प्रचलीत मताचा प्रतिवाद करण्यासाठी, अमराठी प्रदेशातील हा अपसमज दूर करण्यासाठी सावरकारंनी 'हिंदुपदपातशाही' हा ऐतिहासिक ग्रंथ हेतूतःत इंग्रजीत लिहिला.

परकीय मुसलमानी सत्तेविरुद्ध शिवरायांनं जे एक आंदोलन उभं केलं ते महाराष्ट्रात. त्यांनी स्वराज्याचा श्री गणेशा केला तो महाराष्ट्रापुरताच मर्यादित नव्हता, सावकाश; पण निश्चितपणे सारी उत्तर मुक्तग करून संपूर्ण हिंदुस्थानचं स्वातंत्र्य हेच त्यांच्या राजकीय प्रतिभेचं स्वप्नउ होतं हा विचार प्रतिपादन करून प्रस्थापित करणं हीच 'हिंदुपदपातशाही' ह्या ग्रंथाच्या लिखाणामागची मूळ नि मुख्य प्रेरणा होती.

स्थानबद्धतेच्या ह्या कालखंडात सावरकरांनी 'हिंदुत्व' ह्या विश्ले षणात्मक-विवेचनात्मक शास्त्रीय ग्रंथाचं लिखाण पूर्ण केलं. अगदी लंडनला असतानांही 'हिंदुस्थानचं' हृदय हिंदू' हेच त्यांचं मत होतं.

'पितृभू तू, पुण्यभू तू, तू आमुचा अभिमान' अशीच त्यांची वैचारिक-मानसिक धारणा होती. तरीही भारतीय राष्ट्रीय सभेनं स्वीकारलेल्या हिंदू-मुसलमान-ख्रिस्ती-पारशी-यहुदी आदि सर्वांचे मिळून मिसळून उदयास येणाऱ्यां एक 'हिंदीराष्ट्र' विचाराला सावरकरांचा विरोध असा नव्हता. असं अस्तित्व आकारास येणारं 'हिंदीराष्ट्र' जागतिक क्षितिजावर एखाद्या 'इंद्रधनुष्या'सारखंच खुलेल असंच त्यांचं त्यावेळी मत होतं. परंतु अगदी आरंभापासून मुसलमान त्यांच्या इस्लामी मानसिकतेतून ह्या उदार नि उदात्त संकल्पनेला विरोधच करीत असत. हळूहळू त्यांच्या विरोधानं प्रत्यक्ष प्रतिकारालाही आरंभ केला. आम्ही प्रथम नि शेवपर्यंत मुसलमानच राहणार अशी भूमिका ते प्रकटपणे बोलून दाखवीत. एक राष्ट्र निर्मितीला मारक-बाधक ठरणाऱ्या ह्या वास्तवावर सावरकरांचं लक्ष होतं. सर्वांना सामावून घेणारा, समान मानणारा बहुसंख्य हिंदुसमाज सिद्ध असतांना त्यास नकारच नव्हे तर विरोध करणाऱ्यांना हिंदुच हिंदुस्थानात 'राष्ट्र' ह्या संकल्पनेचे अधिकारी, तेच स्वामी नि तेच सेवक. त्याचं हे इतिहासावर आधारित चिंतन स्पष्ट करण्यासाठी 'हिंदुत्वाची मूलतत्वे' (फंडामेंटल्स ऑफ हिंदुत्व) हा इंग्रजी ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ नागपूरला त्याच्या हस्तलिखित स्वरुपात डॉ. हेडगेवारांच्या हाती लागला. त्यांना तर हा ग्रंथ वाचून 'अमृतकुंभ' प्राप्त झाल्याचा, हाती गवसल्याचा आनंद झाला. त्यांनी शिरगावला सावरकरांची भेट घेतली. उभयतांत झालेल्या विचार-विनिमयाचं प्रत्यक्ष मूर्तरूप म्हणजे 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ'. ह्या विशाल-व्यापक संघटनेचा प्रेरक नि मार्गदर्शक ग्रंथ म्हणजे सावरकरांचा हा 'हिंदुत्व' नामक ग्रंथच होय. हिंदुस्थानात 'हिंदू हेच राष्ट्र नि हिंदुत्व हेच त्याचं राष्ट्रीयत्व'. मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, यहुदी आदी सर्व केवळ अल्पसंख्यक लोकगट. ते संविधानदत्त नागरिकत्वाचे मानकरी, राष्ट्र संज्ञा, संकल्पनेचे अधिकारी, मानकरी नाहीत. सावरकरांच्या ह्या ग्रंथातील हे प्रतिपादन डॉक्टरांना एवढं प्रभावित करतं झालं की 'प्रत्येक

हिंदुमात्रानं वाचलाच पाहिजे असा एकमेव ग्रंथ' अशी जाहिरातच ते त्यांच्या 'स्वातंत्र्य' नामक दैनिकाच्या मुखपृष्ठावर झळकवीत असतं.

सावरकरांनी निबंध लिखाणाला अगदी किशोर-वयातच आरंभ केलेला होता. कवी प्रतिभा त्यांच्या रक्तालचाच गुण होता. चाफेकर-रानडे ह्यांच्यावरील 'फटका' हा त्यांच्या काव्यप्रपंच्याचा आरंभ. विद्युततंतूंनी विणलेल्या नि कम्पप्रकम्पांनी विनटलेल्या त्यांच्या साहसी, रोमांचकारी जीवनातही कवी प्रतिभा कधी रोडावली नाही की थंडावली नाही. 'सिंहगडाचा पोवाड', 'बाजीप्रभु देशपांडे यांचा पोवाड', 'शिवाजीची आरती', 'स्वतंत्रतेचे स्तोत्र', 'सागरास', 'तारकास', 'जगन्नाथाचा रथोत्सव', 'विरहोच्छ्वास' आदि त्यांच्या स्फूट कविता. तसंच 'सप्तर्षि', 'गोमांतक' आदि खंडकाव्यें, 'कमला' हे अंदमानच्या बंदीवासात रचलेलं महाकाव्य आदि. सतेच 'जोसेफ मॅझिनी', 'अठराशे सत्तावनचे पहिले स्वातंत्र्यसमर' नि त्याचप्रमाणे आयुष्याच्या उत्तरार्धातील संध्याकाळी लिहिलेला 'सहासोनेरी पाने' हा ग्रंथ, शेकड्यांनी लिहिलेले विविध लेख, विज्ञाननिष्ठ निबंध, वगैरे त्यांची ग्रंथसम्पदा त्यांच्या प्रज्ञा-प्रतिभेची साक्षच ठरणारी आहे. दहाहजार पंक्तीजतून प्रकट झालेली ही ग्रंथ संपत्ती आज 'समग्र सावरकर वाङ्मय' अशा खंडरूपात प्रकाशित झालेली आहे.

### सावरकरी साहित्य दृष्टी-विचार :-

सावरकर प्रज्ञावंत पंडित, प्रतिभावंत कवी नि वैज्ञानिक दृष्टीने विचारवंत तर खरेच. परंतु साहित्याकरिता साहित्य, कलेसाठी कला ह्या भूमिकेतून ब्रह्मानंद सहोदर कलानंद ही त्याची वाङ्मय दृष्टी कधीच नव्हती. लोकमान्य टिळकांना जशी गणित विषयाच्या अध्ययन-अध्यापनाची भारी आवड नि आकांक्षा; पण तत्कालीन परिस्थितीतं त्यांना राजकीय नेता व्हावं लागलं. जी गोष्ट लोकमान्यांची तीच सावरकरांची. तत्कालीन परिस्थितीतं त्यांना पारतंत्र्याविरुद्ध 'सशस्त्र क्रांतिचा केतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी प्रतिज्ञा करण्यास भाग

पाडलं. परिणामी त्यांनी आपली सारी प्रज्ञा राबविली, प्रतिभा परजली ती देशस्वातंत्र्यासाठीच. मातृभूमीला एकदा ‘मन वाहिल्यावर’ मग ‘वक्तृजत्व वाग्वैभवहि’ त्यांनी तिच्याच चरणी अर्पण केलं. भगवती स्वतंत्रता हीच त्याची देवी, देवता झाल्यावर मग तिचं स्वातंत्र्य हीच ‘मोक्षमुक्ति ’ नि तेच ‘ब्रह्म-परब्रह्म’ ठरलं.

सशस्त्र राज्यक्रांतिच्या साहसी जीवनात त्यांच्यावर जे जे प्रसंग गुदरलेत, जी जी संकटे पहाडापरी कोसळळीत; त्यांच्या मनात जो जो भावभावनांचा हलकल्लोवळ झाला, मस्तकांत जी जी वादळं उठलीत त्यांच शब्दरूप म्हणजे सावरकर साहित्य असल्यामुळे राष्ट्र स्वातंत्र्य, स्वातंत्र्य रक्षण, त्यासाठी शस्त्रोपासन हेच सावरकर साहित्याचं प्राणतत्त्व ठरलं.

जीवनध्येयाच्या संदर्भात सावरकर म्हणूनच कर्तव्याचा विचार प्रामुख्यानं करताना आढळतात. कल्पित रंगानी रंगलेलं रसनिष्ठ साहित्य सावरकर अव्हेरीत नाहीत. तरीही साहित्य म्हणजे केवळ अर्थकामाचा प्रपंच असं ते मानित नाहीत. साम्यवादी नि काम्यवादी असे दोन्ही साहित्य प्रकार सावरकरी दृष्टीत एकेरी नि एकांगी ठरतात. सामाजिक राजकीय वास्तव विसरून लालित्यात लोळणारी साहित्याची उपासना सावरकरांच्या लेखी केवळ अर्थशून्यच ठरत नाही तर अनर्थावहच होय. स्वातंत्र्य, राजकीय सत्तास्थैर्यच आर्थिक सुबत्तेला आश्वासक ठरतं नि त्यापोटीच मग सकस साहित्यकला आदिंची होणारी निर्मिती जीवनाला हितकारक ठरते असं सावरकर स्पष्टपणे बजावतात. ‘जे राष्ट्र खुरटे, दुबळे त्याचे साहित्यहि खुरटे नि दुबळे असणार’ ही त्यांनी मूळ नि मुख्य भूमिका. ‘अलंकार शास्त्रावर जगन्नायथ पंडिता सारख्याचे उत्कृष्टातील ग्रंथ ज्यावेळी लिहिले जात होते, त्याचवेळी राष्ट्रमातेच्या अंगावरील मुकुट कुंडलादि राणीपणाचे अलंकार एकामागून एक ओरबडून काढले जात होते’ ही वस्तुस्थिती प्रज्ञावत-प्रतिभावंत सावरकर मुळीच विसरू देत नाहीत; विसरू इच्छित नाहीत. ‘लेखण्या सोडा, तोडा; बंदुका घ्या’,

‘साहित्यिक नकोत सैनिक हवेत’ हा संदेश अगदी निर्भीडपणे साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदावरून देण्यातही ते कचरत नाहीत. असं सांगणारे सावरकर साहित्याचे विरोधक नव्हते तर संदर्भासह साहित्याचं योग्य ते मूल्यमापन करणारे रसिक नि मर्मज्ञ समीक्षक होते हे विसरता कामा नये.

**भाषालिपी शुद्धी सुधारणाविचार :-**

ह्याच राष्ट्रीय स्वांतत्र्याच्या नि अस्मिता मूल्यांच्या संदर्भातच सावरकर भाषा शुद्धीचा नि लिपी सुधारणेचा आग्रही विचार मांडतात. जेते जिताच्या संस्कृतीवर भाषेद्वारेच आक्रमण करीत असतात. जेत्यांच्या परकीय भाषेतील शब्द सत्ताकाळात सहजपणे स्वकीय भाषेत शिरतात. हळूहळू अगदी ओळखायला न येण्याइतके एकजीव होऊन स्थिरावतात. मग ते स्वभाषेतीलच समजून सर्रास वापरले जातात. पण ते वस्तुतः परभाषीय आक्रमणाचे एकप्रकारे व्रणच असतात. अशा शब्दाची सहेतूक हकालपट्टी करण्यात आली पाहिजे. सावरकरांच्या भाषाशुद्धी आंदोलनामागची सैद्धांतिक भूमिका हीच होती. स्वभाषेतच नसतील ते शब्द निर्माण करायला हवेत नि ते करता येतात अशी सावरकरांची भाषाविषयक भूमिका होती. त्यानुसार त्यांनी नवीन शब्दनिर्मितीची टाकसाळच घातली. दिनांक, हुतात्मा, महापौर, नौदल, भूदल, वायुदल तसेच ध्वनिक्षेपक, आकाशवाणी वा नभोवाणी, दूरध्वनी, दूरदर्शन असे कितीतरी शब्द आज भारतीय भाषांत प्रचलीत प्रस्थापित झालेले दिसतात. षट्कार, चौकार, फलंदाज, गोलंदाज, यष्टीरक्षक आदि शब्द सावरकरी देणगीच होत. चित्रपट क्षेत्रातही निर्माता, दिग्दर्शक, वेषभूषा, छायाचित्रण, ध्वनिमुद्रणसारखे शब्द सर्व परिचित झालेले आहेत. भाषाशुद्धीचा त्यांचा प्रयत्नज स्वभाषा समृद्ध नि संपन्नय करण्याचाच होता. भाषाशुद्धी बरोबर सावरकर लिपीसुधारणाही सूचवितात. प्रचलित बाराखडीतील ‘इ’ ऐवजी ‘अि ा’ ‘अीि’ ‘अेत’ ‘अैण’ ‘अु े’ ‘अूव’ अशी

सुधारणा ते सूचवितात. लिपीसुधारणेमागची सावरकरांची भूमिका यंत्रयुगातील टंकलेखनाची सोय ही होती.

## विनाअट पूर्ण मुक्तचता :-

प्रत्यक्ष बंदिवासापेक्षा स्थानबद्धता बरीत सुसह्य अशीच होती. राजकीय क्षेत्रात आंदोलन वा मत ह्यावर बंदी होती. सावरकरांनी मग सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्र बरच भरघोस कार्य करून स्थानबद्धताही सार्थ केली, सत्कारणी लावली. ह्या काळातही ब्रिटिश शासन त्यांच्या हालचाली नि भेटीगाठीवर बारीक लक्ष ठेवूनच होतं. तरी गुप्तपणे शक्य ते कार्य चालूच असायचं. अनेक वेळा शासनाच्या दमदाटीला सामोरा जावं जागायचंच. अशा रीतीनं जवळपास तेरा वर्षांचा काळ लोटला. एकोणवीसशे पस्तीसच्या नियमानुसार निवडणुका होऊन प्रांतीय स्वायतत्ता मिळाली. मुंबईत कपूर मंत्रिमंडळाची सत्ता आली. सावरकरांची विनाअट मुक्तसता करण्याच्या अटीवरच श्री. जमनादास मेहता कूपर मंत्रिमंडळात दाखल झालेले होते. त्यांच्या आग्रही भूमिकेमुळेच शेवटी सावरकरांची विनाअट पूर्ण मुक्तझता करण्यात आली. (१० मे १९३७).

१९१० ते १९२१ पर्यंत सावरकरांना अंदमानात जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा भोगावी लावली. त्यानंतर त्यांना हिंदुस्थानातील वेगवेगळ्या तुरुंगात डांबण्यात आलं नि शेवटी १९२४ ला त्यांना सुदूर रत्नागिरीसारख्या त्यावेळी मागासलेल्या प्रदेशात स्थानबद्ध करण्यात आलं. १३ वर्षांच्या स्थानबद्धतेनंतर सावरकर आता पूर्णमुक्त झालेले होते. रत्नागिरी ते मुंबई प्रवासात त्यांचे ठिकठिकाणी सत्कार करण्यात आले. सत्कार स्वागतासह त्यांना निषेधाच्या घोषणाही ऐकाव्या लागल्या. कॉंग्रेससारख्या जुन्या, मोठ्या पक्षाच्या जेष्ठ, श्रेष्ठ नेत्यांनी सावरकरांना पक्षात अमंत्रित केलं. परंतु सावरकरांनी आपल्या ध्येय धोरणानुसार लोकमान्याच्या ‘स्वराज्य’ पक्षात प्रवेश करण्याची घोषणा केली. त्याच वर्षी हिंदुसभेच्या कर्णावती (अहमदाबाद) अधिवेशनासाठी त्यांची

अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा झाली. त्यांच्या एकूण त्यावेळच्या विचारसरणीला धरूनच त्यांची निवड झालेली होती. त्यानीही मुक्तक होताच लाभलेल्या ह्या आगळ्या सन्मानाचा सानंद स्वीकार केला.

काँग्रेससारख्या मोठ्या नि लोकप्रिय पक्षात प्रवेशाची सन्मान्य संधी चालून आलेली असताना त्या मानानं अगदी नवथर अशा हिंदुमहासभेचं नेतृत्व त्यांनी स्वीकारलं. कारण तेच त्यांच्या तात्त्विक भूमिकेला योग्य वाटलं. मुसलमानांच्या आक्रमक, अलगतावादी ध्येय धोरणाची त्यांना पूर्ण जाणीव होती. तरीही काँग्रेसच्या वतीनं सतत त्यांचा अनुनय करण्यात येत असायचा. काँग्रेसची ही नीती सावरकरांच्या एकूण राजकीय धोरणाला मान्य होण्यासारखी नव्हती. कारण त्यांच्या व्यवहारी, वास्तव्य दृष्टीनं ती अंतिमतः राष्ट्रविघातक ठरणारी होती. देशहित नि राष्ट्रकल्याण ह्या विषयात सावरकर अगदी असमन्वयवादी होते. कारण राष्ट्रहिताविरुद्ध असा कोणताही विचार त्यांना मान्य होण्यासारखा नव्हताच. रत्नारगिरीच्या वास्तव्यातच त्यांनी ‘हिंदुत्वाची मूलतत्त्वे’ हा ग्रंथ लिहून आपली राजकीय विचारप्रणाली स्पष्टपणे मांडलेली होतीच. एकेकाळी काँग्रेस अंतर्गतच काम करणारी हिंदुमहासभा काँग्रेसपासून विलग होऊन हिंदुहिताचा विचार करणारी म्हणजेच राष्ट्रहिताचा विचार करणारी संघटना म्हणून धडपडत होती. अशा पक्षाचं धूरिणत्व त्यांनी स्वीकारणं जेवढं स्वाभाविक तेवढंच सार्थ नि समर्थनीच होतं. त्यांनी नेमकं तेच केलं.

**हिंदुमहासभाध्यक्ष-कर्णावती अधिवेशन :-**

कर्णावती अधिवेशनाच्या पहिल्याच आपल्या अध्यक्षीय भाषणात सावरकरांनी ‘सद्य परिस्थितीत हिंदुस्थानात परस्पर विरोधी हिंदू नि मुसलमान अशी दोन राष्ट्रे अस्तित्वात असल्याची’ वस्तुस्थिती स्पष्टपणे मांडली. ही वस्तुस्थिती नाकारून सर्वाचं मिळून एक ‘हिंदीराष्ट्र’ उभं करण्याची काँग्रेसची विचारप्रणाली नि तद्विषयक प्रयत्नक राष्ट्रघातक

ठरण्याचीच शक्यता अधिक असं सावरकरांचं मत होतं. रोग लपवून, नाकारून ना रोगाचे निदान करता येतं नां निवारण ही. सावरकरांची अगदी वास्तव भूमिका. त्यांनी ती कसलाही आडपडदा न ठेवता घोषित केली. हिंदू-मुसलमान, ख्रिस्ती-पारशी-यहुदी अशा सर्वांचं मिळून-मिसळून निर्माण होणारं 'हिंदीराष्ट्र' हा विचार उदात्त असला, उदार असला, आदर्श असला तरी प्रत्यक्षात वास्तव म्हणून उतरणं केवळ अशक्य असं सावरकरांचं अनुभवी मत झालेलं होतं. प्रयोग फसताना दिसत असतानाही त्यांचा त्याच दिशेनं तसाच प्रयोग करीत राहणं सावरकरांच्या लेखी नुसता व्यर्थ वेडगळपणाच काय तो ठरत नव्हता; तर आत्मघातक ठरत होता. कारण मुसलमान त्यांच्या इस्लामी विचारसरणीत स्वतःला 'राष्ट्र' मानतात हे वास्तव सावरकरांनी हिंदूसमोर अगदी निःसंदिग्धपणे पहिल्याच व्याख्यानात मांडलं. त्यांच्या अशा स्पष्ट मांडणीनं मोठं वादळ उठलं. त्यांच्यावर द्विराष्ट्रवादाचा पुरस्कार करण्याचा आरोपही लावण्यात आला. वास्तविक जे आहे, जे मानलं जातं ते ते सांगणं म्हणजे वस्तुस्थितीचं कथन करणं होतं. परंतु त्यासाठीच त्यांच्यावर द्विराष्ट्र विचार निर्मितीचा आरोप करण्यात आला. सर्वांचं मिळून जे एकसंघ 'हिंदीराष्ट्र' निर्माण करण्याची आकांक्षा बाळगूण काँग्रेसी विचारप्रणाली त्या दिशेनं प्रयत्नाशील होती. ते निर्माण झालंच, ते अस्तित्वात आलंच, नव्हे आहेच हया चुकीच्या समजूतीतून सावरकरावर द्विराष्ट्रवादाचं समर्थन करण्याचा आरोप करण्यात येत होता. मुसलमान स्वतःला वेगळं 'राष्ट्र' मानतात एवढेच सावरकर सांगतात. ते त्यांना हिंदुस्थानात 'राष्ट्र' संकल्पनेचे अधिकारी मानित नाहीत. कारण हिंदुस्थानात बहुसंख्य हिंदु हेच ऐतिहासिक, सांस्कृतिक दृष्ट्या 'राष्ट्र' ह्या संज्ञा-संकल्पनेचे मानकरी हीच त्यांची भूमिका होती. इतर अल्पसंख्यक केवळ लोकगटच. परंतु सावरकरांच्या स्पष्ट प्रतिपादनाचा विपर्यास करण्यात आला नि आजही तो तसाच करण्यात येतो.

सतत सहा सात वर्ष सावरकरांची हिंदु महासभेच्या अध्यक्षपदी निवड झाली. ह्या काळात त्यांनी आपली विचारप्रणाली जनमानसात रुजविण्यासाठी वादळी प्रचार केला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक आगळं वलय लाभलेलं होतंच. जनमानसात त्याच्याविषयी विलक्षण आकर्षण होतं. कच्छपासून कामरूप (असम) पर्यंत नि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत असा पश्चिम-पूर्व, उत्तर-दक्षिण विभाग त्यांनी आपल्या अमोघ वर्क्तृरत्वानं अगदी ढवळून काढला नि हिंदुमहासभा एक प्रभावी पक्ष म्हणून उभा केला. डॉ. शामाप्रसाद मुखर्जी, बॅ. निर्मलचंद्र चटर्जी, आसुतोष लाहिरी, भाई परमानंद, प्रा. वि. घ. देशपांडे, पु. भा. भावे सारखी माणसं त्यांच्याच प्रभावळीत हिंदुसभेत कार्यरत झाली.

**सावरकर-सुभाषचंद्र भेट :-**

सावरकर हिंदुसभेचे अध्यक्ष म्हणून राजकीय क्षेत्रात कार्यरत होते. द्वितीय महायुद्धाचा हा काळ होता. ह्याच काळात काँग्रेस मधून हाकलण्यात आलेले सुभाषबाबू एक दिवस सावरकर सदनात आले. वास्तविक ते सावरकरांची भेट घ्यावी म्हणून मुंबईला आलेले नव्हते तर प्रामुख्याने जीनांच्या भेटीसाठी आलेले होते. काँग्रेसमधून हकालपट्टी झालेली असल्यामुळे आता ते काँग्रेसचे प्रतिनिधी राहिले नव्हते. जीनांनी त्यांना हिंदुराष्ट्राचा पुरस्कार करणाऱ्या सावरकरांची भेट घेऊन मगच भेटीसाठी आल्यास भेट सार्थ ठरेल असं ऐकविलं. त्यामुळं त्यांना सावरकरांची भेट घेणं भागच पडलं. जीना सावरकरांनाच हिंदुनेता मानीत. सावरकर सदनात उभयतांची भेट झाली (२२ जून १९४०) देशातील घडामोडीवर सावरकरांचं बारीक लक्ष होतंच. आंतर्राष्ट्रीय वातावरण कोण्या दिशेने जात आहे वा जाणार ह्याचाही त्यांना कयास होता. जपानमध्ये स्थायिक झालेल्या रासबिहारी बसूसारख्या क्रांतिकारकांचा नि त्यांच्या गुप्त पत्रव्यवहार होताच. त्या पत्राच्या आधारेच जपान दुसऱ्या महायुद्धात ब्रिटन विरोधात उतरण्याची शक्यता

सावरकरांनी बोलून दाखविली. सुभाषबाबूंसारख्या तेजस्वी तरुणानं बाहेरच्या देशात जाऊन त्यांचं सैनिकी साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न करावा नि युद्धात गवसलेल्या ब्रिटिश राज्याला शेवटचा परिणामकारक टोला हाणावा असा विचार त्यांच्या जवळ व्यक्त् केला. रासबिहारी बसूंचं त्यांना शेवटचं आलेलं १९३९ च्या काळातलं पत्रही त्यांच्या पुढ्यात टाकलं. इंग्रज राज्यकर्ते प्रत्यक्ष हिंदुस्थानच्या उरावर नाचत असताना त्यांचे पुतळे आदि हलविण्याच्या यःकश्चित चळवळी करून तुरुंगात सडत पडण्याचा धोका पत्करू नये असंही आपलं मत व्यक्त केलं. कोणताही शब्द दिला नाही, परत भेटू असं सांगून त्यांनी निरोप घेतला. लवकरच त्यांनी त्यांच्या संकल्पाप्रमाणे इंग्रजाचे पुतळे हटविण्याची चळवळ केलीच. जनजागृतीचा तोच मार्ग निदान त्यावेळी तरी त्यांना उचित वाटला असावा. सावरकरांनी भाकीत केल्याप्रमाणे त्यांना अटक करण्यात आली नि तुरुंगात डांबण्यात आलं. तुरुंगात मात्र सावरकर विचार विचार नि सूचनेचा आठव झाला असावा. त्यानुसार त्यांनी आपली दिशा ठरविली नि एक दिवस सारी सोंगढोंग करून आपली गुप्तपणे सुटका करून घेतली.

**सुभाषबाबूंचे गुप्त पलायन-सावरकरांचा सैनिक प्रचार :-**

तुरुंगातून एक दिवस सुभाषबाबूंनी गुप्तपणे यशस्वी पलायन केलं. काबूल मार्गे त्यांनी रशियात प्रवेश केला. तेथे त्यांना अपेक्षित साहाय्य मिळणं कठीण होतं. त्यांनी मग जर्मनीला प्रयाण केलं. जर्मन राजकीय नेत्यांशी सतत भेटीगाठी केल्या, चर्चा आरंभिल्या. सततच्या प्रयासानंतर जर्मन शासनाकडून अपेक्षित साहाय्याची आशा वाटली नि ती पूर्ण होण्याची घडीही आली. त्यांना सर्वप्रथम स्वतंत्र हिंदुस्थानसाठी नभोवाणी केंद्र काढण्याची अनुमती मिळाली. १९०८ ला जर्मनीत स्टटगार्डला भरलेल्या आंतर्राष्ट्रीय समाजवादी काँग्रेसमध्ये अभिनव भारताच्या प्रतिनिधी मॅडम कामा ह्यांनी स्वतंत्र हिंदुस्थानचा ध्वज फडकविलेला

होता. उपस्थित प्रतिनिधींनी त्यावेळी त्याला मानवंदनाही दिलेली होती. भारतीय क्रांतिकारक पहिल्या महायुद्धापासूनच जर्मनीत कार्यरत असत. कारण जर्मनी म्हणजे ब्रिटिशांचा क्रमांक एकचा शत्रू ही बाब ते जाणून होते. ह्यासर्व घडामोडीचा परिणाम हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयी जर्मनीत सहानुभूतीचं वातावरण निर्माण करण्यात झालेला होता. जर्मन सम्राट कैसर विल्यम्सनं राष्ट्राध्यक्ष विल्सनला केलेल्या तारेतही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाचा उल्लेरख जागतिक शांततेच्या संदर्भात केलेला होता. जर्मनीच्या तत्कालीन शासनाच्या साहाय्यानेच सुभाषबाबू जपानला पोहचू शकले. त्यांचा हा प्रवास पाणबुडीतून झाला नि तो जर्मनीच्या सैनिकी साहाय्यामुळेच काय तो शक्य होता, अन्यथा नाही. जपानमध्ये पोहोचताच सुभाषबाबूंच्या हालचालींना वेग आला. दुसऱ्या महायुद्धात जपान ब्रिटिश विरोधात असणं ही बाब हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या संदर्भात सर्वाधिक महत्त्वाची होती. क्रांतिकारक रासबिहारी बसू जपानात आधीपासूनच ह्या दिशेनं काम करीत होते. त्यांना बऱ्याच प्रमाणात यशही आलेलं होतं. त्यांनी जपानात स्थापन केलेल्या 'भारतीय स्वातंत्र्य संघ' ह्या संघटनेला जपानी शासनाची मान्यताही मिळविलेली होती. युद्धात पूर्व आघाडीवर जपान विजयी होत शेवटी सिंगापूरवर जपानचं स्वामित्व प्रस्थापित झालेलं होतं. सिंगापूरची सूत्र रासबिहारी बसूंच्या स्वाधीन करण्यात आली. त्याचवेळी सुभाषबाबू जपानला पोचले. राजबिहारींना त्याची वार्ता होतीच. इकडे हिंदुस्थानात त्याचवेळी सावरकर, "तरुणांनो, सैन्यात भरती व्हा. कधी नव्हे अशी सुवर्णसंधी चालून आलेली आहे. ब्रिटिशांच्या सैन्यभरतीचा पूरेपूर लाभ उचला नि नौदल-भूदल-वायुदलात प्रवेश घ्या. शस्त्रास्त्रांची ओळख, रणभूमीवरील डावपेच सारंसारं शिकून घेण्याची हीच आयती संधी. त्यांच्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी वापर कसा नि केव्हा करायचा ह्याची प्रेरणा वेळ आपोआपच देईल." अशा स्पष्ट शब्दात उघड उघड प्रचार करीत असत. त्यांच्या दूरदृष्टी प्रचाराचं मर्म न उमगलेलं काँग्रेसी नेते त्याचवेळी त्यांना

ब्रिटिशांचा ‘स्क्रिटूवीर’ संबोधून त्यांची अवहेलना करीत होते की स्वतःच अज्ञान, अडाणीपण, प्रकट करीत होते? कारण सावरकरांसारख्या बावन्नोकशी स्वातंत्र्यावीराचं अंदमानी दिव्यही विसरून ते तसा आरोप करीत होते. हिंदुस्थानात काँग्रेसी नेते सावरकरांवर असा घृणास्पद आरोप करीत असलेत तरी त्याचवेळी तिकडे सुभाषबाबू मात्र सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या प्रचाराचा गौरव करीत होते, त्याचे प्रकटपणे स्वागत करीत होते. सिंगापूर आकाशवाणी वरून केलेल्या भाषणात ते म्हणाले, “चुकीची राजकीय विचारप्रणाली नि द्रष्ट्यादृष्टीच्या अभावी काँग्रेसचे जवळपास सारेच नेते ब्रिटिश सेनेतील हिंदीसैनिकांना ‘भाडोत्री’ म्हणत नि तुच्छ लेखित; त्याचवेळी सावरकर मात्र सैन्य भरतीचा उघड प्रचार करीत आहेत ही मोठी आशादायक, उल्लेसखनीय गोष्ट होय. ह्याच तरुणातून प्रशिक्षित अधिकारी नि युद्ध कुशल सैनिकांचा आझाद हिंदसेनेला पुरवठा होत आहे.” सावरकरांच्या द्रष्ट्या दृष्टीने पाहिलेल्या सशस्त्र स्वातंत्र्य संघर्षाचा विचार असा प्रत्यक्ष कृतीत उतरविणाऱ्या नेताजी सुभाषबाबूंनी अशा प्रकटपणे समर्थन करण्यापेक्षा अन्य पावती कोणती असणार?

**सिंगापूर-सुभाष-रासबिहारी भेट :-**

सशस्त्र राज्यक्रांतीच्या प्रयत्नि रासबिहारी आरंभापासूनच सक्रिय होते. जपानात त्यांचे वास्तव्यही बऱ्याच वर्षाचे. सिंगापूरची सूत्रे त्यांच्या कार्याच्या यशस्वीतेची पावती होती. परंतु आता रासबिहारीचं वय बरच झालेलं होतं. आकांक्षा नि इच्छाशक्ती प्रबल नि प्रखर असली तरी वयोमानानुसार त्यांची कार्यक्षमता पुढचा संघर्ष करण्यास अगदी असमर्थ नसली तरी उणी निश्चितच होती. ते स्वतःही बाब ओळखून होते. सुभाषबाबूसारखा तरुण जपानमध्ये पोहोचल्याचा त्यांना विलक्षण आनंद झालेला होता. स्वतः आघाडीवर असताना ब्रिटिश सैन्यातील हिंदी सैनिकांना त्यांनी त्यांच्या अंतकरणाला जाऊन भिडणाऱ्या शब्दांनी

आवाहन करताच ४५००० हिंदी सैनिक ब्रिटिश पक्ष सोडून त्यांच्या बाजूस मिळालेले होते. अशा आश्चर्यकारक प्रतिसादाचे वस्तुनिष्ठ वर्णन 'टू ग्रेट इंडियन्स इन जपान' ह्या पुस्तकाचे जपानी लेखक जे. जी. ओहसावा ह्यांनी आपल्या पुस्तकात केलेले आहे. सावरकरांचे 'तरुणांनो सैन्यात भरती व्हा' हे धोरण प्रत्यक्ष अशा अनुकूल प्रतिसादात आकारास येत होतं असा अभिप्राय प्रस्तुत पुस्तकाच्या लेखकानं नोंदविला आहे. सिंगापूरलाच वृद्ध सेनानी राबिहार बसूंनी सेनापतीपदाची सूत्रे तरुण, तडफदार अशा सुभाषबाबूच्या स्वाधीन केली. 'देशगौरव' सुभाषबाबू आता 'नेताजी' झालेत. त्यांनी मग हिंदुस्थानच्या पूर्व सीमावर धडका देण्यात यश मिळविलं. त्यांच्या नेतृत्वाखालीच क्रांतिकारकाच्या कष्टांनी पुनित झालेलं अंदमान स्वतंत्र झालं. त्यांनीच तेथे अस्थायी शासनाची घोषणा केली, क्रांतिकारक देशभक्तांवच्या घामानं नि रक्ताचनं पावन झालेल्या त्या कुप्रसिद्ध कारावासाच्या वास्तूला सुभाषचंद्रानी आपल्या कार्यकर्तृत्वनं मुक्ते करून मानाची वंदना दिली. विजयी वाटचाल करीत ते इंफाल-असमच्या सीमेवर धडकले. परंतु दुर्दैवानं अनपेक्षित घाला घातला. जपानमधील हिरोशिमा नागासाकी ह्या नगरावर अमेरिकेनं अणुअस्त्रांचा घाव घातला. त्या भयानक प्रयोगामुळे जपानला नुसती माघारच नव्हे तर युद्ध स्थगितीची शरणागती पत्करावी लागली. परिणामी सुभाषबाबूंच्या विजयी वाटचालीला अटकाव झाला. त्यांना माघार घेणच भाग पडलं.

## युद्ध-समाप्ती-स्वातंत्र्याची पहाट :-

सुभाषचंद्र बोस पूर्वसीमेवर अशी विजयी वाटचाल करीत असताना इकडे सावरकर स्पष्टपणे सांगत की, हिंदुस्थानचं स्वातंत्र्य आता चर्चिलच्या निर्णयावर अवलंबून राहिलेलं नसून ते युद्धदेवतेच्या हाती आहे. नेमकी ही युद्धदेवताच ऐन विजयाच्या प्रसंगी रुसली. पण ती ब्रिटनवरही प्रसन्ना नव्हती. विजय मिळूनही ब्रिटन पराभूत झाल्यागत होतं. तरुणांची एक पिढीच युद्धात कामी आली होती. युद्धावरील प्रचंड

खर्चामुळं ब्रिटिश साम्राज्य दिवाळखोरीत निघालं, ते ब्रिटिश साम्राज्याचं कंबरडच मोडणारं ठरलं. युद्धोत्तर ब्रिटीनमध्ये सत्तांतर घडून आलं. साम्राज्यवादी नि युद्धखोर चर्चिलची रावट संपली. क्लेयमंट ॲटली पंतप्रधान पदावर आले. युद्धज्वरानं पार बिघडून टाकलेल्या ब्रिटनची प्रकृती सुधारण्याचं, विस्कटलेली आर्थिक घडी परत नीट करण्याचं दायित्व त्यांच्यावर आलं. त्यासाठी शांतता हवी होती. हिंदीसैन्य आपल्या आज्ञेत ठेवणं केवळ अशक्य नि आपल्याजवळ साम्राज्य सुरक्षित ठेवण्या इतकं सैन्यबळ उरलेलं नाही. अशी वेळी साम्राज्याचा संसार सत्तांतर करून आटोपता घेणंच योग्य नि आवश्यक मानून त्यांनी तसा निर्णय घेतला, ॲसटलीची ही भूमिकाच सैनिकी संघर्षाच्या यशस्वीतेची साक्ष नाही काय?

**सावरकर-फाळणीची भयसूचना :-**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सावरकर एकीकडे सैन्यभरतीचा उघड उघड प्रचार करून सशस्त्र संघर्षाद्वारे स्वातंत्र्य संपादनाचा प्रयत्न करीत होते तर दुसरीकडे काँग्रेसी नेत्यांच्या ध्येयधोरणाची अंतिम परिणती देशाच्या फाळणीत होणार आशी भयसूचना जनतेला देत सानधान करीत होते. सावरकर हिंदुस्थानात हिंदू हेच राष्ट्र ह्या तात्त्विक भूमिकेतून हिंदुत्व- हिंदुराष्ट्र विचारप्रणालीचा प्रखर पुरस्कार करीत होते. तरीही ते 'हिंदीराष्ट्र' विरोधी नव्हते. अशा प्रकारच्या हिंदीराष्ट्रात सर्वच 'हिंदी'. मग त्यात कोणी 'हिंदू' नाही वा 'मुसलमान' नाही ही त्यांची भूमिका होती. त्यामुळेच मुसलमानांच्या अलगतावादी मानसिकतून ते करीत असलेल्या स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीकडे ते दुर्लक्ष वा डोळेझाक करून त्यांचा अनुनय करण्याच्या धोरणाच्या विरुद्ध होते. देश स्वातंत्र्याच्या प्रश्नाबाबत त्यांची भूमिका अखंड हिंदुस्थानची होती. त्यासाठीच मग त्यांनी 'याल तर तुमच्या सह, न याल तर तुमच्या विना नि विरोधाल तर विरोधून' अशा धोरणाचा कणखर, कठोर पुरस्कार केला.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सावरकर अगदी जीवाच्या आकांतानं जनमत जागृत करीत होते. कॉंग्रेसची ‘छोडो भारत’ चळवळ अंती ‘तोडो भारत’ ठरणार म्हणून बजावीत होते. संभाव्य सत्तांतराच्या संदर्भात ते ‘कॉंग्रेसला मत म्हणजे पाकिस्तानला मत’ टाकणारे आपले देशबांधव हिंदीराष्ट्राला मत देण्याऐवजी पाकिस्तान निर्मितीला मत देतील ही वस्तुस्थिती त्यांच्या द्रष्ट्या दृष्टीला स्पष्ट दिसत होती. कॉंग्रेसच्या मुसलमान विषयक अनुनयाची परिणती शेवटी पाकिस्तानची मागणी मान्य करण्यातच होणार ह्याची सावरकरांना अगदी खात्री होती. सावरकरांनी जीवाची अगदी आगपखड करून जनतेला सावधान करण्याचं आपलं कर्तव्य केलं. जनतेनं मात्र त्याच्या ध्येयधोरणाच्या बाजूनं कौल न देता तो कॉंग्रेसलाच दिला. निवडणूकीत कॉंग्रेस विजयी ठरली. हिंदुमहासभा पराभूत झाली. (१९४६) ‘नाही, नाही, कदापि नाही’ असं म्हणत म्हणत कॉंग्रेसनं फाळणीच्या मागणीला मान्यता दिली. देश दुभंगला गेला. पाकिस्तानची निर्मिती झाली. देश स्वातंत्र्याच्या चळवळीत देशाच्या फाळणीची घटना म्हणजे निरपराधाच्या नरसंहाराचं रक्ततरंजित पर्व.

**स्वातंत्र्य-फाळणीची वेदना :-**

ब्रिटिश संसदेत सत्तांतराची घोषणा करण्यात आली. सत्तांतराच वर्ष ठरलं. (एप्रिल, १९४८) लॉर्ड वॉव्हेल ह्यांना परत बोलाविण्यात आलं. त्यांच्या जागी व्हॉईसरॉय म्हणून लॉर्ड माऊंटबॅटनची रवानगी करण्यात आली. प्रशासकीय नि सैनिकी असे दोन्ही अधिकार असलेले माऊंटबॅटन एकमेव नि पहिले व्हॉईसरॉय. त्याच्या नेतृत्वाखाली सत्तांतरांच्या हालचालींना साहजिकच वेग आला. त्यांनी १९४८ ऐवजी १९४७ लाच सत्तांतर घडवून आणण्याचा निर्णय घोषित केला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अनेरिकी राष्ट्राध्यक्षानंतरचा मान माऊंटबॅटन ह्यांचाच होता. त्या काळातील पूर्वेकडील आघाडीचा सर्वात महत्त्वाचा विजय माऊंटबॅटन

ह्यांनी १५ ऑगस्टलाच मिळविलेला होता. तोच दिवस सत्तांतराचा म्हणजेच देशाच्या फाळणीचा ठरवून त्यांनी आपला विजयदिन सारजा केला. ब्रिटिशांच्या 'तोडाफोडा' राजनीतीचा कळसाचा अध्याय देशाच्या फाळणीनं असा पूर्ण झाला.

१५ ऑगस्ट १९४७. ह्याच दिवशी हिंदुस्थानची सत्तासुत्रे पंतप्रधानपदी विराजमान जवाहरलाल नेहरुंच्या हाती सोपविण्यात आली. भारतीय स्वातंत्र्याची त्यांनी घोषणा केली. देश स्वतंत्र झाला. सावरकरांना त्याचा विलक्षण आनंदच होता; परंतु तो विशुद्ध नव्हता. कारण त्याचवेळी देश दुभंगला होता. एकीकडे आनंदोत्सव तर दुसरीकडे रक्तरपात, नरसंहार, जाळपोळ असं दृश्य होतं. म्हणूनच एका डोळ्यात आनंदाश्रू तर दुसऱ्या, डोळ्यात दुःखाश्रू साठवून सावरकरांनी स्वातंत्र्याचं स्वागत केलं. देशस्वातंत्र्यासाठीच त्यांनी अपार कष्ट सोसले होते. जिथून बाहेर पडलंच तर आपलं निर्जीव कलेवरच बाहेर पडेल अशी खूणगाठ त्यांनी बांधूनच सारं सहन केलं होतं; परंतु सद्‌भाग्यानं 'याचि देही याचि डोळा' त्यांना स्वातंत्र्याचा सोहळा साजरा करण्याची संधी मिळाली. सावरकरांनी भगव्यासह स्वतंत्र भारताचा तिरंगा लावून स्वगृहीच स्वातंत्र्योत्सव अगदी एकाकीपणे साजरा केला होता.

**सावरकर-राजकीय निवृत्ती :-**

१९४४ पासूनच सावरकर सक्रिय राजकारणापासून जवळपास निवृत्त झाल्यासारखेच होते. हिंदुमहासभेची सूत्रे त्यांनी डॉ. शामाप्रसाद मुखर्जीकडे सोपवून ही निवृत्ती स्वीकारलेली होती. तत्कालीन पारतंत्र्याच्या परिस्थितीनं त्यांना स्वातंत्र्यासंघर्षात ओढलेले होतं. चाफेकरांच्या हौतात्म्यातून त्यांनी स्वातंत्र्याची प्रेरणा घेतली होती, प्रतिज्ञा केली होती. सशस्त्र संघर्षाच्या स्वीकृत प्रयत्यातत सावरकर 'स्वातंत्र्यवीर' ठरलेत. कारण त्या काळात त्यांना दुसरा कसला ध्यासच मुळी नव्हता. स्वातंत्र्य देवतेलाच त्यांनी तनमन अर्पण केलेलं होतं. 'तुज

साठी मरण ते जनन, तूजवीन जनन ते मरण' हीच तर त्यांची भावना होती, भूमिका होती. त्यांनी भावनेच्या भरात प्रतिज्ञा घेतलेली नव्हती तर अगदी डोळे उघडे ठेवून स्वीकारलेली होती. ह्या स्वीकृत व्रतातील दिव्यत्व तसंच दाहकत्वंही ते जाणून होते. हे 'सतीचं वाण' त्यांनी 'बुद्धयाची' स्वीकारलेलं होतं.

**साहित्यिक मानसन्मान :-**

सावरकर जसे 'स्वातंत्र्यवीर' होते तसेच होते ते साहित्यिक पण. अर्थात सावरकरी साहित्य म्हणजे त्यांच्या उपजत प्रतिभेनं त्यांच्या जीवनाला दिलेलं शब्दरूपच असणार. त्यांच्या साहित्यात म्हणूनच एका आगळ्या प्रकारची ऊर्जा आहे. त्यांच्या उर्जस्वल साहित्यसेवेची नोंद घेऊन बडोदा नि मुंबई साहित्य सम्मेलनांच्या अध्यक्षपदानं त्यांना सन्मानित करण्यात आलं. सांगलीच्या मराठी नाट्य समंलेनाचं अध्यक्षपद भूषविण्याचा मानही त्यांना लाभला. ह्याच वर्षी सावरकरांच्या साहसी, संघर्षमय जीवनाची साठ वर्ष पूर्ण झालीत. त्या निमित्तानं त्यांच्या अनुयायांनी, हितचिंतकांनी त्यांचा षष्ठ्व्दिउत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला. त्याचं शि. ल. करंदीकर कृत चरित्र ह्याच वर्षी प्रकाशित झालं. नागपूर विद्यापीठानं त्यांच्या साहित्य सेवेची नोंद घेऊन त्यांना डि.लीट ही सर्वोच्च  पदवी प्रदान करून सन्मानित केलं. ब्रिटिश सत्ताकाळात सावरकराचा असा सन्मान करणारं नागपूर हेच पहिलं विद्यापीठ, एकापाठोपाठ एक असे अनेक मानसन्मान वाट्यास येत असतानाच त्यांचे वडील बंधु, त्यांच्या क्रांती जीवनातला त्यांचा पाठीराखा, त्यांचा सखा बाबाराव सावरकर सांगलीला शेवटचे दिवस मोजीत होते. सावरकर त्यांच्या भेटीस सांगलीला गेलेत. "तीन पिढ्यांनी करावयाचं कार्य आपल्या घराण्यात एकाच पिढीनं पूर्णत्वास नेलं तेव्हा आता कर्तव्य पूर्तीच्या आत्मानंदात चिरंतन चैतन्यात विलीन होण्यातच जीवनाची सारी सार्थकता" ह्या निरोपाच्या शब्दात वडील बंधूना वंदना

दिली. प्रकृतीमुळे सावरकरांनी सक्रिय राजकीय क्षेत्रातून निवृत्ती स्वीकारलेली असली तरी राष्ट्रीय राजकारणापासून निवृत्ती अशी त्यांनी कधीच स्वीकारलेली नव्हती. कारण राष्ट्रसेवा हा तर त्यांचा श्वासच होता. सत्तांतराच्या संबंधात क्रिप्स समितीनं भारताला भेट दिली. समितीच्या सन्मान्य आमंत्रणावरून सावरकर समितीच्या भेटीस गेलेत. समवेत डॉ. शामाप्रसाद मुखर्जी नि डॉ. मुंजे होते. समितीपुढं त्यांनी आपले विचार स्पष्ट शब्दात नोंदविलेत (१९४६) ह्याच वर्षी सावरकर साहित्यावरील बंदी उठविण्यात आली.

**गांधी हत्या-अभियोगदिव्य-मुक्तपता :-**

दोन जन्मठेपांचं भयंकर लोढणं गळ्यात अडकवून अंदमानला त्यांची रवानगी करण्यात आली होती. तेथील अकरा वर्षाचं नारकीय यातनामय कष्टभोगी आयुष्य. त्यानंतर तीन वर्षाचा तुरुंगवास नि तेरा वर्षाची स्थानबद्धता संपवून शेवटी सावरकरांची विनाअट मुक्तरता करण्यात आलेली होती. (१९३७). स्थानबद्धतेतून सुटका झाल्यावर अनेक ठिकाणी त्यांचे स्वागत झाले. काही ठिकाणी त्यांना निषेध घोषणा नि विरोधही अनुभवावा लागला. मुक्तच जीवनात आता त्यांना साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान दोन वेळा लाभला. नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाची माळही त्यांच्या गळ्यात पडली होती. मुक्त तेच्या वर्षीच हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदी विराजमान झालेले होते. सतत सात वर्षे ह्या पदावर त्यांची अविरोध निवड होत गेली. सावरकरांच्या जीवनातला हा एक प्रकारे ‘वसंत’ होता. परंतु ऋतुचक्रात त्याचा अवधीकाल संपला. जीवनात ‘शिशिर’ आरंभ झाला. तो स्वातंत्र्यकाळात. स्वातंत्र्यासमवेत झालेल्या फळणीच्या विध्वंसानं, नरसंहारानं व्रणित मनाची जी प्रतिक्रिया उमटली ती गांधीहत्येत, ह्या दुर्दैवी प्रकरणात सावरकरांना गोवण्यात आलं. कारण अर्थातच ती हत्या करणारा हत्यारी सावरकरांचं नेतृत्व, त्यांच राजकीय तत्त्वज्ञान मानणारा हिंदुमहासभेचा कार्यकर्ता होता.

अंदमानीय यातना नि छळापेक्षाही स्वतंत्र भारतात लाल किल्यातील अभियोगाचा मनस्ताप अधिक वेदनादायी होता. पण नेहमीच प्रतिकूल तेच घडेल असं जीवनसुत्र उराशी बाळणारे सावरकर ह्या अभियोगालाही त्याच धैर्यानं सामोरे गेले. स्वतः अंदमानचा परमेश्वर म्हणविणाऱ्या मदांध, मस्तवाल बारीलाही सावरकरांनी नमविलं होतं. परंतु गांधीहत्या अभियोग म्हणजे त्यांच्या आयुष्याची सत्वपरीक्षाच होती. त्याचं सत्व ह्या परीक्षेच्या कसाला उतरलं. अभियोगाच्या दाहक दिव्यातूनही त्यांची निष्कलंक, निर्दोष सुटका झाली. (१० फेब्रु. १९४९). सुटकेनंतर दिल्ली.त त्याचं भव्य स्वागत नि मिरवणूक असा मानस बाळगून सिद्धता करणाऱ्यांची मात्र घोर निराशा झाली. कारण त्यांना लगेच, तत्काल दिल्लीण सोडण्याचा आदेश होता. सावरकर मग सरळ मुंबईला परतले. सुटकेचं समाधानंही नियतीनं त्यांना मिळू दिलं नाही. कारण त्यांचे धाकटे बंधु डॉ. नारायणराव सावरकर ह्याच वर्षी निधन पावले. त्यानंतरही अटक नि तुरुंग ह्यांनी त्याची कधी पाठ सोडली नाही. पाकिस्तानी प्रधानमंत्री लियाकतअळी ह्यांच्या भारत भेटीच्या वेळी सावरकरांना अटक करण्यात आली. त्यांना तुरुंगात डांबण्यात आलं. अटक नि तुरुंग स्वतंत्र भारतातही त्याच्या जीवनात चुकले नाहीत. जणु ह्या बाबी त्यांच्या जीवनाचा एक भागच होऊन गेल्या होत्या.

## ‘अभिनव भारत’ सांगताः-

देश स्वातंत्र्यासाठीच तर सावरकरांनी सारे कष्ट उपसलेले होते. तो सोनियाचा दिवस पाहण्याचं सद्भाग्य त्यांना लाभलं होतं. इंग्रजी सत्तेचा ‘युनियन जॅक’ खाली उतरून आता त्या जागी स्वतंत्र भारताचा ‘तिरंगा’ फडकत होता. ह्या स्वातंत्र्यासाठीच अगदी पंधरा वर्षाच्या कोवळ्या किशोरवयात सावरकरांनी सशस्त्र संघर्षाची प्रतिज्ञा घेतलेली होती. चापेकरांचं बलिदान व्यर्थ जाता कामा नये. त्यांचं कुणीतरी पुढं चालवायलाच पाहिजे. मग मीच ते का चालवू नये असं त्यांच्या

संवेदनाशील स्वातंत्र्याकांक्षी मनानं घेतलं. निर्णय घेतला, निर्धार केला नि त्यांनी प्रतिज्ञा घेतली. तडक त्याप्रमाणं कामालाही लागले. 'राष्ट्रभक्त समूह' ही गुप्त संघटना नासिकला काढली. 'अभिनव भारत' हे त्याचं संघटनेचं विशाल व्यापक स्वरूप. त्या संघटनेचा स्वातंत्र्य संपादनाचा हेतू सिद्ध झालेला, सफल झालेला. स्वप्नस साकार झालं होतं. ध्येय पूर्ण झालं होतं. मग त्या संघटनेही सांगता कारणं आवश्यक होतं. ज्या नासिकात ही संघटना अस्तित्व, आकारास आलेली होती त्याच नासिकात ह्या संघटनेचा सांगतासमारंभ आयोजित करण्यात आला. पदोपदी मृत्यूशी झुंज घेत त्यावर मात करून जे वाचलेट अशा सर्व क्रांतिकारकांना सावरकरांनी सन्मानाची आमंत्रण धाडली. त्यांच्या ह्या समारंभात यथोचित सत्कार केला. जे स्वातंत्र्य समरात कामी येऊन हौतात्म्याप्रत पोचले होते अशा ज्ञान-अज्ञात क्रांतिकारकांना सावरकरांनी आपल्या प्रभावी शब्दात श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या स्मरणार्थ वास्तू उभी केली. ज्या दिवशी अठराशे सत्तावनच्या पहिल्या स्वातंत्र्य संगराचा आरंभ झालेला होता त्याच दिवशी सशस्त्र स्वातंत्र्य संग्रामाचा हा सोहळा पार पाडण्यात आला. (१० मे १९५६). हा सांगता समारंभ म्हणजे स्वातंत्र्यसमराचा शताब्दि महोत्सवच होता.

**सीमारक्षक-सूचना :-**

सक्रिय राजकारणातून निवृत्त होऊन आता सावरकरांना दहाअकरा वर्षे झालेली होती. परंतु देशाच्या नवजात स्वातंत्र्याच्या रक्षणाचा विषय त्यांच्या मोठ्या जिव्हाळ्याचा, चिंतेचा विषय. देशाच्या सीमांची आणखी, त्यांची सुरक्षा त्यासाठी आवश्यक ती शस्त्रसिद्धता ह्या बाबतीत त्यांची मत स्पष्टपणे ते नोंदवीत. सुरक्षा संबधात त्यांची दृष्टी विलक्षण बारकाईनं परिस्थिती न्याहाळीत असायची. 'हिंदीचीनी भाई'ची गुंज भारतात घुमत असताना, शांतीची कबुतरं उडवीत देशात सहजीवन, सहकार, समन्वय आदि पंचशील तत्त्वांची पारायणे होत असतानाच सावरकरांनी मात्र

तिबेटचा उंदीर गिळंकृत करून जिभल्या चाटत रक्तारळलेल्या मुखानच चौ नि माओ भारतात प्रवेश करताहेत' ह्या शब्दात भयसूचना दिलेली होती. सावरकरांच्या द्रष्ट्या दृष्टीकडे, त्यांच्या भविष्यवाणीकडे दुर्लक्ष करण्यात आलं. चौ. माऊ परत जाताच संधी साधून चीननं भारताला आक्रमक धडक दिली. शांतीचा घोष नि त्यासाठी एकतर्फी शस्त्रसंन्यासाच्या धोरणाकडे झुकलेल्या भारताची पूरती धूळधाण उडाली. स्वसंरक्षणासाठी मग भारताला शस्त्रसज्ज अमेरिकेकडे केविलवाणी धाव घ्यावी लागली. भारताची की केविलवाणी दशा अमेरिकेत विदुषकाच्या क्रूर थट्टेचा विषय ठरली. पु. ल. देशपांडे ह्यांनी ह्या स्वानुभवाचं वर्णन 'असंख्य इंगळ्या डसाव्यात अशी वेदना झाली' ह्या शब्दात केलेलं आहे. चीननंच मग दुर्बल भारतावर जणु दया दाखविण्याचा आव आणित स्वतःच माघार घेतली. पण ती काही प्रदेश गिळंकृत करूनच हाच भाग 'अक्सा ई चीन' म्हटला जातो. भारताचा विदारक तेजोभंग संपूर्ण जगात झाला.

**रत्नागिरी-पतितपावन सुवर्ण महोत्सव :-**

रत्नागिरी स्थानबद्धेचा काळात सावरकरांनी आपलं सारं लक्ष सामाजिक परिवर्तनाच्या कामाकडे वलविलेलं होतं. पूर्वास्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाला सनातन्यांचा विरोध होता. सावकरांनी नवीन 'पतित पावन' मंदिराची उभारणी करून त्यांचा विरोध अर्थहीन करून टाकला होता. ह्या घटनेला पन्नापस वर्ष पूर्ण झालेली म्हणून मंदिराचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचा निर्णय रत्नाघगिरीतील नागरिकांनी घेतला. ह्या सुवर्ण महोत्सवाचे प्रमुख पाहुणे म्हणून सावरकरांना आमंत्रित करण्यात आलं. त्यांनी ते सहर्ष, सानंद स्वीकारलं. सावरकरांच्या लेखी त्यांच्या क्रांति कार्य इतकच किंबहुना थोडं अधिकच महत्त्व त्यांच्या सामाजिक कार्याला होतं. (२१ जुलै, १९५६)

**१९५७, दिल्लींत शताब्दि महोत्सव :-**

अठराशे सत्तावनच्या राज्यक्रांतीचा अर्धशताब्दि महोत्सव सावरकरांनी ब्रिटिश साम्राज्याच्या राजधानीत लंडनला साजरा करून दाखविला होता. त्यावेळी ही कृती ब्रिटिश सत्तेला आव्हान देणारी होती. आता देश स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र होतं. स्वतंत्र भारताच्या राजधानी दिल्लीहत पहिल्या स्वातंत्र्य समराचा शताब्दि महोत्सव साजरा करावा, स्वातंत्र्य युद्धाची फलस्वरुपी सांगता साधावी असं सावरकरांच्या मनानं घेतलं. आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्यानं दिल्लीकत हा महोत्सव घडवून त्यांनी सत्तावनच्या सर्व स्वातंत्र्य सेनानींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्तव करून कृतकृत्यतेचा अनुभव घेतला.

**सावरकर-अमृत महोत्सव :-**

१९५८ ला सावरकरांनी आपल्या वयाची पंचाहत्तर वर्ष पूर्ण केली. अग्निकुंडासारखे धगधगतं जीवन असलेल्या सावरकरांनी वयाची पंचाहत्तरावी गाठावी ही बाब आनंदाची तशीच अभिमानाची. त्यांच्या असंख्य चाहत्यांनी सर्वपक्षीय समितीद्वारे त्यांचा ‘अमृत महोत्व’ मुंबईत साजरा केला. त्याचप्रमाणे ह्याच वर्षी पुणे विद्यापीठानं त्यांना ‘डि.लीट’ ही पदवी प्रदान करून सन्मानित करण्याचा निर्णय घेतला. त्यांची प्रकृती, स्वास्थ लक्षात घेऊन सावरकरसदनात ही पदवी त्यांना देण्यात आली. फर्ग्युसन कॉलेजात शिकत असताना ज्या प्राचार्य रँगलर परांजप्यांनी त्यांना दंड ठोठावलेला होता, वसतीगृहातून बाहेर हाकलेलं होतं तेच रँगलर आता पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्यांच्याच कारकिर्दीत ही सन्मान्य पदवी देण्यात आली. काळानेच हा एक प्रकारचा प्रायश्चित्त प्रयोग घडवून आणला असं म्हटल्यास ते खचितच वावगं ठरणार नाही.

**सावरकर-मृत्यूजंय वर्ष :-**

सावरकरांच संपूर्ण जीवनच दैदिप्यमान कार्यकर्तृत्वानं भरलेलं, भूकंम्पीय उलथा-पालथी घटनांनी भारलेलं. त्यांच्या साहसी जीवनात मृत्यू अनेकदा त्यांना आडवा यायचा. पण प्रत्येक वेळी त्यांनी मृत्यूला फटकारलं. 'मज पाहोनि भ्याड मृत्यू पळत सुटतो' अशी त्यांची त्या काळची आव्हानात्मक भाषा-भूमिका होती. त्यांनी घेतलेल्या व्रताला ती त्यावेळी आवश्यक होती. तशीच उचितही, स्वाभाविक तशीच साजेशीही होती. अंदमानीय कारावासी जीवनात तर मृत्यूशी पदोपदी गाठ पडायची. परंतु अशा कराळ कारावासातही मृत्यू त्यांच्या जीवनाचा घास घेऊ शकला नाही. दोन जन्मठेपांची म्हणजे पन्नास वर्षाच्या सश्रम कारावासाचं लोढणं गळ्यात अडकवून ते मोठ्या धौर्यानं जगलेत, वाचलेत. सुदैवानं अकरा वर्षातच अंदमानीय कारावासातले कष्ट संपलेत. परंतु ही शिक्षा त्यांना पूर्ण करावी लागली असती तर सावरकरांची सुटका झाली असती ती १९६० ह्या वर्षी. हे वर्ष अनन्यसाधारण महत्त्वाचं म्हणून ते 'मृत्यूंजय वर्ष' म्हणून गाजलं. वृत्तपत्रातून असंख्य लेख झळकले. ठिकठिकाणी व्याख्यानमाला आयोजित केल्या गेल्या. अनेकानेक विशेषांक काढण्यात आलेत.

**सहासोनेरी पान-अद्वितीय ग्रंथ :-**

'अभिनव भारत' ह्या गुप्त क्रांतिकारी संघटनेचा सांगता समारंभ सावरकरांनी स्वतःच पुढाकार घेऊन घडवून आणलेला होता. त्या निमित्तानं त्यांनी अनेक व्याख्यानं दिली. प्रभावी वाणी नि असामान्य वक्तृत्वानं सावरकरांनी संपूर्ण इतिहासाच डोळ्यापुढं उभा केला. त्यालाच चिरस्थाई स्वरुप द्यावे म्हणून त्यांनी 'सहा-सोनेरी पाने' हा ग्रंथ पूर्ण केला. 'जोसेफ मॅझिनी', 'अठराशे सत्तावनचे पहिले स्वातंत्र्य समर', हिंदुपदपातशाही' सारखे ग्रंथ त्यांनी फारच अल्पावधीत लिहून काढण्याचा विक्रम केलेला होता. 'सहा सोनेरी पाने' ह्या ग्रंथाला मात्र बराच काळ लागला. आयुष्याच्या संध्याकाळात लिहिलेल्या ह्या ग्रंथाला

वेळ लागण्याचं एक कारण वृद्धत्व अर्थातच होतं. परंतु त्याही पेक्षा वर्तमान राष्ट्रीय जीवनाच्या संदर्भात इतिहास विषयक त्यांचा दृष्टीकोन, त्यांचं अलौकिक चिंतन त्यांना शब्दरूप करावयाचं होतं. भारताचा इतिहास म्हणजे पराभवाचा इतिहास ह्या अपसमजाचा प्रतिवाद करावयाचा होता. पराक्रमाची गौरवगाथा गात असतानाच इतिहासातील चुकांची मूलगामी चिकित्साही अभिप्रेत होतीच होती. म्हणूनच सावरकर लिखित 'सहा सोनेरी पाने' हा ग्रंथ त्यांच्या परिपक्कत चिंतनाचा अद्वितीय आविष्कार म्हणता येईल.

सर्वसाधारणपणे आर्थिक सुबत्ता नि सांस्कृतिक विकासाच्या कालखंडाला 'सुवर्णयुग' संबोधण्याचा प्रघात इतिहासात रूढ आहे. जसे प्राचीन भारतीय इतिहासात चंद्रगुप्त-विक्रमादित्याचा काळ, रोमच्या इतिहासात ऑगस्ट सिझरची राजवट, राणी एलिझाबेथची कारकीर्द, शहाजहानचा राज्यकाल वगैरे. परंतु सावरकरांच्या ह्या संदर्भातला निकषच वेगळा. सीमेचा पराक्रम गाजवून परकीय आक्रमकांना पार पिटाळून लावून सीमा सुरक्षित नि स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न म्हणजेच इतिहासातील सुवर्णाचे पान. कारण सावरकरी दृष्टीत सैनिकी सामर्थ्य नि शौर्य ह्यांच्या अभावी आर्थिक सुबत्ता नि साहित्य कलांचा सांस्कृतिक विकास वगैरे म्हणजे परकीय आक्रमणाला आमंत्रण. सावरकरांच्या 'सहा सोनेरी पाने' ह्यात चंद्रगुप्त मौर्य, यवनान्तक पुष्यमित्र शुंग, शकारी विक्रमादित्य, हुणान्तक वेशोवर्मा. तसंच मुसलमानांचे कर्दनकाळ शूरवीर मराठे नि सशस्त्र क्रांतिकारक ह्यांना मानाची सोनेरी पाने प्रदान केलेली आहेत.

वाङ्मय-साहित्य प्रकारात काव्य सर्वश्रेष्ठ, त्यातही नाट्य श्रेष्ठ, नाटकात कालीदास रचित 'अभिज्ञान शांकुलत'. त्या नाटकातही चौथा अंक नि चौथ्या अंकातील चौथ्या श्लोक सर्वात रमणीय, सर्वात श्रेष्ठ असं सांगणारं एक सुभाषित आढळतं. त्यांच धर्तीवर असं म्हणता येईल की सावरकरांच्या खंडात्मक साहित्यात 'सहा सोनेरी पाने' हाच सर्वात श्रेष्ठ

ग्रंथ ठरावा. त्यातही त्यातील ‘सद्‌गुणविकृती’ हे प्रकरण सर्वात श्रेष्ठ मानलं जातं वा जावं. कोणताही ‘गुण’ हा मूलतः केवळ ‘गुणच’ असतो. तो ‘सत्’ वा ‘असत्’ ठरतो तो संदर्भानुसार नि प्रमाणाच्या निकषांवर. आहिंसा, सत्य, दया, क्षमा, शांती, समन्वय, सहकार, सहजीवन, स्त्रीदाक्षिण्य, मानवता आदिचं मोल नि महत्त्व सावरकर नाकारीत नाही. त्यांच्या लेखी सुद्धा हे गुण म्हणजे ‘दैवसंपत्’च. परंतु पात्र, अपात्र विवेक न करता त्यांची अतिरेकी उपासना सावरकरांच्या दृष्टीनं आत्मघातक ठरते.

**विजयपर्व-आनंद नि खंत :-**

चिनी आक्रमणानं धडा शिकविला. देशाला त्यामुळेच सैनिकी सामर्थ्य नि सज्ञततेकडे लक्ष देणं अत्यावश्यक वाटायला लागलं. महाराष्ट्रात तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ह्यांच्या हाती संरक्षणाची सूत्रे सोपविण्यात आलीत. अर्थात त्यांची स्वातंत्र्य लढ्यात उतरण्याची प्रेरणा सावरकरच असं तर त्यांनी स्वतःच निसंदिग्ध शब्दात निवेदिलेलं होतं. स्वातंत्र्य नि त्यासाठी आवश्यक ते शौर्य ह्या बाबतीतील मराठी मनाची जडणघडण सावरकर जाणून होते. इतिहासाची साक्षच तशी होती. अभिनव भारताच्या सांगता सोहळ्यात त्यांनी ‘सारा हिंदुस्थान झोपला तरी एकटा महाराष्ट्र उठेल नि हे सूर सेविनी. सिंधू तुला मुक्त विना राहणार नाही’ अशी विलक्षण आत्मविश्वासाची वाणी उच्चारलेली होती. आता यशवंतराव चव्हाणासारखा मर्द मराठा गडी संरक्षण मंत्री झालेला होता. सावरकरांना मोठं समाधान वाटलं, आशांकुर त्यांच्या मनी प्रस्फुटीत झालेला असणार. संदेश, स्वागतादिबाबत तसे फारसे क्रियाशील नसणाऱ्या सावरकरांनी बुद्ध्याच पुण्याच्या यशवंतरावाच्या सत्कार सोहळ्यात प्रतिनिधी पाठवून त्यांचा अर्थगर्भ, सूचक सत्कार केलेला होता. त्यांच्याच कारकिर्दीत पुढं लवकरच पाकिस्तानाशी युद्ध प्रसंग आला. पाकिस्तानला पराभव पत्कारावा लागला. संरक्षण मंत्री

यशवंतरावांच्या शिरोभूषणात मानाचा तुरा खोवला गेला. 'लाहोर ओलांडून भारतीय सेना पुढं चालली ही वार्ता दिल्लीयहून दूरध्वनीनं सावरकर सदनात पोचली. सावरकरांनी यशवंतरांचं अभिनंदन केलं; पण त्याचवेळी आत्मघात होऊ न देता सरळ रावळपिंडी पर्यंत पोचू द्या' अशी सावधानतेची सूचना केली. हिंदुस्थानच्या पारंपारिक प्रकृतीप्रमाणे जे व्हायचं; पण होऊ नये ते घडलं. युद्ध स्थगिती होऊन तहाच्या नि कराराच्या दिशेनं पावलं पडली. रशियाच्या मध्यस्थीनं ताश्कंद करार झाला. सावरकरांच्या मनात अशा आत्मघातकी तडजोडीची संशयाची पाल चुकचुकली होतीच. सैनिकांनी रणांगणावर मिळविलेला विजय तहाच्या नि तडजोडीद्वारे निःसत्व करून टाकला जाईल ही त्यांच्या मनातली भीती अंती खरी ठरली. पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींनासुद्धा तो तह विवेक विरोधीच जाणवला. त्यांचं संवेदनाशील विवेकी मन ते सहन करू शकल नसावं. परिणामी परदेश भूमीवरच त्यांनी शेवटचा श्वास घेतला. विजयी हिंदुस्थानानं अशा प्रकारे विजित भूमी तर गमावलीच; पण आपला पंतप्रधानही.

**आत्मार्पण निर्धार-अंत :-**

ताश्कंद कराराने सावरकरांच्या आनंदावर विरजन घातलं. विजयाचं समाधान केवळ क्षणिक ठरलं. हिंदुन्थानचा खड्गहस्त होऊन महाराष्ट्र सिंधुमुक्त् करील ह्या त्यांच्या स्वप्नाषला, विश्वासाला तडा गेला. आता केवळ श्वास घेत जगणं त्यांना अर्थशून्य वाटायला लागलं. वयही झालेलं होतंच. कार्यकर्तृत्व म्हणण्यासारखं उरलेलं नव्हतं. सांगण्यासारखं सारं सांगून संपलेलं होतं. कसलीही अपेक्षा न बाळगता सारे मानसन्मानसुद्धा पदरी पडलेले होते. सावरकर एका परीनं पूर्णकाम, रिक्तकाम होते. दायित्व-कर्तव्यशून्य जीवन जगण्यापेक्षा आत्मार्पणाचा विचार बळावत गेला. ह्याच विचारातून त्यांनी 'आत्महत्या' की 'आत्मपर्ण' नावाचा लेख लिहून आपल्या मानसिकतेची दिशा प्रकट केली. जीवनातील

व्यथावेदना, दुःख कष्ट सहन न होऊन जीवनाचा अकाली अंत घडवून आणण्याची कृती म्हणजे आत्महत्या. वैधानिक दृष्ट्या ती कृती म्हणजे अपराधच म्हणून दंडार्हपण. परंतु जीवनात स्वीकारलेलं व्रत पूर्ण झालेलं, त्यांची सांगता करण्याचं सद्‌भाग्य पण अनुभवलेलं. मग आता पूर्णकाम भावनेनं मृत्यूला मित्र म्हणून आमंत्रित करून त्यांच्या स्वाधीन होणं ह्याला कोणी आत्महत्या म्हणत नाही तर 'आत्मापर्ण' संबोधतात. सावरकरांनीही त्याच मार्गाचा अवलंब केला. एकवीस दिवसांच्या प्रायोपवेशना नंतर 'धन्योऽहं, धन्योऽऽहं। कर्तव्य त मे विद्यते किंचित। धन्योऽ हं धन्योऽ हं। प्राप्तवंय सर्वमद्य संपन्नहम्।' म्हणत मृत्युला आवाहन केलं. मित्र म्हणून मृत्युशी हस्तांदोलन करीत ते त्याच्या खांद्यावर आरुढ झालेत (२६ फेब्रु. १९६६).

**बुद्धिवाद-राष्ट्रीय-राजकीय-सामाजिक जीवनाचं सूत्र :-**

चाफेकर-रानड्यांच्या बलिदानानं सावरकरांना देशस्वातंत्र्याची प्रेरणा दिली. प्रेरणा मानसिक; पण मार्ग ही बौद्धिक निवड होती. देशोदेशीच्या इतिहास वाचनानं ती अधिकाधिक दृढ होत गेली. स्वीकारलेल्या मार्गाचाच ते आयुष्यभर पाठपुरावा करीत राहिले. त्यावरील त्यांचा आत्मविश्वास कधी ढळला नाही. देशाचं स्वातंत्र हेच त्यांचा बुद्धिनिष्ठ निवडीची प्रत्यक्ष साक्ष ठरतं. देश स्वतंत्र झाला तो सशस्त्र युद्धाच्या परिणामीच, अन्य नाही. मग ते युद्ध देशातील स्वातंत्र्य सैनिकांनी दिलेल्या प्रत्यक्ष संघर्षाच्या आव्हानाचं असेल वा तो जागतिक युद्धाचं परिणाम असेल, ह्याचा अर्थ अन्य मार्ग अगदी परिणामशून्य असा खचितच नाही. जनजागृतीच्या संदर्भात त्यांचे मोल नि महत्त्व तेवढंच. आज देश नुसता शस्त्रसज्ञतच काय तो नाही तर अगदी अण्वस्त्र सज्ञ  झालेला आहे. ह्याचा सर्वाधिक आनंद जर कोणाला झाला असता तर तो सावरकरांनाच. पोखरण स्फोटाच्या यशस्वी प्रयोगानं त्यांनी स्वनामधन्यतेचा अनुभव घेतला असता. स्वातंत्र्य युद्धात सावरकरांनी

सशस्त्र राज्यक्रांतीची भूमिका स्वीकारलेली होती. त्याची ही भूमिका देशोदेशीच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या अभ्यासातून आकारलेली होती. बुद्धिनिष्ठा हेच त्यांच्या भूमिकेचं अधिष्ठान तत्त्व होतं.

नेकम्या ह्याच बुद्धिवादी भूमिकेतून त्यांनी वैज्ञानिक दृष्टीचा स्वीकार केला. विज्ञाननिष्ठाच त्यांनी सामाजिक क्रांतीचं मार्गदर्शक तत्त्व मानसं. धर्मविषयक अडाणी समजूती, ग्रंथ प्रामाण्य ह्यामुळं समाज मागासलेलंपणाशी बांधला जातो. बुद्धिवाद नि विज्ञान निष्ठा समजाला अंधःकारातून प्रकाशाकडे नेते असं सावरकराचं स्पष्ट प्रतिपादन होतं. ‘श्रुतिस्मृतिपुराणोक्त ’ वचन नाही तर विज्ञानोक्तन सत्य, पुरातन नाही तर प्रयोग निष्ठ विकसनशील, वेद नाही तर विज्ञानच आजच्या समाजधारणेचा वेद अशी त्यांची भूमिका राहिली. रत्नागिरी स्थानबद्धतेच्या काळात त्यांनी जातिनिष्ठ उच्चकनिचता, स्पृश्य-अस्पृश्य विचार, सामाजिक विषमता ह्यावर आसूड उगारलं. मुसत्या समाज सुधारणेवर सावरकर संतुष्ट नव्हते. त्यांना आमूलाग्र समाजक्रांतीच अपेक्षित होती.

सामाजिक क्रांतीच्या क्षेत्रात बुद्धिवाद नि वैज्ञानिक दृष्टीची आग्रही भूमिका त्यांनी घेतली. आर्थिक क्षेत्रात त्यांनी विज्ञानाचं मूर्त स्वरूप असलेल्या यंत्राचं स्वागत केलं. त्याविना औद्योगिक विकास, आर्थिक प्रगती, सुबत्ता केवळ अशक्य ही त्यांची विचार सरणी होती. यंत्र म्हणजे मानवाला विज्ञानानं दिलेलं सक्षम सहावं इंद्रियच. सावरकर म्हणूनच यंत्राला विरोध म्हणजे प्रगतीला विरोध मानीत, यंत्रामुळं बेकारी वाढते, औद्योगिक विकासामुळं बकालपणा वाढतो हा अपसमज सावरकर धुडकावून लावतात. बेकारी वाढते ती असमान वाटप नि सदोष वितरण पद्दतीमुळं, बकालपणा वाढीस लागतो तो व्यवस्थापकीय सदोष पद्धतीतून असं ते आपलं मत नोंदवितात. आज मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी मानली जाते. का? अर्थातच मुंबईची आर्थिक प्रगती. कृषी व्यवसायाकडे सावरकर अशाच वैज्ञानिक दृष्टीनं पाहतात नि आधुनिकीकरणाचा आग्रह

धरतात. शेतकरी नि कामकरी वर्ग म्हणजे राष्ट्राचं आरोग्य, संपत्ती नि शक्तीष मानतात.

प्रगतीशील, विकोसोन्मुख सामाजिक-आर्थिक क्षेत्राप्रमाणंच सावरकरांचे साहित्य कलादि विषयक वाचार एक प्रकारे क्रांतिकारक असेच होते. साहित्य म्हणजे केवळ अर्थकामाचा प्रपंच नव्हे असे स्पष्ट बजावून साम्यवादी नि काम्यवादी साहित्य सावरकर एकेरी नि एकांगी ठरवितात. रंजन हा साहित्याचा एक हेतू असला तरी ते एकमेव प्रयोजन ठरत नाही, ठरू नये हीच त्यांची साहित्य विषयक भूमिका होती. राष्ट्र, स्वातंत्र्य आणि संरक्षण हेच साहित्याचं प्राणतत्त्व ही सावरकरांची भूमिका एकेरी वाटत असली तरी तत्कालीन परतंत्र नि वर्तमान नवजात स्वातंत्र्याच्या संदर्भात अवास्तव ठरत नाही. खुरटे, दुर्बल राष्ट्र तेजस्वी साहित्य निर्माणच करू शकत नाही. अशा राष्ट्राचं साहित्य नि त्याचे सिहित्यिकही त्यांचे साहित्यिकही खुरटे नि दुर्बलच असणार असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय आहे.

महाराष्ट्रानं अनेक नररत्ने प्रसवलीत. ज्ञानेश्वर-एकनाथ-नामदेव-तुकराम-रामदास आदि संत नि शिवाजी-बाजी-संभाजी-संताजी-धनाजी- नानासाहेब-राणी लक्ष्मीबाई-तात्याटोपे-वासुदेव बळवंत फडके-दामोदर चाफेकर नि बंधू अशा स्वातंत्र्य वीरांनी निर्माण केलेली नि जोपासलेली वैराग्य-विक्रमाची परंपरा कधी खंडीत झाली नाही. अलीकडच्या काळात फुले-कर्वे, रानडे-टिळक, आगरकर-आंबेडकरांसारख्या नररत्नां नी आपल्या विचार आचारातून, कार्यकर्तृत्वातून ही परंपरा पुढं चालवीत महाराष्ट्राची मूर्ती घडविली. महाराष्ट्राची मान उंचावली, ती ताठ ठेवली अशा श्रेणीच्या नरपुंगवांनीच, ‘महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले’ असा सार्थ अभिमान समर्पक शब्दात व्यक्तर करणारी सेनापती वापटांची ही उक्ती सार्थ झाली. ती नुसती गर्वोक्ती नाही, ती आहे सबळ अस्मितेची सार्थ अभिव्यक्तीव. सावरकर अशाच अनेक नरसिंहातील एक असमान्य

पुरुषसिंह. महाराष्ट्राची प्रखर बुद्धिवादी, विज्ञाननिष्ठ, उपयुक्ततावादी मूर्ती घडविणारा एक मूर्तीकार. महाराष्ट्र महान राष्ट्र शिल्पाचा दर्शनकार, शिल्पकार म्हणून ते जसे वंदनीय तसेच अनुकरणीयही!

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

### :: नवीन प्रकाशने ::

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मराठी वाङ्मयकोश खंड ४ | समन्वयक संपादक | रु. ३२०/- |
| | (समीक्षा-संज्ञा) | डॉ. विजया राजाध्यक्ष | |
| २) | दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तृत्व | संपादक मंडळ | रु. ६०/- |
| ३) | पं. जवाहरलाल नेहरू | संपादक | रु. १४०/- |
| | व्यक्ती आणि कार्य | प्रा. बा. ह. कल्याणकर | |
| ४) | भारताचा स्वातंत्र्यलढा | डॉ. वा. ना. कुबेर | रु. १०९/- |
| ५) | मध्ययुगील महाराष्ट्र | प्रा. म. श्री. माटे | रु. ७५/- |
| ६) | भारतातील आदिवासी वंश | प्रा. वि. श्री. कुलकर्णी | रु. १२५/- |
| ७) | खानदेशातील कृषक जीवन | डॉ. रमेश सुर्यवंशी | रु. ६०/- |
| ८) | चरियापिटक | डॉ. शेषराव मेश्राम | रु. ३३/- |
| ९) | चिरकालिन सिरॅमिक्स | डॉ. प्रकाश दळवी | रु. ४५/- |
| १०) | छत्रपती शिवाजी महाराज | डॉ. प्र. न. देशपांडे | रु. ४८/- |
| ११) | सर्वज्ञ चक्रधर | प्रा. पुरुषोत्तम नागपुरे | रु. ३७/- |
| १२) | संत जनाबाई | डॉ. सुहासिनी इर्लेकर | रु. ५०/- |

**महाराष्ट्राचे शिल्पकार योजनेअंतर्गत चरित्रग्रंथ मालिकेतील चरित्रग्रंथ**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कर्मवीर मामासाहेब जगदाळे | व. न. इंगळे | रु. ४५/- |
| २) | तंट्या भिल्ल | बाबा भांड | रु. ४५/- |
| ३) | यशवंतराव चव्हाण | विठ्ठलराव पाटील | रु. ४०/- |
| ४) | दादासाहेब फाळके | बापू वाटवे | रु. ४०/- |
| ५) | तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | विजया जहागीरदार | रु. ४५/- |
| ६) | ताराबाई शिंदे | इंद्रजित भालेराव | रु. २५/- |

**मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाण**

सर्व शासकीय ग्रंथ भंडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

**अधिक माहिती/चौकशीसाठी**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व),
मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी – २४१४४९२१, २४१४६००५

**सुधाकर देशपांडे**

मूळगाव नागपूर. प्राथमिकपासून स्ना१तकोत्तर पदवीपर्यंत शिक्षण नागपूरलाच पूर्ण. नागपूर विद्यापीठाची एम्. ए. (इंग्राजी) ही पदवी प्राप्त करून अध्यापकीय जीवनात प्रवेश. मिलिंद महाविद्यालय, संभाजी नगर, कला वाणिज्य महाविद्यालय, जालना आदि संस्थातून अध्यापकीय काम करून स्ना४तकोत्तर अभ्यासक्रम विभागप्रमुख म्हणून पीपल्स कॉलेज, नांदेड येथून निवृत्ती. बनारस हिंदू विद्यापीठातून एम्.ए. (इतिहास) ही पदवी प्राप्त. 'प्राचीन भारतीय राज्यसंस्था, तत्त्व नि तत्त्वज्ञान' या विषयावर संशोधन. मराठवाडा विद्यापीठाची पीएच्.डी. इतिहास विषयावर क्रमिक ग्रंथलिखाण, सावरकर साहित्याचा विशेष अभ्यास. 'सावरकरांचे आठवावे विचार, अर्थात् सावरकरवाद', 'हिंदुत्व', 'दिशा आणि दशा', 'राष्ट्र विचार ऊर्जा', 'सावरकर द. प्रॉफेटिक व्हॉइस', 'सावरकर' आदि ग्रंथासमवेत सावरकर विचार प्रसार-प्रचारासाठी महाराष्ट्र नि बृहन्महाराष्ट्रात व्याख्याने. अनेक वृत्तपत्रातून, नियतकालिकातून सतत स्फूट लेख प्रकाशित.